सभापतीस्थानी माननीय सभापती

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

(माननीय सभापती आसनस्थ होताना काही सन्माननीय सदस्य उभे राहून "जय महाराष्ट्र", काही सन्माननीय सदस्य "जय विदर्भ" असे बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : "जय विदर्भ" कशाला म्हणता आहात ? तुम्हाला विदर्भाचा एवढा स्वाभिमान असेल तर विदर्भात जा. महाराष्ट्रात कशाला राहता ?

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या सभागृहात प्रत्येक सन्माननीय सदस्यांना आपापली मते मांडण्याचा अधिकार आहे. आम्ही अशा पध्दतीने एकमेकाच्या विरुध्द बोलत राहिलो तर ते बरोबर वाटत नाही. यामुळे आमचाही अपमान होतो.

सभापती : सभापती सभागृहात येताना काही संकेत आपण पाळतो. सभापती आसनस्थ होताना सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी उभे राहिले पाहिजे अशी पूर्वीपासूनची परंपरा आहे. ती परंपरा आपण टिकविली पाहिजे असे मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांना सांगू इच्छितो. आता प्रश्नोत्तरे चर्चेला घेण्यात येतील.

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांनी शांतपणे उभे राहिले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पालघर (जि.ठाणे) येथील फेसबुक प्रकरणातील पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन रद्द करणेबाबत

(१) * ३७८४९ श्री.दिवाकर रावते : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (जि.ठाणे) येथील फेसबुक प्रकरणाच्या विरोधात दिनांक १७ नोव्हेंबर, २०१२ रोजी वा त्या सुमारास हजारो नागरिकांनी निदर्शने केल्यामुळे त्याठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी केलेल्या कारवाईचे समर्थन करण्याऐवजी पोलिसांना दोषी ठरवून निलंबित केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, फेसबुक प्रकरणातील गुन्हे मागे घेतल्यामुळे अशा कर्तव्यदक्ष पोलिस अधिकाऱ्यांबाबत न्यायालयापुढे योग्य ती बाजू मांडून त्यांचे निलंबन रद्द करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.आर.आर.पाटील : (१) होय.

(२) सदर प्रकरणात विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र यांच्या चौकशी अहवालावरुन दिनांक २७/११/२०१२ रोजी दोन पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, घटनेने मुक्ततेचा अधिकार दिलेला आहे, तो अधिकार कसाही वापरावयाचा याचे हे फेसबुक प्रकरण उदाहरण आहे. या मुली कोण आहेत, त्यांचे वय काय आहे, त्यांची बुध्दिमत्ता काय आहे, त्यांनी मनात येईल ते फेसबुकवर लिहून टाकले. त्यांनी जे लिहिले त्यामुळे महाराष्ट्राचा घोर अवमान होईल ही बाब त्यांना कदाचित कळली नसेल. त्यांनी फेसबुकवर लिहिलेल्या मजकुराबाबत चीड येऊन संपूर्ण पालघर मधील जनता स्वयंस्फूर्तीने रस्त्यावर उतरली होती. कोणीही नागरिकाने दगडफेक केली नव्हती, कोणी दंगाधोपा केला नव्हता. कोणीही पालघर बंद करण्याचे आवाहन केले नव्हते. पालघरमधील नागरिकांनी आदरणीय शिवसेना प्रमुखांच्या प्रीत्यर्थ भावना व्यक्त करण्याकरिता स्वयंस्फूर्तीने नागरिकांनी निदर्शने केली होती.

३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

फेसबुकवर गलिच्छ पध्दतीने मत व्यक्त केले त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त झाला. तो संताप उत्स्फूर्त होता. यातून कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होत असेल तर पोलिसांनी काय करावयास पाहिजे होते? त्यांनी दांडके हातात घेऊन गप्प उभे रहावयास पाहिजे होते काय? कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली त्यामुळे पोलिसांनी जी कारवाई करावयाची असते ती त्यांनी केली आहे. त्यांना तात्पुरताh अटक केली. त्यांना पोलीस कोठडीत टाकले नाही. त्यांचा छळ केला नाही. त्यांना फक्त आणले आणि लोकांना शांत केले. गुन्हा दाखल केल्यानंतर गुन्हयाच्या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण करणे हा त्यातील एक भाग होता.

महोदय,निवृत्त न्यायाधीश श्री.काटजू हे न्यायाधीशाच्या योग्यतेचे होते काय असा प्रश्न माझ्या मनात निर्माण होतो आहे. श्री.काटजू यांचे ऐकून महाराष्ट्र शासनाने ताबडतोबीने एस.पी.सारख्या पोलीस अधिकाऱ्यास निलंबित केले. एस.पी.यांना निलंबित का केले याची माहिती शासनाला सांगता आली नाही. त्या दोन मुलींनी फेसबुकवर जे लिखाण केले, त्या बाबतीत आपण त्यांचे विरुध्द योग्य ती कारवाई केली. त्यानंतर न्यायालयाने सांगितल्याप्रमाणे त्यांचा आदर राखून योग्य ती कारवाई आपण केली आणि त्यांच्यावरील गुन्हे मागे घेतले. हा विषय तेथे संपला होता. आपल्या अधिकाऱ्यांनी केलेली कारवाई अयोग्य आहे हे आपण स्वीकारुन अधिकाऱ्यांना अशा प्रकारे दंड करणार असाल तर या महाराष्ट्रामध्ये पोलीस अधिकारी कधीही, कोणत्याही प्रकारची कारवाई करणार नाहीत. अशा प्रकारची कारवाई पोलीस अधिकाऱ्यांवर होत असेल तर पोलीस विभागाचे नीतीधैर्य खच्ची होईल.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

श्री.दिवाकर रावते..... ता.प्र.क्र.37849.....

न्यायालयाने सांगितले असले तरी आपण सांगितले पाहिजे होते की, यापुढे अशा प्रकारची कोणतीही कारवाई करण्याकरिता समिती नेमली आहे. त्या समितीला विचारुन पुढील कार्यवाही करु. जी कृती घडलेली आहे ती क्षमापित असली पाहिजे असे सांगितले पाहिजे होते. सुप्रीम कोर्टापासून सगळ्या यंत्रणांनी शासनाला फटकारले. शासकीय अधिकाऱ्यांची चूक झाली हे मान्य करता का? अधिकाऱ्यांचे निलंबन हे चुकीचे झालेले आहे. म्हणून चौकशी अहवालामध्ये काहीही नमूद केलेले असले तरी केलेली कृती चुकीची होती, चुकीची नसेल तर झालेले निलंबन अयोग्य आहे. त्यामुळे जी शिक्षा दिली गेली ती पुरेशी आहे. न्यायालयाचा आदर राखण्यासाठी निलंबन केले, कारवाई केली हे ठीक आहे. आता शासनाने निलंबन तातडीने मागे घ्यावे. अन्यथा पोलीस खात्यातील अधिकाऱ्यांचे नीतिधैर्य खचले तर कठीण परिस्थिती निर्माण होईल. अगोदरच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न महाराष्ट्रात ऐरणीवर आलेला आहे. दररोज माननीय गृहमंत्र्यांना वेगवेगळ्या प्रकरणात स्पष्टीकरण द्यावे लागते.

सभापती महोदय, माझी नम्र विनंती आहे की, मुलीबाबत दाखल केलेला गुन्हा मागे घेतला आहे. अधिकाऱ्यांवर कारवाई करुन न्यायालयाचा सन्मान केला आहे. त्यावेळी कायदा अस्तित्वात नव्हता. अशा वेळी पोलीस दलाने काय करायचे हे निश्चित केलेले नव्हते. न्यायालयाच्या निर्णयानुसार भविष्यात काळजी घेऊ, झालेली कृती क्षम्य झाली पाहिजे अशी भूमिका मांडली पाहिजे. म्हणून त्या अधिकाऱ्यांना तातडीने सेवेत रुजू करुन घेणार का? दिनांक 27.11.2012 रोजी जो चौकशी अहवाल आलेला आहे त्यानुसार पोलीस अधिकाऱ्यांना न्याय देणार का?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, चौकशी अहवालात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या घटनेमध्ये न लागणारी कलमे लावू नयेत, अटक करण्याची आवश्यकता नाही अशा सूचना दिल्या होत्या. या प्रकरणी वरिष्ठ वकिलांचा सल्ला घेण्यात आला होता. तरी देखील न लागणारी कलमे लावण्यात आली आणि अटक करण्यात आली. तीन महिन्यांपेक्षा जास्त काळापासून अधिकारी व कर्मचारी सस्पेंड आहेत. याबाबत त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केले आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात एक समिती असते. 16 तारखेला या समितीची बैठक आयोजित केली आहे. त्या बैठकीमध्ये योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला फक्त कलमांबाबत बोलावयाचे आहे. कोणताही गुन्हा दाखल करताना पोलीस विभागाकडून भरपूर कलमे लावण्यात येतात. चार्जशीट न्यायालयाला सादर करताना चौकशीत लावलेली कलमे अयोग्य आहेत असे आढळले तर ती कलमे वगळली जातात. चौकशी अधिकाऱ्यांनी न्यायालयाच्या दबावाखाली काम करणे अयोग्य आहे. निवृत्त न्यायमूर्ती काटजू यांनी ओरड केल्यामुळे दबावाखाली काम केले गेले. या संदर्भात जी कलमे लावली गेली ती मागे घेता येतात.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी स्पष्ट केले आहे. संबंधित अधिका-यांनी आपले म्हणणे शासनाकडे सादर केले आहे. 16 तारखेला या संदर्भात मुख्य सचिवांकडे बैठक बोलावली आहे. या प्रकरणी दोन्ही बाजूचा योग्य विचार करुन कोणावरही अन्याय होणार नाही अशा प्रकारे निर्णय घेण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय गटनेते श्री.दिवाकर रावते यांनी विस्तृतपणे भूमिका मांडली आहे. माननीय गृहमंत्र्यांना कल्पना नसावी, त्या दिवशी रात्री 1.00 वाजता मी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरुन बोललो होतो. आम्ही त्यांना शब्द दिला होता, महाराष्ट्रात कुठेही कोणती अनुचित घटना घडणार नाही. रात्री 3.00 वाजेपर्यंत इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून सतत आवाहन केले जात होते. कोणत्याही वाहनाची काच फोडता कामा नये, पेट्रोल पंप बंद होता कामा नये, रस्ते बंद पडणार नाहीत, लोकांना कामावर जाता आले पाहिजे यादृष्टीने खबरदारी घेण्यात आली होती. त्या परिसरात 25 ते 30 लाख लोकसंख्या असताना कोणतीही अनुचित घटना घडली नाही. विशिष्ट समाजाच्या मुलीने त्या स्थितीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न केला. न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यानंतरही कलमे वगळता आली असती. सभापती महोदय, सभागृहापेक्षा आणि आपल्यापेक्षा कोणती समिती मोठी नाही. सभागृहाची मान्यता असेल, सभागृहाची मानसिकता असेल तर 16 तारखेला बैठक आहे असे सांगता कामा नये. हे सार्वभौम सभागृह आहे. सभापती महोदय, आपण या सभागृहाचे प्रमुख आहात.

नंतर श्री.जुन्नरे...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 37849.....

श्री. रामदास कदम ....

येथे प्रतिष्ठेचा प्रश्न नाही.

मी सुध्दा एका पोलीस शिपायाचा मुलगा आहे. त्यामुळे माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, राज्यात एका बाजूला कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असतांना तुम्हाला पोलिसांचे मनोधैर्याचे खच्चीकरण करावयाचे आहे काय ? अशा वेळेला आपण सभागृहाची मानसिकता ओळखून या विषयाच्या संदर्भातील तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. हा विषय माननीय शिवसेना प्रमुखांच्या बाबतीतील आहे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आपण कोणत्याही समितीची वाट न पाहता सभागृहाचा अधिकार समजून, सन्माननीय सदस्यांचे अधिकार लक्षात घेऊन या प्रश्नाच्या संदर्भात ज्या पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केलेले आहे त्यांना तात्काळ सेवेत घेतले जाणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मला व्यक्ती स्वातंत्र्यही माहिती आहे, पोलिसांचे मनोधैर्यही माहिती आहे, तसेच सन्माननीय सदस्यांच्या भावनाही मला समजलेल्या आहेत. या विषयाच्या संदर्भात एक आठवडयाच्या आत निर्णय घेतला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

ॲड. आशिष शेलार :सभापती महोदय, आठवडया भरात या प्रश्नाच्या संदर्भात निर्णय घेतला जाईल असे माननीय मंत्री महोदयांनी आताच सांगितलेले आहे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावता कामा नये.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यानी आता जी म्हण वापरली आहे ती म्हण वापरण्यास सुध्दा बंधन घातले गेले पाहिजे. स्त्रीभ्रूण हत्याही होऊ देता उपयोगी नाही आणि राज्यातील म्हाताऱ्या सुध्दा जगवल्या पाहिजेत. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी या विषयाच्या संदर्भात मला पाठिंबा दिला पाहिजे. आपण म्हातारीच्या जिवावर का उठला आहात ? म्हाताऱ्याने तुमचे काय नुकसान केलेले आहे ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री म्हणीतील म्हाताऱ्या जगविण्याचे काम करीत असल्यामुळे त्यांचे मला अभिनंदन करावयाचे आहे. राज्यातील मुली मरु द्या, बायका मरु द्या परंतु मंत्री महोदय म्हाताऱ्या जगवतात त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील :सभापती महोदय, आपण सुध्दा माझ्या म्हणण्याला जोरदार समर्थन दिले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी ज्या म्हणीचा उल्लेख केलेला आहे ती म्हण आपल्या सभागृहात कधीही वापरता उपयोगी नाही. आणि म्हण वापरलीच तर ती रेकॉर्डवर येता उपयोगाची नाही. ज्येष्ठांचे आदर करणारे आपले राज्य आहे. म्हातारे जगले पाहिजेत आणि म्हाताऱ्याही जगल्या पाहिजेत. "म्हातारी मेल्याचे दु:ख नाही" म्हणजे काय ? खरे म्हणजे ही अमानूषता आहे.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, या स्पेसिफिक केसमध्ये राज्य सरकारने आणि पोलिसांनी जे गुन्हे दाखल केले होते त्यामध्ये कलम 295,505 बी,53 अशा प्रकारचे कलम लावले होते. सदर लावलेले गुन्हे चौकशीअंती चुकीचे लावले म्हणून राज्य सरकारने मागे घेतले होते. त्यामुळे यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या तिन्ही सेक्शनमध्ये जे महत्वाचे इनग्रेडीयन होते त्यामध्ये प्रोव्होकेशन, डेलीब्रेशन, इन्टेंडेड टू प्रोव्होक दि ग्रुप ऑफ पिपल या संदर्भात चौकशीमध्ये त्या मुलींचे इन्टेंशन आणि प्रोव्होकेशन नव्हते या मतावर राज्य सरकारची चौकशी समिती कशी आली ? अशाच पध्दतीने गुन्हा दाखल केल्यानंतर राज्य सरकारकडे अर्ज आले आणि दाखल केलेले गुन्हे चुकीचे आहेत, चुकीच्या पध्दतीने कलमे लावली आहेत असे जर राज्यातील सर्व केसेसच्या संदर्भात विचार झाला तर राज्य सरकार चौकशी समिती नेमणार आहे काय ? अशा केसेसमध्ये जे काही सेक्शन लावले आहे ते चुकीचे लावले गेले अशा अभिप्रायावरराज्य राज्य सरकार आले तर त्या त्या ठिकाणच्या राज्य सरकार मधील पोलीस खात्यातील अधिकाऱ्यांना अशाच पध्दतीने सस्पेंड करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, गुन्हयाची नोंद करीत असतांना ज्या गुन्हयांची आवश्यकता नाही असे गुन्हे लावले गेले आणि त्यासंदर्भात कोणाची तक्रार आली तर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत नेहमीच चौकशी केली जात असते. जर ही कलमे या घटनेमध्ये लागत नाहीत अशा प्रकारचा सल्ला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिला. काही घटनेमध्ये तक्रार आल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्याकडून सल्ला घेतला जातो तर काही घटनेमध्ये वकिलांकडून तसेच लॉ आफिसरकडून सुध्दा सल्ला घेतला जात असतो व त्यामध्ये ही कलमे लागत नाही असे अभिप्राय आले तर त्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 37849.....

श्री. आर.आर.पाटील....

दुरुस्ती केली जाते. परंतु हे प्रकरण थोडे वेगळे होते. या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही कलमे लागत नाही, ॲक्शन घेऊ नका अशी सूचना दिल्यानंतरही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सल्ला न ऐकता खालच्या स्तरावर कारवाई केली गेली. इन्टेंशन या गोष्टी सुध्दा आपण बघत असतो. आपल्या राज्यात व्यक्ती स्वातंत्र्यही अबाधित राहिले पाहिजे व पोलिसांचे मनोधैर्यही अबाधित राहिले पाहिजे म्हणून या प्रकरणाच्या संदर्भात एक आठवडयात योग्य तो निर्णय घेतला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मला माननीय गृह मंत्र्यांना या अधिकाऱ्यासंबंधी काही प्रश्न विचारावयाचे आहेत. जेव्हा हा अधिकारी ठाण्याला एस.पी.होता तेव्हा त्याने चार हजार कर्मचाऱ्याचा पगार भारतीय स्टेट बँकेतून काढून ॲक्सिस या खाजगी बँकेत टाकला. चपराशा पासून एस.पी.पर्यंत सर्वांचे पगार ॲक्सिस बँकेतून व्हायला लागले. असे करण्यामागे त्यांचा हेतू काय होता ? त्याची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सदर प्रश्न हा मूळ प्रश्नाशी संबंधित नसल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या साठी वेगळा प्रश्न विचारावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय गृह मंत्र्यांच्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, न्यायालया पेक्षा हे सभागृह सर्वोच्च आहे. तेव्हा माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी या सदनाचा आदर करावा. त्यांना येथे निर्णय घोषित करणे अवघड असेल तर पुढच्या आठवड्यात यासंबंधीचा निर्णय सदनामध्ये जाहीर करावा अशी मी आपल्या मार्फत विनंती करतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सदनाच्या भावना, व्यक्ती स्वातंत्र्य, अधिकाऱ्यांचे मनोधैर्य या सर्वांचा एकत्रित विचार करून योग्य तो निर्णय आठवडा भरात घेण्यात येईल असे सांगितले आहे.

सभापती : मंत्री महोदय, कार्यक्षेत्रामध्ये काम करत असलेला पोलीस कॉन्स्टेबल असेल, वरिष्ठ पोलीस अधिकारी असेल त्याचे मनोर्धय खचता कामा नये, याची काळजी आपण घेणे आवश्यक आहे. मी सुद्धा या प्रकरणाबाबत थोडे वाचन केले आहे. तेव्हा मला असे दिसले की, अन्य अधिकारी देखील त्या दरम्यानच्या काळात त्या क्षेत्रात काम करीत होते. डीएसपी रँकचे एक निष्णात अधिकारी तांत्रिक आधारामुळे या केसमध्ये निलंबित झालेले आहेत. त्या अधिकाऱ्याचे नीतिधैर्य खचणार नाही अशा प्रकारची भावना आपण येथे व्यक्त केली आहे. आपण सात दिवसांमध्ये यासंबंधातील चौकशी नक्की पूर्ण करायला सांगावी. ती चौकशी पूर्ण होईल अशी मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती.....

देखील आशा आहे. त्या अगोदर देखील एखाद्या बाबी संबंधी माननीय गृह मंत्र्यांनी निर्णय घेतला तर खऱ्या अर्थाने या सदनामध्ये ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याला तो साजेसा होईल असे मला वाटते. त्याची आपण जरूर नोंद घ्यावी.

श्री.आर.आर.पाटील : ठीक आहे.

.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अहमदनगर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास गेलेल्या युवतीला केलेली मारहाण

(2) * 37928 डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुण्याहून शिर्डीला नियोजित पतीसह निघालेल्या 18 वर्षीय तरुणीचे अपहरण करून तिला जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडण्यासाठी मारहाण करणाऱ्यांविरूध्द तक्रार देण्यास गेलेल्या युवतीला अहमदनगर पोलिसांमार्फत मारहाण झालेल्या प्रकरणाचा सी.आय.डी. मार्फत तपास करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी व अध्यक्षा स्त्री आधार केंद्र यांनी दिनांक 12 जानेवारी, 2013 रोजी वा त्यासुमारास पोलीस अधिक्षक, अहमदनगर जिल्हा यांना दिले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) डॉ.नीलम गोऱ्हे, विधानपरिषद सदस्या यांचे दिनांक 16.1.2013 रोजीचे पत्र मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना प्राप्त झाले आहे.

(2) व (3) पोलिसांनी केलेल्या मारहाणीसंबंधी चौकशी करण्यात येत आहे. याप्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीमध्ये संबंधितांचे जाब-जबाब नोंदविण्यात आलेले असून संबंधित महिलेची वैद्यकीय तपासणी करुन घेऊन तिचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले आहे.

अपहरण करुन महिलेवर अत्याचार प्रकरणी 4 आरोपीविरुध्द तोफखाना पोलीस स्टेशन अहमदनगर येथे गु.र.क्र.17/2013, भा.दं.वि.कलम 363,367,343,323,504,34 व पीटा ॲक्ट कलम 5,6 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपींचा शोध चालू असून त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येवून सदर गुन्हयाचा अत्यंत सखोल व बारकाईने तपास करण्यात येत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, महिला व मुलींची अनैतिक वाहतूक तसेच व्यापार या संबंधातील अतिशय गंभीर असा हा प्रश्न आहे. पुण्याहून शिर्डीला जाणारे हे जोडपे होते. पुण्याहून जाताना या पूजाचे नगरला अपहरण करण्यात आले. आम्ही दहा-बारा दिवस पाठपुरावा केल्यानंतर माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याशी बोललो. त्यामुळे आज ती केस थोडी पुढे सरकली आहे. यात दोन गंभीर मुद्दे आहेत. शिरपूर पोलीस ठाण्याचे श्री.संभाजी पाटील यांच्या जेव्हा

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षात आले की, ही अपहरण केलेलीच मुलगी मागण्यासाठी हे लोक आलेले आहेत त्यावेळी त्यांनी कुंटणखान्यातील बाईला फोन केला आणि ती मुलगी अर्ध्या तासात पोलीस इन्स्पेक्टरनेच हजर केली. म्हणजे शिरपूरच्या पोलीस अधिकाऱ्यांना पूर्णपणाने माहिती होती की, येथे अपहरण केलेल्या मुली आणल्या जातात. पुणे पोलिसांनी फोन केला आहे म्हटल्यावर आपली आता धडगत नाही म्हणून त्यांनी त्या मुलीला हजर केली. नाही तर ती मुलगी पूर्णपणे वेश्या व्यवसायात गेली असती आणि तिचे आयुष्य कायमचे उद्ध्वस्त झाले असते. शिरपूरमध्ये श्री.संभाजी पाटील यांचे नेक्सेस आहे. त्याचीही तपासणी आज झालेली नाही. धुळ्यातील महिला संघटनांनी त्याकडे लक्ष वेधले आहे.

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, श्री.संजय बारकुंड म्हणून पोलीस उप अधीक्षक आहेत. 9 तारखेला पुण्याचा एक कॉन्स्टेबल बाहेर हजर होता. श्री.बारकुंड यांनी भर पोलीस ठाण्यामध्ये पुजा व तिच्या नवऱ्याला पट्टयाने मारहाण केली आहे. शेवटी त्या कॉन्स्टेबलने पुण्याला वरिष्ठांना फोन केला. तेथून एस.पी.नगरला फोन गेला. मग त्यांची सुटका झाली. या श्री.संजय बारकुंड यांना सक्तीच्या रजेवर पाठविले असे नंतर जाहीर केले. श्रीमती ज्योतिप्रिया सिंग या मला भेटायला आल्या होत्या. स्वत: त्या मुलीला वैद्यकीय तपासणीसाठी घेऊन गेल्या. त्यांच्या बरोबर पुण्यातील महिला दक्षता समितीच्या महिला गेल्या होत्या. त्यांना सुद्धा श्री.संजय बारकुंड ऑफिसमध्येच दिसला.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37928....

डॉ.नीलम गोऱ्हे....

श्री.संजय बारकुंडे हे कुठे आहेत हे पाहण्यासाठी मी माझ्या सचिवांना दिनांक 4 मार्च रोजी नगरला पाठविले होती. त्यांनी मला सांगितले की, श्री.संजय बारकुंडे हे नगर पोलीस स्टेशनमध्ये काम करीत आहेत. आपण ज्या पोलीस अधिकाऱ्याला सक्तीच्या रजेवर पाठविले होते तो पोलीस अधिकारी पोलीस स्टेशनमध्ये काम कसा करीत आहे ?

सभापती महोदय, पोलीस अधिकाऱ्यांनी अपहरण झालेल्या मुलीला पट्ट्याने मारले होते. त्या मुलीच्या जखमा मी स्वत: पाहिलेल्या आहेत. त्या संदर्भात वैद्यकीय अहवाल प्राप्त झालेला आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, संजय बारकुंडेला निलंबित करणार काय ? पोलीस स्टेशनमध्ये जो प्रकार घडलेला आहे तो "मोका" सारखा गुन्हा आहे. तेव्हा या प्रकरणी जे कोणी दोषी असतील त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई करणार काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अशा घटनेमध्ये पोलीस अधिका-याने चुका केल्या असतील किंवा अन्य कोणी असतील तर त्याला माफ करण्याची भूमिका शासनाची आणि माझी देखील नाही. एक गोष्ट स्पष्ट झालेली आहे की, त्या मुलीने पुणे येथे गुन्हा रजिस्टर्ड करुन तो झिरो नंबरखाली तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गेला. त्यावेळी हा गुन्हा एस.पी.कडून आला नाही अशी तांत्रिक बाबी उपस्थित करुन त्यांना ॲडीशनल एस.पी.कडे पाठविण्यात आले. वास्तविक असे करण्याची काही आवश्यकता नव्हती. तोफखाना पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्हा नोंद करुन घेण्याऐवजी ॲडीशनल एस.पीं.कडे का पाठविले या संबंधीचा चौकशी अहवाल एस.पीं.कडून प्राप्त झालेला आहे. त्या अहवालानुसार ॲडीशनल एस.पी.नी मारहाण आणि अपशब्द वापरलेले आहेत. त्यामुळे त्या दोघांनाही निलंबित करण्यात येईल.

सभापती महोदय, या घटनेमध्ये दुसरी बाजू अशी की, त्या मुलीला बेशुध्द करुन नेल्याबरोबर तिच्या होणाऱ्या नवऱ्याने या घटनेतील शिरपूरमधील जे आरोपी आहेत त्यांना काही वेळातच फोन केलेला आहे. या घटनेमध्ये कोण आहे, काय आहे हे सर्व तपासण्याची आवश्यकता आहे. आपण फोन रेकॉर्ड पाहिला तर त्या मुलीच्या होणाऱ्या नवऱ्याने एकदम शिरपूरला फोन करण्याची काय आवश्यकता आहे. त्याच्याकडे तो फोन नंबर कोठून आला याची देखील चौकशी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावी लागेल. धुळे येथे शिरपूर पोलीस स्टेशनचे अधिकारी 11 वेळा जाऊन आले. ते आरोपी इकडे-तिकडे पळत आहेत. त्या मुलीच्या होणा-या नवऱ्याकडे यांचे फोन नंबर कसे आले याचा मुख्य आरोपी पकडल्यानंतर या गोष्टीचा उलगडा होईल. या घटनेमध्ये शिरपूर पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाले असेल त्यांच्यावर देखील शंभर टक्के कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे हे प्रकरण गेल्यानंतर त्या ठिकाणी तातडीने गुन्ह्याची नोंद न करता एस.पीं.कडे पाठविण्याची काहीही आवश्यकता नव्हती. या प्रकरणाकडे संवेदनशीलपणे पाहण्याची गरज होती. ॲडीशनल एस.पीं.कडे प्रकरण गेल्यानंतर त्यांनी मारहाण करण्याची आणि अपशब्द वापरण्याची काहीही गरज नव्हती. एक असहाय्य महिला मदत मागण्यासाठी येते तेव्हा तिला संवेदनशीलपणे मदत करण्याऐवजी तिला अपमानीत केले जात असेल ती घटना गंभीरच आहे. राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांना एक संदेश जावा म्हणून या प्रकरणातील दोन्ही कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात येईल आणि तशा प्रकारच्या सूचना मी आज सकाळी दिलेल्या आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रकरणातील धागेदोर शोधण्यासाठी आमची संघटना आणि आमदार म्हणून माझे पोलिसांना पूर्ण सहकार्य मिळेल. त्या मुलीच्या वयाच्या प्रमाणपत्राचा उल्लेख केलेला आहे. पुणे आणि नगरच्या पोलीस स्टेशनमध्ये त्या मुलीच्या वयाच्या प्रमाणापत्राची मागणी करुनही सुध्दा तिच्या वयाचे अधिकृत प्रमाणपत्र आम्हाला प्राप्त झालेले नाही. तेव्हा त्या मुलीचे वय किती आहे याची माहिती मिळेल काय ? मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, दिनांक 14 फेब्रुवारी रोजी त्या मुलीचे स्वखुशीने त्या मुलाशी लग्न केलेले आहे. त्या लग्नाला मी स्वत: गेले होते. माननीय मंत्री महोदयांनी येथे सांगितले की, त्यांच्याकडे नंबर कोठून आले. त्या कुंटणखान्यामध्ये जे ग्राहक गेले होते त्या ग्राहकांनी या लोकांना कळविले की, अमुक अशी एक मुलगी येथे अडकली आहे. तेव्हा आपण तेथे लक्ष द्यावे. परंतु पोलिसांच्या तपासातून जे काही पुढे येईल त्याला आमचे पूर्ण सहकार्य राहील. त्या मुलीच्या वडिलांच्या संदर्भात प्रश्न चिन्ह आहे. त्यांनी अपहरण केल्या संदर्भात केस केलेली आहे. त्या प्रकरणी पुणे पोलीस विभाग सहकार्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करीत आहे. पुणे विभागाचे पोलीस अधिकारी श्री.भानुप्रताप बर्गे यांचे निश्चितपणे अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी केलेल्या कामाची दखल घ्यावी अशी माझी शासनाला विनंती आहे. मी अगोदर प्रश्न विचारल्या प्रमाणे त्या मुलीचे वय किती याची माहिती मिळेल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मुलीचे वय 19 वर्षे आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे त्या मुलीच्या लग्नाला हजर होत्या आणि त्या सर्व गोष्टी कायदेशीर करीत असल्यामुळे तिचे वय 18 वर्षापेक्षा कमी नसेल या सर्टीफिकेटची काय आवश्यकता आहे ?

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रवीण पोटे : महोदय, अशा प्रकारच्या घटना संपूर्ण महाराष्ट्रात घडत आहेत. अमरावती जिल्ह्यात गेल्या चार महिन्यात 32 मुली पळून गेल्या आहेत. पोलीस विभागाकडे या बाबत तक्रार करण्यासाठी गेल्यास ते सांगतात की, 24 तास वाट बघा. कदाचित तुमची मुलगी नातेवाईकांकडे गेली असेल. वास्तविक पाहता लगेच या बाबतची तक्रार नोंदविली गेल्यास लगतच्या पोलीस स्टेशन, रेल्वे स्टेशन परिसरात या बाबत ट्रॅप करता येईल. तक्रार दाखल करण्याबाबत जास्त फोर्स केला तर मुलगी नेमकी कोठे गेली हे सांगा, नंतर आम्ही शोधतो असे सांगितले जाते. महोदय, मध्य प्रदेश राज्यातील उज्जैन येथील लोथा या गावात मुली पळवून नेल्या जातात आणि त्या ठिकाणी त्यांचे जबरदस्तीने लग्न लावून त्यांना वेशा व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले जाते. वडिलांना जर या संदर्भातील माहिती मिळाली तर वडील मला अमुक ठिकाणावरुन फोन आल्याची बाब पोलिसांच्या निदर्शनास आणून देतात. परंतु पोलीस विभागातील लोक म्हणतात की, तुम्ही आम्हाला अन्य राज्यात जाण्यासाठी पैसे द्या. हा विषय दुसऱ्या राज्याशी संबंधित असल्यामुळे आम्ही त्या ठिकाणी विभागाची गाडी पुरवू शकत नाही. अशा प्रकारे पोलीस उत्तर देतात. या प्रकरणी पोलीस विभाग हलगर्जीपणे काम करीत असल्याचा माझा थेट आरोप आहे. अशी प्रकरणे होत असतील तर त्या प्रकरणी कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : महोदय, या संदर्भात शासन किती संवेदनशीलपणे काम करीत आहे हे ॲडीशनल एस.पी. दर्जाच्या अधिकाऱ्यांना निलंबित करुन दाखवून दिले आहे. मला दुसरी बाजू सदनाच्या लक्षात आणून द्यावयची आहे की, मुलगी बेपत्ता झाल्यानंतर किंवा तिच्या प्रियकराबरोबर पळून गेली तर पालकांना आपली मुलगी कोणत्याही परिस्थितीत हवी असते. परंतु त्या बाबत रेकॉर्डवर तिचे नाव येऊ नये अशी पालकांची अपेक्षा असते. मुलीचे लग्न होण्यात अडथळा येईल, आपले नाव बदनाम होईल या भीतीपोटी मुलीचे नाव रेकॉर्डवर नको अशा प्रकारची मागणी होते. मला सुध्दा कधी कधी असे फोन येतात. या प्रकरणात अशा दोन्ही बाजू आहेत. त्यामुळे आपण सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक तक्रार केली तर संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून 100 टक्के चौकशी करण्यात येईल व त्यामध्ये कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मुलींच्या तक्रारीच्या बाबतीत पोलिसांकडून त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनाबाबत खूप चर्चा होत आहे. केवळ दोन पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले म्हणून चांगला मेसेज जाणार नाही. यासाठी सकारात्मक कार्यक्रम राबविण्याबाबत गृह विभाग विचार करीत आहे काय ? गेल्या अनेक वर्षांपासून मुली बेपत्ता होण्याच्या किंवा पळवून नेण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे हा विषय संवेदनशीलपणे हाताळला पाहिजे. पूर्वीच्या काही एनजीओंना अधिकारी बाजूला सारत आहेत. याची उदाहरणे मी देऊ शकतो. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, जेंडर सेन्सीटायझेशनच्या बाबतीत गृह विभागाकडून काही करण्यात येणार आहे की नाही ? आज या विषयी सभागृहात चर्चा होत आहे. परंतु केंद्र सरकारमध्ये संमतीने लैंगिक संबंधाचे वय 18 वर्षांवरुन 16 वर्षे करण्यात येणार आहे. असे केल्यामुळे हा विषय अडचणीचा होणार आहे. महाराष्ट्राला सुध्दा अनुभवाच्या आधारे 18 वर्षे वय 16 वर्षे केल्यास ती बाब त्रासदायक ठरु शकते. त्यामुळे लैंगिक संबंधाचे वय 18 वर्षांवरुन 16 वर्षे करु नये या बाबतची शिफारस करण्याची मानसिकता गृह विभागाची आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : महोदय, केंद्र सरकार आणि तेथील तज्ज्ञ व्यक्ती या बाबत विचार करीत आहेत. या प्रकरणी संसद विचार करीत आहे. त्यामुळे मी साधा विचार करुनही फारसा उपयोग होणार नाही. मला वाटते आपण या बाबत खाजगीमध्ये चर्चा करु.

महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. हे खरे आहे की, काही घटना घडल्या आहेत. अन्य राज्यात पळवून नेण्यात आलेल्या मुलींची पोलिसांनी सुटका करुन, आरोपींना अटक केलेली आहे. पुढील प्रश्नात या बाबत सविस्तर चर्चा करता येईल. ज्या ठिकाणी अशा तक्रारी येतात त्या ठिकाणी पोलीस संवेदनशीलपणे काम करीत आहेत. ज्या ठिकाणी पोलीस चुकले असतील त्या ठिकाणी सरकारच्या माध्यमातून कारवाई करण्यात येत आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, हे पोलिसांचे क्रेडीट नाही. महाराष्ट्राची उज्ज्वल परंपरा आहे. महिलांच्या बाबतीत बहुसंख्य लोकांचा दृष्टिकोन चांगला आहे. मुंबई शहर देशभरातील महानगरामध्ये महिलांच्या बाबतीत सुरक्षित शहर मानले जाते. तसेच महाराष्ट्र राज्य सुध्दा महिलांच्या बाबतीत सुरक्षित राज्य मानले जाते.

नंतर श्री.बरवड....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, आपले राज्य महिलांच्या बाबतीत सुरक्षित आहे तरी सुदा दिल्लीमध्ये जी घटना घडली आणि देशभर त्या घटनेच्या ज्या प्रतिक्रया उमटल्या त्यानंतर पोलीस महासंचालकांनी स्वत: सगळ्या आयपीएस अधिकाऱ्यांची एक बैठक आयोजित केली होती. मी सुध्दा त्या बैठकीला मार्गदर्शन करण्यासाठी गेलो होतो. अशा गोष्टींकडे खूप बारकाईने बघितले जावे, संवेदनशीलतेने बघितले जावे अशा सूचना सगळीकडे देण्यात आलेल्या आहेत.

मी दुसरी एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, देशभरामध्ये आता कोठे मुली पोलीस दलामध्ये येण्यास सुरुवात झालेली आहे. अजूनही त्यांच्या सर्व जागा भरलेल्या नाहीत. तरी सुध्दा आज देशामध्ये जी विविध राज्ये आहेत त्यामध्ये महिला पोलीस आणि अधिकाऱ्यांची सर्वाधिक संख्या आपल्या महाराष्ट्रामध्ये आहे. गेल्या पाच वर्षातच या संख्येच्या बाबतीत आपण एक नंबरला पोहोचलेलो आहोत. दुसऱ्या राज्यांच्या तुलनेत आपल्याकडे महिला पोलिसांची संख्या खूप मोठी आहे. त्यामुळे पोलीस स्टेशनला महिला तक्रार करण्यास आली तर त्या जिल्ह्यामध्ये, त्या तालुक्यामध्ये पीएसआय उपलब्ध असेल तर तिच्या समोर त्या महिलेचा जबाब घ्यावा, अनावश्यक प्रश्न विचारु नयेत, जर पीएसआय उपलब्ध नसेल तर किमान कॉन्स्टेबलला तरी उपस्थित ठेवावे आणि तक्रार करण्यासाठी आलेल्या महिलेला अनावश्यक प्रश्न विचारुन त्यांना लज्जित करु नये या गोष्टीची दक्षता घेण्याबरोबरच अशा जर तक्रारी आल्या तर त्याची गांभीर्याने दखल घेऊन त्या बाबतीत तातडीने तपास करण्याच्या सूचना सर्व पोलिसांना दिलेल्या आहेत. देशभरात जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्या दृष्टीने महाराष्ट्रातील पोलीस सुध्दा या बाबतीत अलर्ट आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी तीन गंभीर घटनांकडे माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. दोन घटनांबाबत त्यांनी अतिशय चांगली भूमिका घेतलेली आहे. धुळ्यामध्ये अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन तिचे हाल करण्यात आले. त्यामध्ये अनेक दिग्गज मोठी माणसे गुंतलेली होती. दुसरी अलीकडची घटना उल्हासनगरमधील आहे. त्या ठिकाणी रेडमध्ये सहा मुली पकडल्या त्यातील दोन मुली अल्पवयीन होत्या. त्या अल्पवयीन मुलींना तो व्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या दुसरे कोणी नसून त्यांच्या माताच होत्या. अल्पवयीन मुलींच्या बाबतीत बऱ्याचदा कुटुबातील किंवा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37928..... श्री. कपिल पाटील .....

कुटुंबाच्या जवळच्या व्यक्तीच कारणीभूत असतात. त्यामुळे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो जेंडर सेन्सटायझेशनचा मुद्दा उपस्थित केला तो सर्वात जास्त महत्वाचा आहे.

न्यायमूर्ती धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली जी समिती नेमली होती त्या समितीने कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत ? या ज्या अल्पवयीन मुली किंवा मुले यांना ज्या प्रसंगाला तोंड द्यावे लागते त्यामध्ये पोलिसांकडे बॉडीमॅप सुध्दा कळत नसतो. तो अत्याचार आहे किंवा काय आहे हे पोलीस अधिकाऱ्यांना सुध्दा कळत नाही. त्या लहान मुलींना नेमके काय झाले हे नीट सांगता येत नाही. अत्यंत घाणेरडे प्रकार होत असतात. जर ती तक्रार नोंदली गेली नाही तर पुढची कोणतीही कारवाई होत नाही. म्हणून त्या बाबतचे पोलिसांचे प्रशिक्षण वेगळ्या पध्दतीने आणि कठोरपणे करावे लागेल. या क्षेत्रात काम करणाऱ्या सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे असतील किंवा ॲड. ॲलेक्स असतील अशा लोकांची मदत घेऊन पोलीस अधिकाऱ्यांचे वेगळे प्रशिक्षण करावे लागेल. कारण लहान मुली किंवा मुलांच्या बाबतीत जे वाईट घडते त्या बाबतीत बऱ्याचदा तो अत्याचार आहे किंवा बलात्कार आहे हे लक्षात येत नाही. या बाबतीत शासन काय करणार आहे ? न्यायमूर्ती धर्माधिकारी समितीने सुचविलेल्या शिफारशींचा संदर्भ माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दिला त्या बाबतीत काय करणार ? मी केवळ पोलिसांना दोष देत नाही. कारण ते सुध्दा आपल्या व्यवस्थेचा आणि समाजाचा भाग आहेत. एकूण प्रबोधनाच्या बाबतीत काय कार्यवाही होणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये महिला सुरक्षित असल्या पाहिजेत, त्यांच्या संदर्भातील कायदे पोलीस कर्मचाऱ्यांनाही समजले पाहिजेत आणि त्यांच्यासाठी केलेल्या कायद्यांची जाणीव त्यांनाही झाली पाहिजे, कायद्यामध्ये ज्या त्रुटी असतील त दूर कराव्या म्हणून न्यायमूर्ती धर्माधिकारी समिती गृह विभागाने पुढाकार घेऊन दोन वर्षापूर्वी नेमली. मला या समितीला मनापासून धन्यवाद द्यावयाचे आहेत की, या समितीने आतापर्यंत खूप काम केले आहे. राज्यात कानाकोपऱ्यात फिरुन सर्व पक्षाच्या महिला आमदार असतील, एनजीओ असतील त्यांना घेऊन या समितीने काम केले. या समितीने राज्यभर अनेक दौरे केलेले आहेत. ज्यावेळी त्या समितीचा अहवाल येईल त्यावेळी या समितीवर झालेला खर्च सुध्दा सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

ता. प्र. क्र. 37928..... श्री.आर.आर.पाटील....

अत्यंत कमी खर्च करुन जास्त दौरे करुन त्यांनी आपल्या तीन अंतरिम अहवालातून जवळजवळ 87 शिफारशी केलेल्या आहेत. हा सर्व अहवाल आल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा मी आणि महिला बालकल्याण मंत्र्यांनी पुढाकार घेऊन 87 पैकी 67 शिफारशी तत्वत: स्वीकारुन त्याची कार्यवाही आपल्या राज्यामध्ये सुरु केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37928..... श्री.आर.आर.पाटील....

अगदी पोलिसांना याबाबत संवेदशनशील बनविण्यापासून समुपदेशन केंद्र सुरु करण्यापर्यंत तसेच महिला आरोपीला अटक केल्यापासून तिला देण्यात येणाऱ्या वागणुकीपर्यंत अनेक बाबतीत खोलात जाऊन शिफारशी केलेल्या आहेत. आणखी एक अहवाल त्या कमिटीकडून येणे शिल्लक राहिलेले आहे. ज्यावेळी हा अहवाल येईल त्यावेळी त्या कमिटीने केलेल्या ह्या शिफारशी संपूर्ण देशाला मार्गदर्शक ठरतील असा चांगला अहवाल ती समिती देईल असे एकूण तीन अहवालांवरुन मला वाटते. पोलिसांना सेन्सटाइज करण्याच्या बाबतीत महिलांना संरक्षण देण्यासंबंधी जे नवीन कायदे केलेले आहेत त्याचे वर्कशॉप घेण्यासाठी वेगवेगळे तज्ज्ञ वकील देऊन महिलांचे गुन्हे चालविलेले आहेत. अशा वकिलांना नेमून त्यांचे वेगवेगळ्या ठिकाणी वर्कशॉप सुरु केलेले आहेत. पोलीस निरीक्षक व त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांना या कायद्याची माहिती होईल अशा उपाययोजना शासनाने यापूर्वीच सुरु केलेल्या आहेत.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, अल्पवयीन मुलींना पळवून वेश्याव्यवसायात ढकलण्याचे प्रकार महाराष्ट्रात बऱ्याच संघटित टोळ्या करीत आहेत. पोलिसांनी हलगर्जीपणा केल्यामुळे पोलिसांना निलंबित करुन पोलीस दलाला एक संदेश दिलेला आहे. परंतु जे कायदे अस्तित्वात आहेत, त्याची जरब गुन्हेगारी टोळ्यांना बसली पाहिजे. कारण हा गुन्हा कोणी एक माणूस करीत नाही. संघटित गुन्हेगार आहेत त्यांच्यावर जरब बसविण्यासाठी मोक्का कायदा आणला आहे. अशा गुन्ह्यात जे आरोपी सापडतात त्यांना मोक्का कायदा लावला जाईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : अशा घटनांमध्ये जे मदत करतात किंवा त्यांच्या पाठीमागे राहून पाठिंबा देतात त्यांच्यावरही कारवाई केलेली आहे. मोक्का कायदा लावण्यासाठी त्या आरोपीवर अगोदरचे दोन चार्जशीट असणे आवश्यक असते. अशा गुन्ह्यातील सर्व आरोपींपैकी एकदा आरोपी मोक्का लावण्यासाठी पात्र असेल तर अशा घटनेत काम करणाऱ्या सर्व आरोपींना मोक्का लावता येईल. परंतु कोणावरही पूर्वीची चार्जशीट नसतील तर त्यांच्याविरुध्द मोक्का कायदा लावणे शक्य होत नाही. म्हणून जेथे मोक्का कायदा लावणे शक्य आहे तेथे मोक्का कायदा लावला जाईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, शिर्डी येथे जात असताना त्या मुलीचे अपहरण झालेले आहे. या गुन्ह्याची नोंद अहमदनगर पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यास गेल्यावर तेथील पोलिसांनी हा गुन्हा आमच्या हद्दीत येत नाही. तुम्ही धुळे पोलीस स्टेशनमध्ये जावे असे सांगितले. त्यामुळे याबाबतचा गुन्हा धुळे पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आला आहे.

सभापती महोदय, पोलीस स्टेशनमध्ये गेल्यावर असे अनेकदा घडते. हा गुन्हा आमच्या हद्दीत येत नाही, दुसऱ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये येतो असे सांगून महिलांचे किंवा त्या घटनेचे गांभीर्य कमी केले जाते. त्यामुळे कोणत्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुन्हा घडलेला आहे हे न पाहता तक्रार करण्यासाठी आलेल्या तक्रारदारांकडून गुन्हा नोंदवून घेतला पाहिजे व त्यानुसार पोलिसांनी पुढील कारवाई केली पाहिजे, अशा प्रकारच्या काळजी घेतली जाईल का ?

श्री.आर.आर.पाटील : अशाप्रकारच्या सूचना यापूर्वीच दिलेल्या आहेत. पोलीस स्टेशनने हद्दीचा वाद घालत बसून इकडे जावे, तिकडे जावे असे बाधित लोकांना सांगू नये. ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत झिरो कलमाखाली गुन्हा रजिस्टर होईल आणि ज्याचे ज्युरिक्डिशन असेल तेथे तो गुन्हा पोलीस वर्ग करतील. अशा सूचना दिलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे प्रोसिजर महाराष्ट्रात कित्येक वर्षापासून सुरु आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई-पुणे महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना

(3) * 37466 श्री.संजय दत्त , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.मोहन जोशी , श्री. शरद रणपिसे , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.धनंजय मुंडे , श्री.सतीश चव्हाण , श्री.अमरसिंह पंडित , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.जयवंतराव जाधव , श्री.नागो गाणार , श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.किरण पावसकर , श्री.नरेंद्र पाटील , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.अनिल भोसले , श्री.विजय सावंत , ॲड.आशिष शेलार : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई-पुणे दरम्यानच्या यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गाचा अवलंब करणारे बहुतांशी वाहनचालक हे ताशी 80 किलोमीटर ही निर्धारीत वेग मर्यादा डावलून ताशी 120 ते 150 या वेगाने गाडया चालवित असल्याने वारंवार अपघात घडत असून या वाहनचालकांना अटकाव करण्यासाठी पालिसांकडे तसेच टोलवसुली व दुरुस्ती देखभालीची जबाबदारी असलेल्या आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडकडे पुरेसे मनुष्यबळ व अत्याधुनिक यंत्रणा नसल्याचे माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वाढलेल्या अपघातात गत वर्षात 108 नागरिकांचा तसेच दिनांक 28 जानेवारी 2013 रोजी दोन मोटारींच्या झालेल्या अपघातात 5 जणांचा व सिनेअभिनेत्यांसह अनेक प्रवाशांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) तसेच पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील अपघातांना कारणीभूत ठरु शकणाऱ्या 350 पॅनेलची दुरुस्ती रखडली असल्याचे माहे जानेवारी, 2013 च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(5) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानूसार उक्त महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी तसेच 350 पॅनेलची दुरुस्ती करण्याबाबत व पायाभूत सुविधा तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) होय, हे खरे आहे.

(2) मुंबई - पुणे महामार्गावर सन 2012 मध्ये एकूण 364 अपघात झाले असून, या अपघातात 143 जणांचा मृत्यू झाला आहे. दि. 23.12.2012 रोजी झालेल्या अपघातात दोन सिनेअभिनेत्यांसह एका मुलाचा मृत्यू झाला आहे. दि. 28.1.2013 रोजी झालेल्या अपघातात 5 जणांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे.

(3) हे खरे नाही.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा कॉंक्रिटचा रस्ता असून, सदर रस्त्यावर सुमारे 1.22 लाख कॉंक्रिटचे पॅनल्स आहेत. सदर पॅनल्सच्या दुरुस्तीचे काम कंत्राटदारामार्फत सतत सुरु असते. तसेच, द्रुतगती मार्गावरील पॅनल्स नादुरुस्त असल्यामुळे अपघात होत असल्याचे आढळून आलेले नाही.

(4), (5) व (6) प्रश्न उद्‌भवत नाही.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37466.....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, एकेकाळी राज्याची शान मानला जाणारा हा रस्ता सध्या मृत्यूचा सापळा होत चालला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, एखाद्याने आपल्या घरच्या लोकांना मी मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वरुन पुण्याला जात आहे असे सांगितल्यावर घरची माणसे त्याला काळजी घे असे सांगतात. प्रत्येक अधिवेशनामध्ये या एक्सप्रेस-वे बाबत चर्चा होत असते, त्याला शासनाकडून उत्तरही दिले जाते. परंतु या रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. "हंगामा करना हमारा मकसद नहीं, दर्द का इलाज चाहते हैं." माननीय ज्येष्ठ मंत्री श्री.आर.आर.पाटील हे संवेदनशील मंत्री आहेत. त्यांनी स्वत: या रस्त्याची पाहणी केलेली आहे. म्हणून सर्वांच्या अपेक्षा उंचावलेल्या आहेत.

सभापती महोदय, माझे यासंबंधी 3 प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, या रस्त्यावरील अपघातांचे प्रमाणे दिवसेंदिवस वाढत आहेत त्याच्या कारणांचा शोध घेण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे काय, या रस्त्याचे रोड ऑडिट झालेले आहे का, त्यासाठी कोणत्या उपाययोजना सुचविल्या आहेत आणि सुचविल्या असतील तर अपघात कमी होण्यासाठी त्याचा उपयोग होत आहे की नाही ?

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अपघातातील जखमींना त्वरित उपचार मिळत नसल्यामुळे त्यांना हॉस्पिटलला नेईपर्यन्त त्यांचे प्राण जातात. त्यामुळे त्या मार्गावर अत्याधुनिक सामग्रीने सुसज्ज असलेले ट्रॉमा हॉस्पिटल बांधण्याचा विचार शासन करील काय ? त्या ठिकाणी रोड बॅरिअर्स नाहीत. क्रॉस रोड ॲक्सिडेण्टस वाढत आहेत. इंटरनॅशनल स्टॅण्डर्ड प्रमाणे स्टील वायर रोप बॅरिअर्स टाकण्याचे शासनाचे नियोजन आहे काय, असल्यास ते केव्हा पूर्ण होईल ?

श्री. आर.आर.पाटील. या प्रश्नावर विस्तृत चर्चा व्हावी असे माझे मत आहे. हा हायवे इ ाल्यापासून 854 लोकांचे मृत्यू झालेले आहेत. या रस्त्यावरील अपघातांची संख्या वाढलेली आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. माझ्याकडे आकडेवारी आहे. अपघातांची संख्या 2008, 2009, 2010 आणि 2011च्या तुलनेत 2012मध्ये घटलेली आहे. मात्र मृत्यू पावणा-यांची संख्या वाढलेली आहे. 2008 मध्ये 649 अपघात झाले.गेल्या वर्षी 2012मध्ये 364 अपघात झाले. अपघातांची संख्या घटलेली आहे. परंतु मृत्यू पावणा-यांची संख्या वाढलेली आहे. 2011मध्ये 118 लोक मृत्युमुखी पडले होते. 2012मध्ये 143 लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. मोठया बसेसचे अपघात झालेले आहेत. अपघातांची प्रमुख कारणे अशी आहेत :

अतिवेगाने वाहन चालविणे, धोकादायक वाहन पुढे येणे, मद्यपान, नशापान करुन वाहन चालविणे, क्षमतेपेक्षा जास्त माणसे नेणे, वाहन चालविण्याचे अज्ञान असताना वाहन चालविणे, वाहन सतत चालविण्यामुळे थकवा येणे, वाहतुकीचे नियम, तसेच सांकेतिक व मार्गदर्शक सूचनांकडे दुर्लक्ष करणे, वाहनांना सुस्थितीत न ठेवणे, टायर फुटणे, मानसिक आणि शारीरिक दुर्बलतेने वाहन चालविणे, अशी अपघाताची कारणे आहेत. 70/75 टक्के अपघात हे वाहनचालकामुळे होतात असे सर्वेक्षणातून पुढे आलेले आहे. अतितापमानामुळे टायर फुटणे, दरड कोसळे यामुळे अपघात होतात. 7 ते 9 टक्के अपघात हे पाऊस, धुके, अतितापमानामुळे टायर फुटणे, दरड कोसळणे यामुळे होतात. रस्त्यावर मोकाट गुरे येणे, पादचा-यांच्या चुका, वाहतुकीची कोंडी यामुळे देखील राज्यामध्ये काही ठिकाणी अपधात होत आहेत. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे हा आपण आंतरराष्ट्रीय दर्जाचा केला. परंतु त्यावरील सुरक्षिततेच्या उपाययोजना मात्र आंतरराष्ट्रीय दर्जाच्या झालेल्या नाहीत. काही ठिकाणी रोड डिव्हायडर बसविण्याची गरज आहे. एमएसआरडीसीने वायर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बसविणे, रोड डिव्हायडर बसविणे, पोलीस वाहतुकीवर नियंत्रण ठेवतील अशा पध्दतीने कारवाई करणे या गोष्टी करायला घेतलेल्या आहेत. काल या प्रश्नाची चर्चा विधानसभेमध्ये झाली. आज पोलीस दलातील कर्मचारी त्या रस्त्यावर काम करीत आहेत. त्यामध्ये 25 टक्के वाढ करण्याचा निर्णय गृह विभागाने घेतलेला आहे.

या प्रश्नाचे ब्रिफिंग घेताना ही गोष्ट लक्षात आली की, जास्त वजनाची वाहने रस्त्यावर येत आहेत. अशा वाहनांवर नियंत्रण आणण्यासाठी परिवहन विभागाकडे कमी मुनष्यबळ आहे. सभागृहात उत्तरासाठी येण्यापूर्वी मी माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. परिवहन विभागामध्ये सुध्दा वाहनांच्या तुलनेमध्ये मनुष्यबळ खूप कमी आहे. काही पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याबरोबरच वाढलेल्या वाहनांच्या तुलनेत परिवहन विभागातील पदे वाढविण्यासंबंधीचा निर्णय सरकारला तत्वत: मान्य आहे. लवकरात लवकर ती पदे भरली जातील. पोलिसांनी जे ब्लॅक स्पॉट निश्चित केलेले आहेत तेथे लवकरात लवकर दुरुस्ती करण्याची भूमिका घेतलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37466.... श्री.आर.आर.पाटील...

त्या महामार्गावर अपघाताने मृत्यू होतात त्याचे सगळयात मोठे कारण असे आहे की, एखादा अपघात झाल्यानंतर जखमी व्यक्तींना लवकर मेडीकल ट्रिटमेंट मिळत नाही. त्यांना ॲम्ब्युलन्सने रुग्णालयात दाखल करावे लागते, दरम्यानच्या काळात काही जखमींचा मृत्यू होतो. म्हणून त्या ठिकाणी ट्रामा सेंटर्स सुरु करणे याही गोष्टीची सुरुवात लवकरच केली जाईल.

(अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी परवानगी मागतात.)

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपण्यास फक्त 15 मिनिटांचा अवधी शिल्लक आहे. या प्रश्नावर उप प्रश्न विचारण्यास अजून 15 मिनिटांचा वेळ दिला तरी प्रश्न विचारणाऱ्या सर्व सदस्यांना मी न्याय देऊ शकेन असे मला वाटत नाही. याबाबतीत मी असा निर्णय घेतला आहे की, या प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहात एक तासाची चर्चा ठेवावी. या तारांकित प्रश्नावर अजून 10 मिनिटांचा जरी वेळ दिला तरी मी जास्त सन्माननीय सदस्यांना न्याय देऊ शकणार नाही. या प्रश्नाच्या अनुषंगाने माननीय गृहमंत्र्यांनी अतिशय चांगले उत्तर दिलेले आहे. या प्रश्नावरील चर्चा संपलेली आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहात एक तासाची चर्चा ठेवण्यात येईल. ती चर्चा पुढील आठवण्यात ठेवण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या संबंधित मंत्र्यांना देखील त्या चर्चेच्या वेळी उपस्थित राहण्याबाबत सूचना द्याव्यात.

सभापती : ठीक आहे.

श्री.शरद रणपिसे : या प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहात एक तासाची चर्चा घेण्यात येणार आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने ज्या सन्माननीय सदस्यांनी उप प्रश्न विचारले असतील, त्यांना चर्चेच्या वेळी प्राधान्य देण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : जरुर त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुळशी (जि.पुणे) येथील कुळ कायदा उपजिल्हाधिकारी यांचेकडील बेहिशोबी संपत्तीबाबत

(४) * ३६८७६ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५६२३ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.किरण बापू महाजन, उप जिल्हाधिकारी, कूळ कायदा शाखा, पुणे यांच्या राहत्या घराच्या घर झडतीमध्ये दिनांक १२ सप्टेंबर, २०१२ रोजी लाचलुचपत विभागाला रूपये १ कोटी ९५ लाख ७९ हजार ४९६ इतकी रक्कम स्थावर व जंगम मालमत्ता आढळून आल्याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, डॉ.किरण महाजन, उपजिल्हाधिकारी, कुळ कायदा शाखा पुणे व राजेश शिवाजी रणदिवे, कनिष्ठ लिपीक कुळ कायदा शाखा पुणे यांच्या विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १८८ अन्वये दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आल्यावर श्री. राजेश रणदिवे यांना दिनांक १७ सप्टेंबर, २०१२ पासून निलंबित केले आहे परंतु डॉ.किरण महाजन यांचेविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) डॉ.किरण महाजन व श्री. राजेश रणदिवे यांचे विरूध्द मार्फत खातेनिहाय चौकशी सुरू करण्यात आली आहे काय असल्यास, केव्हापासून चौकशी सुरु केली आहे,

(४) नसल्यास, चौकशी सुरू न करण्याची कारणे कोणती आहेत?

श्री. आर.आर.पाटील : (१) डॉ.किरण बापू महाजन, उपजिल्हाधिकारी, पुणे यांचे राहते घराच्या घरझडतीमध्ये रुपये १,९५,७९,४९६/- किंमतीची स्थावर व जंगम मालमत्ता मिळून आलेली आहे. सदर मालमत्तेबाबत त्यांचेविरुध्द उघड चौकशी चालू आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आल्यावर, सदर गुन्ह्यातील आरोपी, लोकसेवक श्री. राजेश शिवाजी रणदिवे, कनिष्ठ लिपिक, कुळ कायदा शाखा, पुणे यांना दिनांक १७ सप्टेंबर, २०१२ पासून निलंबित केले आहे. डॉ.किरण बापू महाजन, उपजिल्हाधिकारी, कूळ कायदा शाखा, पुणे यांना ४८ तासापेक्षा कमी कालावधीसाठी अभिरक्षेत ठेवल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांची दि. १३/१२/२०१२ अन्वये, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक-१, या अकार्यकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित अपचाऱ्याविरुध्दच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडून अप्राप्त आहे.

३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी कनिष्ठ लिपीक श्री.शिवाजी रणदिवे याला सस्पेंड केलेले आहे. कनिष्ठ लिपीक श्री.शिवाजी रणदिवे हा तुरुंगात ४८ तासापेक्षा कमी होता. परंतु या प्रकरणाशी संबंधित उप जिल्हाधिकारी यांना मात्र सस्पेंड करण्यात आले नाही. त्यांना सेवेतच ठेवले आहे. कनिष्ठ लिपीक श्री.शिवाजी रणदिवे यांना का सस्पेंड करण्यात आले आहे, त्यांच्यावर कोणते आरोप आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : या प्रकरणी तक्रारकर्ता यांच्याकडे त्यांनी २ लाख रुपयांची लाच मागितली होती. लिपीकासाठी ५० हजार आणि उप जिल्हाधिकारी यांच्यासाठी १.५० लाख अशी एकूण २ लाख रुपयांची लाच मागितली होती. या प्रकरणाचे ॲन्टी करप्शन विभागाकडे पाहिजे तेवढे पुरावे आहेत. एका तांत्रिक कारणासाठी उप जिल्हाधिकारी यांना महसूल विभागाने सस्पेंड केले नाही. शासकीय कर्मचाऱ्याला ४८ तासाची कस्टडी मिळाली तर त्या कर्मचाऱ्यास सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे आपण सस्पेंड करीत असतो. परंतु उप जिल्हाधिकारी यांना कोर्टाने लवकर जामीन दिल्यामुळे महसूल विभागाने त्यांना सस्पेंड केलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : कनिष्ठ लिपीकास सस्पेंड केले आणि उप जिल्हाधिकारी यांना मात्र सस्पेंड केले नाही.

श्री.आर.आर.पाटील : कनिष्ठ लिपीकास लवकर अटक करण्यात आली होती. त्यांना अटक होऊन ४८ तासांचा कालावधी होऊन गेला होता. म्हणून त्यांना सस्पेंड करण्यात आले. उप जिल्हाधिकारी यांना अटक होऊन ४८ तास पूर्ण झाले नव्हते म्हणून महसूल विभागाने त्यांना सस्पेंड केले नाही. महसूल विभागाची कारवाई सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे बरोबर आहे. परंतु एखाद्या कनिष्ठ कर्मचाऱ्याला आपण सस्पेंड करणार आणि यातील जो मोठा अधिकारी आहे त्याला मात्र सस्पेंड करणार नाही हे योग्य नाही. ही बाब मी आज सकाळी माननीय महसूल मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. या प्रकरणाची फाईल तातडीने मागवून त्यांना सस्पेंड करण्यात येईल अशा पध्दतीची माहिती माझ्या वतीने विधान परिषदेत सांगावी असे मला त्यांनी सांगितले.

श्री.दिवाकर रावते : या ठिकाणी अतिशय गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. माननीय गृहमंत्र्यांची माननीय महसूल मंत्र्यांबरोबर या बाबतीत चर्चा झालेली आहे. त्यांनी माननीय

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गृहमंत्र्यांना सांगितले की, ताबडतोब फाईल मागवतो आणि त्यांना सस्पेंड करतो. ही कारवाई होणे अत्यावश्यक आहे. ही बाब माननीय महसूल मंत्री महोदयांच्या लक्षात आलेली आहे. ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिल्याबद्दल मी माननीय गृहमंत्र्यांचे आभार मानतो. हा प्रश्न राखून ठेवावा, सभागृह तहकूब करावे असे माझे म्हणणे नाही. सभापती महोदय, आपण आपल्या अधिकाराचा वापर करुन हा प्रश्न माननीय महसूल मंत्र्यांनी घेतलेला निर्णय जाहीर होईपर्यंत पुढे ढकलावा अशी माझी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय गृहमंत्र्यांनी या प्रकरणाची वस्तुस्थिती या ठिकाणी सांगितलेली आहे. एका व्यक्तीवर झालेला अन्याय आणि दुसऱ्यावर झालेली मेहरबानी असे चित्र या प्रकरणी दिसून येत आहे. ही बाब माननीय गृहमंत्री तसेच महसूल मंत्री यांच्या लक्षात आलेली आहे. ही बाब माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. त्यादृष्टीने तातडीने कारवाई केलेली आहे. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्याचा संबंध येत नाही.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : त्याच्याही सस्पेन्शनची कार्यवाही आम्ही तातडीने करु.

श्री.पांडुरंग फुंडकर : उद्या चौकशी करुन निलंबन जाहीर करणार आहात काय?

श्री.आर.आर.पाटील : चौकशी करण्याची आवश्यकता नाही. त्यांना अटक झालेली आहे. पैसे घेताना सापडले आहेत. त्याच्याकडे 1.5 कोटी रुपयांपेक्षा जास्त मालमत्ता असल्याचे पोलिसांना आढळून आले आहे. अँटी करप्शन ब्यूरोने ओपन इन्क्वायरी करावयास लावली आहे. त्याला कुठेही पाठीशी घातलेले नाही. 48 तास अटकेत न राहिल्याच्या तांत्रिक कारणामुळे निलंबन केले नाही. या प्रकरणातील दोनपैकी एक आरोपी सस्पेंड झाला असून दुसरा आरोपी सस्पेंड होत नसेल तर ते योग्य नाही. महसूल मंत्र्यांनी सुध्दा या आरोपीला सस्पेंड करण्याची भूमिका व्यक्त केली आहे. तातडीने निलंबन करु. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्याची किंवा अधिक माहिती देण्याची आवश्यकता नाही. निलंबन केल्याबरोबर सभागृहाला कळविण्यात येईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, शेतकऱ्याकडून 2 लाख रुपये लाच घेताना उप जिल्हाधिकाऱ्यांना अटक करण्यात आली. 1994 मध्ये हे अधिकारी तहसीलदार म्हणून सेवेत रुजू झाले होते. मागील 18 वर्षाच्या काळात यांनी जमविलेली संपत्ती 100 कोटी रुपयांपेक्षा अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारला माझी विनंती आहे, हे प्रकरण गंभीर आहे. तेव्हा शासनाने या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवून या अधिकाऱ्याला सेवेतून बडतर्फ करण्यात येईल काय?

श्री.आर.आर.पाटील : या अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा हेतू असता तर अँटी करप्शन ब्यूरोने रेड हॅण्ड पकडले नसते, त्याच्याविरुध्द कारवाई केली नसती. या अधिकाऱ्याकडे 100 कोटी रुपयांची मालमत्ता आहे असे माननीय सदस्यांची माहिती असेल तर त्यांनी गुप्तपणे ती माहिती शासनाला द्यावी. सीआयडी काय इतर कोणत्याही यंत्रणेकडे तपास सोपविण्यास शासनाची हरकत नाही. अँटी करप्शन ब्यूरो तेच काम करीत आहे. पोलीस स्टेशनकडून तपास सीआयडी किंवा एसीबीकडे दिला जातो. कारण त्यांनी अधिक खोलात जाऊन तपास करावा आणि कायदा व सुव्यवस्थेमध्ये व्यत्यय येऊ देऊ नये. आणखी कोणाकडून तपास करण्याची आवश्यकता असेल तर सन्माननीय सदस्यांकडे असलेली माहिती आठवडाभरात त्यांनी माझ्याकडे द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पडोली (जि.चंद्रपूर) येथील वखार महामंडळाच्या गोदामावर धाड टाकून सडलेला गहू जप्त केल्याबाबत.

(५) * ३६९६४ श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पडोली (जि.चंद्रपूर) येथील वखार महामंडळाच्या गोदामावर धाड टाकून १ कोटी ७५ लाख ८४ हजार रुपये किमंतीचा सडलेला गहू अन्न व औषधे प्रशासन विभागाने दिनांक २१ जानेवारी, २०१३ रोजी व त्यासूमारास जप्त केल्याचे आढळून आहे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जप्त केलेल्या गव्हाचे नमुने नागपूर येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी प्रयोगशाळेतील तपासणीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, तपासणी अहवालात काय निष्पन्न झाले आहे व त्यानूसार दोषी असणाऱ्या व्यक्तिंविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.मनोहरराव नाईक यांच्याकरिता : (१) हे खरे आहे. तथापि अन्न व औषध प्रशासन, चंद्रपूर कार्यालयाने दि. ७/१/२०१३ रोजी पडोली (जि.चंद्रपूर) येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामावर धाड टाकून रु. १,९५,९४,९७०/- इतक्या किंमतीच्या निकृष्ट दर्जाचा गहू जप्तीची कारवाई केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

(४) तपासणी अहवालात गव्हाचा नमुना कमी दर्जाचा व असुरक्षित असल्याचा अन्न विश्लेषक, नागपूर यांनी घोषित केले आहे. सदर प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी, चंद्रपूर यांचेमार्फत सखोल चौकशी सुरु असून चौकशीय पूर्ण होताच दोषी व्यक्तीविरुध्द अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६, नियम व नियमन, २०११ अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्री महोदयांना उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, वखार महामंडळाच्या गोदामावर धाड टाकून १.९५ कोटी ऐवजी १.८५ कोटी रुपये किंमतीचा गहू जप्त करण्यात आला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, पाच प्रश्न विचारले होते त्यापैकी तीन प्रश्नांची उत्तरे व्यवस्थितपणे दिलेली आहेत. चौथा प्रश्न तपासणी अहवालात काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषी असणा-या व्यक्तीविरुध्द कोणती कारवाई केली असा विचारला होता. या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. विलंबाची कारणे आणि कारवाई न करण्याची कारणे काय आहेत?

अशुद्धीत मत/ध्वनिमुद्रणासाठी नाही

ता.प्र.क्र.३६९६४.....

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, गोदामातील माल प्रयोगशाळेत तपासण्यासाठी पाठविला असता त्याचा अहवाल अनसेफ असा आलेला आहे. किडलेला गहू वापरण्यास किंवा खाण्यास उपयुक्त नसल्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्याचबरोबर गोदामामध्ये हा माल कोणत्या पध्दतीने आला, कोणी ठेवला याचा तपास सुरु आहे. संबंधितांवर निश्चितपणे फूड ॲक्टप्रमाणे कारवाई करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये या प्रश्नाच्या उत्तराकरिता संबंधित मंत्र्यांचे नाव 'श्री.मनोहरराव नाईक' असे नमूद केले आहे. या मंत्रीमहोदयांना गेल्या दहा वर्षाच्या काळात सभागृहात उत्तर देताना आम्ही कधी पाहिले नाही.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 36964.....

श्री. दिवाकर रावते ...

गेल्या 10 वर्षामध्ये मी माननीय श्री. मनोहर नाईक यांना सदनात उत्तर देतांना आम्ही पाहिलेले नाही. सभागृहात सुध्दा मी त्यांना कधी पाहिले नाही. परंतु त्यांचे नाव मात्र नेहमी दिसते. माननीय मंत्री महोदय श्री. मनोहर नाईक यांना या सदनात दाखवून या सदनाचा आपण सन्मान करणार आहात काय ? श्री. मनोहर नाईक नावाचे मंत्री कोण आहेत ? त्यांना गेल्या 10 वर्षापासून या सदनाने त्यांना पाहिलेले नाहीत त्यामुळे कृपया यासंदर्भात आम्हाला माहिती द्यावी.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सभागृहाच्या परंपरे प्रमाणे, पध्दती प्रमाणे माननीय मंत्री महोदयांची ओळख सभागृहाला एकदा करुन दिली जाते. रोज उठून मंत्र्यांची ओळख करुन देण्याची आवश्यकता नाही. मंत्र्यांच्या बाबतीत सन्माननीय रावते साहेब इतके विसरभोळे असतील असे मला वाटले नव्हते.

श्री. विनोद तावडे : सभागृहात रोज आले पाहिजे यासंदर्भात त्यांनी माननीय मंत्री महोदय, श्री. मनोहर नाईक यांना ट्यूशन देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

श्री. नितेश बांगडीया : सभापती महोदय, निकृष्ठ प्रतीचा गहू चंद्रपूर जिल्हयातील गरिबांना वाटला गेल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर नक्कीच दूरगामी परिणाम झालेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, गोदामातून धान्याचे वाटप करण्याच्या आधी धान्याच्या दर्जाबद्दल व सुरक्षिततेबद्दल तपासणी करण्याची यंत्रणा शासन राबविणार आहे काय ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, जो खराब गहू होता तो बाजूला ठेवण्यात आला होता त्यामुळे कोणाच्याही आरोग्यावर दुष्परिणाम होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. एफएसओ धान्याची तपासणी वर्षातून एकदा करीत असतात व यासंदर्भातील संपूर्ण जबाबदारी त्या खात्याचीच असते.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय,मूळ प्रश्न असा आहे की, गोडाऊनमध्ये सडका माल भरुन घेण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांचा संबंध असतो, किंवा सडका माल घेऊन वितरण व्यवस्थेला वाटण्याचे जे अधिकारी काम करतात अशा अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील :सभापती महोदय,सदर माल हा पीडीएसकडे आला व त्याची जबाबदारी आता निश्चित करण्याचे काम सुरु आहे. या प्रक्रियेमध्ये नेमके अधिकारी कोण होते यासंदर्भात अन्न व औषध विभागाच्या माध्यमातून कारवाई करण्याची प्रोसेस सुरु आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुणे शहरातील येरवडा येथील आगा खान पॅलेसची सुरक्षा यंत्रणा सुसज्ज करणेबाबत

(६) * ३७११९ श्री.मोहन जोशी , श्री. शरद रणपिसे , श्री.अनिल भोसले , श्री.अमरनाथ राजूरकर , श्रीमती दिप्ती चवधरी , श्रीमती अलका देसाई , श्री.संजय दत्त , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.एम.एम.शेख : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देश-विदेशातील पर्यटकांचे आकर्षण असलेला पुणे शहरातील येरवडा येथील आगा खान पॅलेसच्या माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान केलेल्या सिक्युरिटी ऑडीटमध्ये या ठिकाणच्या सुरक्षेत अनेक त्रुटी दिसून आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पुण्यस्मारक असलेल्या या ठिकाणाची सुरक्षा यंत्रणा सुसज्ज करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : (१) होय.

(२) दिनांक ३१.१२.२०१२ रोजी येरवडा पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी आगाखान पॅलेस येथील सुरक्षेची तपासणी केली. या तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत आगाखान पॅलेसच्या व्यवस्थापकांना दि.५ जानेवारी, २०१३ रोजी येरवडा पोलीस ठाण्याकडून लेखी कळविण्यात आले. तसेच व्यवस्थापकांनी याबाबत पुरातत्व विभागाला लेखी कळविले आहे.

(३) आगा खान पॅलेस या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमण्यात आले असून इतर सुरक्षा व्यवस्था पूरविण्याबाबतची कार्यवाही पुरातत्व विभागाकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय,उत्तरात म्हटले आहे की, सुरक्षेचे ऑडीट येरवडा पोलीस स्टेशनने केले होते. परंतु केंद्र सरकारकडे आगा खान पॅलेसची संपूर्ण देखभालीचे काम असल्यामुळे राज्य पोलिसांना यासंदर्भात काही करता येत नाही. परंतु माझी आपल्या मार्फत विनंती आहे की, आगा खान पॅलसच्या देखभालीचे काम केंद्र सरकारकडे असले तरी त्या ठिकाणी महात्मा गांधीचे वास्तव्य होते, महादेवभाई तसेच कस्तुरबा गांधी यांची या ठिकाणी समाधी आहे. केंद्र सरकारच्या पुरातत्व विभागाच्या माध्यमातून त्या ठिकाणच्या 16 एकर जागेमध्ये सुरक्षेची जी उपाययोजना करावयास पाहिजे ती त्या ठिकाणी केली जात नाही. त्यामुळे विशेष बाब म्हणून गृहखात्याच्या माध्यमातून सीसीटीव्ही, टेहळणी पथक किंवा पोलिसांच्या संदर्भातील त्या ठिकाणी व्यवस्था करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : ३७११९.....

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी राज्य सरकारने केलेले कोणतेही कन्स्ट्रक्शन किंवा कोणत्याही उपाययोजना करु म्हटले तरी त्यासाठी खूप प्रोसिजर असतात व अशा प्रकारच्या परवानग्या पुरातत्व विभागाकडून दिल्या जात नाहीत. या ठिकाणी ठरावीक वेळेनंतर आपल्या कर्मचाऱ्यांना प्रवेश सुध्दा दिला जात नाही. यासंदर्भात आपण काही करावयाचे ठरवले तर ते किती शक्य होईल हे तपासून बघितले जाईल. परंतु अलीकडच्या काळात आंतकवाद्यांनी घडवून आणलेल्या घटना तसेच राज्य सरकारला तसेच पोलीस विभागाला ज्या काही इन्फॉर्मेशन्स मिळतात त्या लक्षात घेऊन आगा खान पॅलेसच्या संदर्भातील सिक्युरीटी ऑडीट आपल्या विभागाने केले होते व त्यांच्याशी पत्रव्यवहार करुन या या उपाययोजना केल्या पाहिजेत असे आम्ही त्यांना कळवले होते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ...

आगा खान पॅलेसच्या हद्दीच्या बाहेर जो बंदोबस्त ठेवणे आवश्यक आहे तो आम्ही जरूर ठेवू.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी सांगितले की,कस्तुरबा गांधी, महादेवभाई देसाई यांच्या समाधी बरोबरच महात्मा गांधी यांचा अस्थिकलश आगा खान पॅलेस मधील गार्डनमध्ये उघड्यावर ठेवला आहे. तेथे सीसीटीव्ही बसविण्यासाठी स्थानिक आमदारांनी किंवा शहरातील आमदारांनी आमदार निधीचा वापर करू द्यावा अशी मागणी केली तर शासन त्याचा विचार करणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ते आपल्या अधिकारात नाही. आमदार स्थानिक विकास निधी द्यायला तयार आहेत ही बाब आम्ही संबंधित ऑथॉरिटीच्या लक्षात आणून देऊ व त्यांच्याकडून परवानगी मिळविण्याचा प्रयत्न करू.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, केंद्रीय पुरातत्व विभाग कसे काम करतो ते मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. नुकतीच आम्ही सिंधुदुर्ग जिल्ह्याला भेट दिलेली आहे. तसेच इतर किल्ल्यांना देखील भेटी दिलेल्या आहेत. तेव्हा आमच्या असे लक्षात आले की, महाराष्ट्रासाठी या विभागाचा वार्षिक नियतव्यय साधारण तीन कोटी रूपयांचा आहे. राज्याच्या पुरातत्व विभागासाठी वार्षिक साडेसात कोटी रूपयांचा नियतव्यय देण्यात येतो. केंद्राचा पुरातत्व विभाग महाराष्ट्रामध्ये निष्क्रियतेने काम करीत आहे. या विभागाने चांगल्या पद्धतीने काम करण्यासाठी राज्य सरकारने केंद्राशी संपर्क साधला पाहिजे. तसेच, राज्य व केंद्राचा पुरातत्व विभाग यामध्ये समन्वय साधण्यासाठी तसेच पुरातन वस्तूंचे जतन करण्यासाठी शासन काही पावले उचलणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदनाच्या भावना केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून देऊ व राज्य सरकारकडे निधी वाढवून मागण्याचा प्रयत्न करू.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, पुरातत्व विभागाकडे परवानगीसाठी अर्ज केलेला आहे. परंतु, अजून परवानगी मिळाली नाही असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. सदर परवानगी कधी मिळणार आहे व हे काम कधी होणार आहे ? यासंबंधात आजच्या वर्तमानपत्रात देखील बातमी आलेली आहे. ही गंभीर बातमी आहे. त्याचा विचार होणे गरजेचे आहे.

(उत्तर देण्यात आले नाही.)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील खाजगी सुरक्षा एजन्सीने सुरक्षा रक्षकांना विना परवाना रायफली दिल्याबाबत

(7) * 38316 श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.हेमंत टकले , श्री.किरण पावसकर , श्री.जयवंतराव जाधव , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.नरेंद्र पाटील , श्री.सतीश चव्हाण : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई शहरात कार्यरत असणाऱ्या व्ही.आर.मॉडर्न इंडिया या खाजगी सुरक्षा एजन्सीने सुरक्षा रक्षकांना विना परवाना रायफली वापरासाठी दिल्याची घटना माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) मुंबईत स्वरक्षणासाठी परवाना देण्यात आलेल्या शस्त्राचा वापर व्यावसायिक कामासाठी केल्याप्रकरणी 21 काश्मिरी सुरक्षा रक्षकांना मुंबई पोलिसांच्या मालमत्ता विभागाने अटक करून त्यांच्याकडून 31 रायफली आणि 193 काडतुसे जप्त केल्याची घटना माहे जानेवारी, 2013 च्या दुसऱ्या सप्ताहात घडली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार स्वरक्षणासाठी दिलेल्या शस्त्राचा वापर व्यावसायिक वापरासाठी करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) नाही.

(2) अंशत: खरे आहे.

मुंबईत पोलिसांच्या गुन्हे शाखेने व्ही.आर.मॉडर्न या खाजगी सुरक्षा एजन्सीच्या आस्थापनेवरील 21 सुरक्षा रक्षकांना दि. 9.1.2013 रोजी त्यांच्या राहत्या ठिकाणी अटक करुन त्यांच्याकडून 21 रायफली व 193 काडतुसे जप्त केली आहेत. अटक आरोपी हे व्ही.आर.मॉडर्न सुरक्षा एजन्सीने बिनशस्त्रधारी रक्षक म्हणून नेमलेले होते. तसेच अटक केलेले सर्व सुरक्षा रक्षक हे जम्मू काश्मीर राज्यातील असून त्यांनी स्वरक्षणासाठी जम्मू काश्मीर राज्यातून प्राप्त केलेली अग्निशस्त्रे, जिवंत काडतुसे व शस्त्र परवाना ही मुंबईत घेऊन आल्यानंतर त्यांची 30 दिवसात पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयास माहिती न देता व नोंदणी न करता सदर अग्निशस्त्र व दारुगोळा जवळ बाळगल्यामुळे त्यांच्याकडून सदर शस्त्र व दारुगोळा जप्त करण्यात आला.

(3) होय.

(4) दिनांक 9.1.2013 रोजी स्वसंरक्षणासाठी परवाना असलेल्या 21 काश्मीरी आरोपींनी जम्मू काश्मीर यांचेकडून प्राप्त केलेली अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे मुंबईत घेऊन आल्यानंतर त्यांची नोंद विहित कालावधीत केली नसल्याने बांद्रा पोलीस ठाणे येथे दिनांक 9.1.2013 रोजी शस्त्र अधिनियम 1959 कलम 30 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदरचा गुन्हा गुन्हे प्रकटीकरण शाखा यांचेकडे तपासासाठी असून शस्त्र अधिनियम 1959 च्या कलम 30 व शस्त्र नियम 1962 च्या नियम 62 (4) चे उल्लंघन झाल्याने कारवाई करण्यात आली आहे. मा.अतिरिक्त महानगर दंडाधिकारी, 37 वे न्यायालय, मुंबई यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. मा.न्यायालयाने अटक आरोपींना प्रत्येकी 1000/- रुपये दंड व एक दिवसाची साधी कैद अशी शिक्षा दिलेली आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

अशासकीय प्रश्न / प्रश्नोत्तरासाठी नाही

ता.प्र.क्र.38316.....

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे. उप प्रश्न क्रमांक 4 च्या उत्तरातील तिसऱ्या ओळीतील "यांच्याकडून" या शब्दा ऐवजी "येथून" असे वाचावे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, परराज्यातून स्व संरक्षणासाठी मिळालेल्या लायसेन्सचा वापर करून आपल्या राज्यामध्ये सुरक्षा रक्षकांना, सुरक्षेचे काम सुरक्षा एजन्सीच्या माध्यमातून पुरविले जाते. आपल्या राज्यातील गृह विभागाने ज्यांना परवाने दिलेले नाहीत अशा लोकांचा सुळसुळाट महाराष्ट्रासह मुंबईत झालेला आहे. विना परवाना बंदूकधाऱ्यांविरूद्ध नुकतीच पोलिसांनी कारवाई करून 21 रायफली आणि 193 काडतुसे हस्तगत केलेली आहेत व त्यांच्या विरूद्ध कारवाई करण्यास सुरूवात केलेली आहे. या राज्यामध्ये विना परवाने बंदूकधारी ज्या एजन्सी आहेत त्यांची आपण चौकशी करणार आहात काय ? आपल्याकडे सुरक्षा मंडळ आहे. या मंडळामध्ये नोंदीत सुरक्षा रक्षक किती आहेत ?

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38316...

श्री.रमेश शेंडगे...

आणि बाहेर कामावर असणारे सुरक्षारक्षक किती आहेत या आकडेवारीमध्ये मोठी तफावत आहे. जे बेकायदेशीर बंदूकधारी सुरक्षारक्षक नेमले आहेत त्यांच्यापासून सुरक्षेला धोका आहे. तेव्हा त्या सुरक्षारक्षकांवर कारवाई करणार आहात काय ? माझा तिसरा प्रश्न आहे की,...

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास संपून पाच मिनिटे झालेली आहेत. अत्यंत महत्वाचा प्रश्न म्हणून प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर देखील मी हा प्रश्न पुकारलेला आहे. आपण प्रश्न विचारण्यासाठी इतका वेळ घेणे योग्य नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा शेवटचा प्रश्न आहे की, पसारा कायद्यांतर्गत आपण परवाने देतो. त्या पसारा अंतर्गत मिळालेल्या परवान्यांना येथे परवानगी देणार आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न म्हणजे "धरले तर चावते आणि सोडले तर पळते" असा आहे. लोकांच्या सुरक्षिततेसाठी खाजगी सुरक्षारक्षकांना सुरक्षेच्या कामासाठी परवाने द्यावे अशी मागणी होती. कदाचित मोठ्या प्रमाणात अशा लोकांच्या हातात शस्त्रे आली तर वेगळा धोका सुध्दा होऊ शकतो अशी शंका वरिष्ठ पोलिसांनी व्यक्त केलेली आहे. केंद्र सरकारच्या कायद्याप्रमाणे आपल्या राज्यात खाजगी सुरक्षारक्षकांना परवानगी दिलेली आहे. पण गेल्या दोन-चार महिन्यांमध्ये काही राज्यांमध्ये ज्या काही घटना घडल्या त्या पाहून नवीन रजिस्ट्रेशनला मी स्वत: स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे नव्याने संस्था रजिस्टर्ड होत नाहीत. पण जुन्या एजन्सींना परवानगी दिलेली आहे. त्यातील काही सुरक्षारक्षक सेल्फ प्रोटेक्शनसाठी दुसऱ्या राज्यातून शस्त्र घेऊन ते सेल्फ प्रोटेक्शन ऐवजी सेक्युरिटीमध्ये गार्ड म्हणून त्याचा वापर करीत आहे. स्वत:च्या संरक्षणासाठी दिलेल्या शस्त्राचा नोकरीसाठी वापर करता येत नाही असा केंद्र सरकारचा कायदा आहे. परंतु असे जर कोणी करीत असेल तर त्याची चौकशी आणि छाननी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या छाननीमध्ये सापडलेली शस्त्रे पोलिसांनी जप्त देखील केलेली आहेत. दुसऱ्या राज्यातील शस्त्र परवाना येथे आणायचा आणि त्याची कोणतीही नोंदणी न करता त्याचा येथे् नोकरीसाठी वापर करायचा असा प्रकार जर कोणी करीत असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38316...

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सोसायटींवर जे सुरक्षारक्षक नेमले जातात ते सुरक्षारक्षक कोणत्या एजन्सीच्या अखत्यारित येतात त्याची चौकशी होत नाही. कारण त्या ठिकाणी जे सुरक्षारक्षक नेमलेले असतात ते उत्तर प्रदेश वा अन्य राज्यांतील असतात. तेव्हा या सुरक्षा एजन्सींवर शासनाचे नियंत्रण आहे काय, असेल तर कोणत्या मंडळाचे नियंत्रण आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्याला एजन्सी दिली त्यांचाच कंट्रोल असतो. परंतु त्याची तपासणी करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. पण या संदर्भातील नियमावली अधिक स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे. कोणत्याही राज्यातील सुरक्षारक्षक नेमून त्याच्या हातात शस्त्र देणे हे धोकादायक होऊ शकते. तेव्हा राज्यामध्ये त्याचे किमान किती वास्तव्य असले पाहिजे, त्याने या राज्यातून शस्त्र चालविण्याचा परवाना घेतला आहे काय, अन्य राज्यातील परवाना असेल तर त्याची येथे नोंद केली आहे काय,स्वत:च्या संरक्षणासाठी दिलेले शस्त्र हे नोकरीसाठी वापरता येणार नाही अशी नियमावली करावी लागेल. एखाद्या बँकेमध्ये शस्त्रधारी गार्डची आवश्यकता असेल तर त्या बँकेला शस्त्र घेण्याचा परवाना देण्यात येईल. एखाद्या सोसायटीला शस्त्र परवाना पाहिजे असेल तर आवश्यकतेप्रमाणे सोसायटीला परवाना दिला जाईल. पण अन्य राज्यातून शस्त्र परवाना घेऊन येथे गार्ड म्हणून नोकरी करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, माथाडी मंडळाच्या माध्यमातून मुंबईमध्ये सुरक्षारक्षक माथाडी मंडळाची स्थापना झाली. मुंबईमध्ये औद्योगिक क्षेत्र आहे. बँकेमध्ये अशा सुरक्षा दिल्या जातात. माझा प्रश्न आहे की, माथाडी सुरक्षा मंडळाच्या माध्यमातून शस्त्रपरवाना देण्यासाठी पोलीस विभागाकडे सातत्याने मागणी केलेली आहे. तेव्हा असा शस्त्र परवाना त्यांना देण्यात येईल काय ? मुंबईवर 26.11.रोजी जो हल्ला झाला. त्यानंतर मुंबईमध्ये माननीय गृहमंत्र्यांच्या माध्यमातून नवीन सुरक्षामंडळ राज्य शासनाच्या माध्यमातून स्थापन केले जाईल असे सांगण्यात आले. त्याबद्दल काय कारवाई झाली आणि त्यामध्ये काम करणाऱ्या सुरक्षारक्षकांची नेमणूक कोण करणार आणि त्यांना पगार कोण देणार ?

यानंतर श्री.बोर्डे..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : महोदय, सुरक्षा रक्षक मंडळ ही शासनाची एजन्सी आहे. सुरक्षा रक्षक मंडळाला शस्त्र देता येतील काय, त्यांना परवाना देता येईल काय ही बाब तपासून बघितली जाईल. ज्या आस्थापनेला शस्त्रधारी संरक्षणाची आवश्यकता आहे त्यांनाच शस्त्र परवाना देण्याचे शासनाचे धोरण राहील.

ॲड.अनिल परब : महोदय, परराज्यातून शस्त्र आणून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सुरक्षा एजन्सी मुंबई शहरात काम करीत आहेत. या बाबतची तपासणी ज्या वेळी झाली त्या वेळी बरीच अवैध शस्त्रे सापडली होती. आज मी खात्रीने सांगतो की, सुरक्षा रक्षकांच्या एजन्सीजची तपासणी केली तर ज्यांना 10 शस्त्रांचा परवाना मिळाला आहे त्यांच्या मस्टरवर 20-20 शस्त्रधारी दाखविले जात असल्याचे निदर्शनास येईल. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, अशा सर्व एजन्सीजची चौकशी करुन त्यांच्याकडे परवान्यापेक्षा अतिरिक्त शस्त्रे सापडली तर त्यांच्यावर आर्म ॲक्ट अंतर्गत कारवाई करण्यात येईल काय ? तसेच एका माजी गृह राज्यमंत्र्यांकडे अशाच प्रकारची शस्त्रे सापडली आहेत. इतर ठिकाणांहून ती शस्त्रे मुंबई आल्याची शिफारसही करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करुन त्यात तथ्य आढळले तर त्यांच्यावर आर्म ॲक्ट अंतर्गत कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नातील अर्धा भाग 100 टक्के बरोबर आहे आणि उर्वरित अर्धा भाग त्यांनी ओढूनताणून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जर सुरक्षा रक्षक परवान्याविना शस्त्रांच्या आधारे नोकरी करीत असतील किंवा स्वसंरक्षणासाठी असलेली शस्त्रे व्यावसायिक कामासाठी वापरत असतील तर ती शस्त्रे जप्त करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. तसेच संबंधित एजन्सीजने विनापरवाना अशा प्रकारची शस्त्रे अप्रत्यक्ष वापरली असतील तर त्यांचे सिक्युरिटीचे लायसेन्स रद्द करण्यात येईल. महोदय, आजपर्यंत जेवढ्या लोकांना शस्त्राचे लायसेन्स दिलेले आहेत त्याचे व्हेरीफिकेशन प्रकरणनिहाय सुरु केलेले आहे. तसेच माजी गृह राज्यमंत्र्यांना जे शस्त्राचे लायसेन्स दिले होते ते कोठेही सिक्युरिटीसाठी वापरले जात नाही. जे अनधिकृत लायसेन्स असतील ते जप्त करण्यात येतील. तसेच ज्या एजन्सीज अनधिकृत शस्त्र वापरतात त्यांचे लायसेन्स रद्द करुन एजन्सीच्या मालकावर कारवाई करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : महोदय, हा प्रश्न वारंवार या सभागृहात आलेला आहे. मागे ज्यावेळी हा प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळी माननीय मंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, 40 एजन्सीवर कारवाई करण्यात आली आहे. महोदय, स्वसंरक्षणासाठी शस्त्र घ्यायचे आणि त्याचा वापर व्यावसायिक स्वरुपाच्या कामासाठी करायचा, असे प्रकार सर्रास सुरु आहेत. शिवाय या बदल्यात संबंधितांकडून भरमसाठ पैसे घेतले जातात. व्ही.आर.मॉडर्न एजन्सीवर कारवाई केल्यानंतर आरोपींना 1 हजार रुपये दंड आणि एक दिवसाची साधी कैद देण्यात आल्याचे लेखी उत्तरात नमूद आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, स्वसंरक्षणासाठी घेतलेली शस्त्रे व्यावसायिक कारणांसाठी वापरली जात असल्यामुळे अस्तित्वात असलेल्या कायद्यात सुधारणा करुन संबंधितांवर ठोस कारवाई करण्यात येईल काय ? पोलीस आयुक्तांकडे जाणारे काही बिल्डर आपल्या सोबत एजन्सीची गाडी घेऊन जातात. अशा लोकांवर कारवाई करुन, कायद्यात बदल करण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : महोदय, हे खरे आहे की, कायद्यात बदल करण्याची आवश्यकता आहे. या बाबतचा अभ्यास सुरु आहे. पुढील अधिवेशनात बदलासह कायदा विधानसभेसमोर आणण्याचा माझा प्रयत्न आहे.

श्री.जयप्रकाश छाजेड : महोदय, प्रत्येक अधिवेशनापूर्वी आणि अधिवेशन काळात बेकायदेशीर शस्त्रे सापडण्याचे प्रकार घडतात. बाहेरच्या राज्यातील व्यक्तींना स्वसंरक्षणासाठी शस्त्र दिले जाते. ते गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्यामुळे त्यांनी या ठिकाणी येण्याचे कारणच काय ?

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38316..... श्री. जयप्रकाश छाजेड ....

बाहेरच्या राज्यातून शस्त्र घेऊन आणि परवाना घेऊन या ठिकाणी आल्यानंतर ज्या खाजगी संस्थांमध्ये ते वापरले जातात त्या संस्थांची परवानगी रद्द करणार का ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न परत विचारावा.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, बाहेरुन प्रोटेक्शन घेऊन येणारे जे लोक असतात त्यांना स्वत:च्या सुरक्षेकरिता त्यांच्या राज्यामध्ये शस्त्र लागते याचा अर्थ ते त्यांच्या राज्यामध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीचे म्हणून माहीत असणारे असतील. अशी माणसे एक्झम्पशन दिलेल्या एजन्सीमध्ये गार्ड म्हणून काम करीत असतील तर अशा एजन्सीचे लायसन्स रद्द करणार का ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी दोन्ही प्रश्नांची उत्तरे दोन-दोन वेळा दिलेली आहेत. बाहेरच्या राज्यात लायसन्स घेऊन येतात त्या संदर्भात आतापर्यंत राज्य सरकारने ऑल इंडिया लायसन्स देण्याची तरतूद होती. परंतु आता केंद्र सरकारने कायद्यामध्ये बदल केला आहे. राज्य सरकार त्या राज्यासह जास्तीत जास्त जवळ असलेल्या 2 राज्यांचा परवाना देऊ शकते. त्यामुळे 3 राज्यांचाच परवाना मिळू शकतो. त्यामुळे आता जर कोणाला लायसन्स घ्यावयाचे झाले तर संबंधित राज्याचे लायसन्स घेऊन आतापर्यंत जे देशभर फिरता येत होते ते आताच्या कायद्याप्रमाणे बंद झाले आहे. आता ऑल इंडियाचे लायसन्स घ्यावयाचे असेल तर केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाचीच परवानगी घ्यावी लागेल. ती परवानगी राज्य देऊ शकत नाही. राज्य सरकार जास्तीत जास्त तीन राज्यांचा परवाना देऊ शकते. त्यामुळे बाहेरच्या राज्यात लायसन्स घेऊन आपल्या राज्यामध्ये आतापर्यंत जी शस्त्रे येत होती त्यावर केंद्र सरकारने कायद्यात केलेल्या बदलामुळे आपोआप मर्यादा येणार आहेत.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

मी आज असे बघितले की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये ओढूनताणून आपण सहा प्रश्नापर्यंत आलो. पहिल्या दोन प्रश्नांमध्ये 32 मिनिटे गेली. त्या नंतरच्या कालावधीमध्ये पाच प्रश्न चर्चेसाठी पुढे आले. अनुक्रमाक 7 वरील प्रश्नामध्ये एक महत्वाची बाब होती की, मुंबईत अनेक मार्गाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

सभापती .....

बेकायदेशीर शस्त्रे येतात. त्या अनुषंगाने मी हा प्रश्न विशेष बाब म्हणून चर्चेला घेण्याची परवानगी दिली. या पुढच्या काळामध्ये कोणताही महत्वाचा प्रश्न चर्चेला आला तरी दहा मिनिटांच्या वर परवानगी द्यायची नाही असे मी ठरविले आहे. अन्यथा अनेक प्रश्नांवर अन्याय होतो. पहिले दोन किंवा तीन प्रश्न होतात ते सदस्य या सभागृहातून खुशीने बाहेर जातात. परंतु ज्या सन्माननीय सदस्यांचे प्रश्न चर्चेला येत नाहीत ते नकळत सभापतींवर देखील नाराज होतात आणि एवढे प्रयत्न करुन सुध्दा आपल्याला न्याय मिळाला नाही अशी भावना त्यांच्यामध्ये निर्माण होते. म्हणून मी हा निर्णय सर्व सदस्यांच्या नजरेस आणून देत आहे. कोणताही प्रश्न असला तरी दहा मिनिटांमध्ये 7 उपप्रश्न विचारता येतात. प्रश्न विचारण्याच्या अगोदर प्रश्न सहा मिनिटे डेव्हलप केला जातो हे जे डेव्हपमेंटचे मार्ग आहेत ते कापण्याचे मी ठरविले आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात आपण 12 ते 15 प्रश्नांपर्यंत जात होतो.

सभापती : त्यादृष्टीनेच मी प्रयत्न करीत आहे.

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्र्यांनी सुध्दा पॉइन्टेड उत्तर दिले पाहिजे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रश्नामध्ये आपण स्वत: जातीने लक्ष घालल्यामुळे हा मोठा प्रश्न सुटलेला आहे. त्याबद्दल आम्ही आपले आभार व्यक्त करतो, अभिनंदन करतो.

सभापती : शिक्षकांच्या मागण्यांच्या संदर्भात ज्या पध्दतीने त्यांनी उपोषण केले होते त्या संदर्भात या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांनी त्याच बरोबर राज्य सरकारने या बाबतीत वेळीच लक्ष घातले, प्रयत्नांची पराकाष्ठा केली म्हणून हा प्रश्न सर्वांच्या प्रयत्नाने सुटलेला आहे. त्यामुळे मी या बाबतीत फार काही केले आहे असे मी स्वत: मानत नाही. पण असे काही विधायक प्रश्न असतील, सामाजिक प्रश्न असतील ते सोडविण्याच्या दृष्टीने सरकारनेही या बाबतीत सतत तीन चार दिवस प्रयत्न केलेले आहेत आणि दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी सुध्दा या बाबतीत लक्ष घातलेले आहे. मी आपणा सर्वांना धन्यवाद देतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपली सूचना चांगली आहे. आम्ही प्रश्न मांडताना अतिशय थोडक्यात मांडत असतो. परंतु मंत्री महोदयांनी सुध्दा त्यांचे उत्तर डेव्हलप करु नये. मंत्री महोदयांचा क्लास घेणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री महोदय जसे उत्तर देतात तशी मंत्री महोदयांनी उत्तरे दिली पाहिजेत.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी देखील तशा प्रकारची सूचना केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी काटेकोर प्रश्न विचारावा आणि मंत्री महोदयांनी सुध्दा अचूक उत्तर देण्याचा जरुर प्रयत्न करावा असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत

सभापती : काल दिनांक 13 मार्च, 2013 रोजी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, नागो गाणार, दिवाकर रावते, चंद्रकांत पाटील, रामदास कदम, डॉ.रणजित पाटील, डॉ.दीपक सावंत, श्री.रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.विनायक राऊत, ॲड.अनिल परब यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून पुढील विषयावर चर्चा करण्याची सूचना दिली होती. वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या संपामुळे राज्यातील महाविद्यालये बंद असणे, लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागणे, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामावर बहिष्कार घातल्यामुळे 80 लाख उत्तरपत्रिका पडून असणे, 12 लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येणे, असे असतानाही महाविद्यालयातील शिक्षकांच्या मागण्यांबाबत राज्य शासनाकडून जाणीवपूर्वक चालढकल करण्यात येणे, हा विषय सभागृहात मांडला गेला होता. त्यावेळी या विषयाबाबतचा निर्णय नंतर देण्यात येईल असे मी काल घोषित केले होते. त्यानुसार आज दिनांक 14 मार्च, 2013 रोजी मी माननीय उप मुख्यमंत्री, माननीय शिक्षण मंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षाचे गट नेते यांच्याबरोबर चर्चा केली आहे. काल माननीय शिक्षण मंत्र्यांनी सभागृहात सविस्तर निवेदन केलेले आहे. चर्चेअंती या विषयावरील बरेच मुद्दे सुटले असल्यामुळे मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

आज सकाळी 9 वाजून 8 मिनिटांनी सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, ॲड.अनिल परब, सर्वश्री आशिष शेलार, विनायक राऊत यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सूचनेत भंडारा जिल्ह्यामध्ये तीन अल्पवयीन मुलींवर झालेला बलात्कार व खून असा विषय नमूद केलेला आहे. हा विषय नियम 289 अन्वये कसा होऊ शकतो या संबंधी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, भंडाऱ्यामध्ये तीन अल्पवयीन मुलींवर बलात्कार होऊन त्यांचा खून होऊन आज एक महिना झालेला आहे. भंडाराच जिल्हा नव्हे तर चंद्रपूर, नागपूर, पुणे, अहमदनगर, जालना, संभाजीनगर, बीड व अकोला अश अनेक जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या पध्दतीने अल्पवयीन मुलींवर अत्याचाराची प्रकरणे घडलेली आहेत. सांगली जिल्ह्यातही महिलांवरील अत्याचाराच्या घटना घडलेल्या आहेत. या लहान मुलींच्या अत्याचार व बलात्कारासंबंधी केवळ प्रसिध्दी होते म्हणून त्याची दखल घ्यावयाची हा भाग नाही. भारताचे सरन्यायाधीश अल्तमश कबीर यांनी याकडे लक्ष वेधलेले आहे की, निर्भयाच्या प्रकरणात एवढी प्रसिध्दी झाली, पण त्याच दिवशी अशा अनेक घटना घडलेल्या आहेत आणि त्यातील आरोपी पकडले गेलेले नाहीत. परत परत अशा घटना घडत असल्याचे दिसत आहेत. अशा घटनांमध्ये न्याय मिळण्याचे प्रमाण 3 टक्क्यांपेक्षाही कमी आहे. अत्यंत खेदाची गोष्ट अशी आहे की, या संपूर्ण अंमलबजावणीच्या यंत्रणांबरोबर फास्ट ट्रॅक कोर्ट असतील किंवा राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष पद असेल याबाबतची अंमलबजावणी होताना दिसत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

डॉ. नीलम गो-हे...

कायदा व सुव्यस्था, महिलांचे पुनर्वसन व संरक्षण अशा विविध माध्यमांवर सरकारला अपयश आलेले आहे. या संदर्भात सर्वसामान्य लोकांना आणि महिलांना दिलासा मिळेल या दृष्टीने सरकारने काय उपाययोजना केलेल्या आहेत, कोणती पावले सरकारने उचलेली आहेत हे सभागृहाला ज्ञात होणे गरजेचे आहे. तेव्हा आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयला प्राधान्य देऊन चर्चा होण्याच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या तीन महिन्यामध्ये महिलांवर मोठ्या प्रमाणावर अत्याचार झालेले आहेत. भंडारा जिल्हयातील लाखणी येथे 6 वर्षाच्या मुलीचे अपहरण होऊन तिचा मृत्यू झालेला आहे. पोलिसांना अजून गुन्हेगार सापडलेले नाहीत. पोलिसांची टीम तेथे मोठ्या प्रमाणावर काम करीत आहे. एवढे पोलीस असताना तेथून 3 कि.मी. अंतरावर पुन्हा एका महिलेवर बलात्कार होऊन तिचा मृत्यू झालेला आहे. चिमूरमध्ये घटना घडली. पोलिसांनी कोणताही रिपोर्ट सादर न केल्यामुळे त्या मुलीला न्याय मिळू शकला नाही. शेवटी तिने आत्महत्या केली. या सर्व गोष्टी विचारात घेता दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचारामध्ये प्रचंड वाढ होत आहे. बलात्कार, हुंडाबळीच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. अशा घटना रोखण्यामध्ये पोलिसांना अपयश आलेले आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. न्यायालयांची संख्या कमी आहे, महिला पोलिसांची संख्या कमी आहे. परिणामी न्याय मिळण्यासाठी विलंब होतो. या सर्व गोष्टींमुळे राज्यातील जनतेमध्ये आणि विशेषत: महिलांमध्येय मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झालेला आहे. हा अतिशय गंभीर विषय असल्यामुळे आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा होणे गरजेचे आहे. राज्यातील महिलांना शासनाकडून न्याय मिळेल अशी या सभागृहामधील महिलां सदस्यांची अपेक्षा आहे. तेव्हा आजचे कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा घ्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती : नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. भंडारा जिल्ह्यातील एकाच घरातील तीन मुलींवर अत्याचार होऊन त्यांचा खून होणे असा विषय सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

यांनी या ठिकाणी मांडलेला आहे. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. या विषयाकरिता मी वेळ देण्याचे ठरविलेले आहे. पुढच्या आठवडयात मी चर्चेसाठी वेळ निश्चित करीन. सन्माननीय विरोधी पक्षनेते व सन्माननीय उप मुख्यमंत्री यांच्या बरोबर चर्चा करुन या विषयावरील चर्चेची वेळ मी निश्चित करीन.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या विषयावरील चर्चेच्या वेळी गृह विभाग, विधी व न्याय विभाग आणि महिला व बालविकास विभाग या तिन्ही विभागाच्या मंत्र्यांची उपस्थिती अत्यावश्यक आहे.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी. : औचित्याचे मुद्दे

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आपणास माहीतच आहे की आज किडनी दिन आहे. महाराष्ट्र आणि जगामध्ये आज किडनी दिन साजरा केला जातो. आज महाराष्ट्रामध्ये किडनी रुग्णांमध्ये, डायलसिसच्या रुग्णामध्ये मोठी वाढ होत आहे. आज हजारो किडनी रुग्ण डायलसिसविना परत जात आहेत. डायलसिस सेंटर्सची राज्यात कमतरता आहे. सर्वसामान्य माणसाला डायलसिस करुन घेणे परवडत नाही. एका वेळी डायलसिस करण्यासाठी 800 ते 1000 रुपये खर्च येतो. दुष्काळी भागामधील यवतमाळ, बुलढाणा, बीड या ठिकाणी पाणी न मिळाल्यामुळे डायलसिसच्या रुग्णांना डायलसिसविना परत जावे लागत आहे. डायलसिससाठी शुध्द पाणी लागते. आरओ प्लॅण्टमधून ते पाणी माणसाच्या शरीरामध्ये जावे लागते. पिण्यासाठी दूषित पाणी मिळत असेल तर डायलसिससाठी कोठून पाणी मिळणार ? डायलसिस रुग्णांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा असा प्रश्न राज्यामध्ये निर्माण झालेला आहे. डॉक्टरांनी देखील किडनी डायलसिससाठी पाणी नाही असे सांगितलेले आहे. वर्तमानपत्रांनी देखील यासंबंधी बातमी दिलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

एका वृत्तपत्राने देखील अशा आशयाची बातमी दिलेली आहे. आजच्या किडनी दिनाच्या दिवशी किडनी रुग्णांचा जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे राज्य शासनाने या बाबतीत ताबडतोबीने लक्ष घालून योग्य ती उपायोजना करावी.

सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अतिशय महत्वाचा विषय या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. किडनी पेशन्टना वारंवार डायलिसिस करावे लागते. डायलिसिस करताना कोणत्या अडचणी येतात या विषयी त्यांनी या ठिकाणी माहिती दिलेली आहे. किडनी रुग्णांचे डायलिसिस करताना अत्यंत शुध्द पाणी लागते. किडनी रुग्णास एक दिवसाआड डायलिसिस करुन घ्यावे लागते. मी स्वत: डायलिसिसचा पेशंट आहे. त्यामुळे डायलिसिसचे गांभीर्य मी ओळखतो. माझी माननीय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांना सूचना आहे की, माननीय आरोग्य मंत्र्यासमवेत आपण चर्चा करावी. या गोष्टीचे महत्व त्यांना सांगा. दुष्काळी विभाग आणि अन्य ठिकाणी डायलिसिस अचूक आणि योग्य होण्याच्या दृष्टीने सरकार काय करु शकतो, आरोग्य विभाग काय करु शकते यादृष्टीने आरोग्य मंत्र्यांसमवेत चर्चा करावी. या बाबतीत तुमचा अहवाल किंवा माहिती मलाही आणि सभागृहालाही सांगावी.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, होय.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, गिरणी कामगारांचा मोर्चा, गिरणी कामगारांचा घरांचा प्रश्ना संदर्भात सातत्याने चर्चा चालू आहे. या संदर्भात दरम्यानच्या काळात बैठका झाल्या. त्या बैठकीत गिरणी कामगारांना घरे देण्याचा विषय चर्चेला आला. आजच आम्ही वृत्तपत्रात वाचले की, एमएमआरडीएची घरे गिरणी कामगारांना देण्यात येणार आहे अशा प्रकारचा शासनाने निर्णय घेतला आहे. शासनाने गिरणी कामगारांना एमएमआरडीएची घरे देण्याचा निर्णय खरोखरच घेतला आहे काय व तसे निर्देश शासनाने दिलेले आहेत काय या बाबतची वस्तुस्थिती सभागृहाला जाणून घ्यावयाची आहे. शासनाने या बाबतीतील माहिती सभागृहाला अवगत करावी अशी माझी या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने विनंती आहे.

सभापती : माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, आपण या बाबतीत स्वत: लक्ष घालावे. संबंधित मंत्र्यांबरोबर आपण चर्चा करावी.

श्री.भास्कर जाधव : मी या बाबतीत लक्ष घालून त्यासंबंधीची माहिती सभागृहाला अवगत करतो.

श्री.विनोद तावडे : एमएमआरडीए आपल्याच अखत्यारित आहे.

श्री. भास्कर जाधव : तो विभाग माझ्याकडे नाही. एमएमआरडीए हे थोडेसे म्हाडा अंतर्गत आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, यूपीएससी हे राज्य शासनाच्या अखत्यारित नाही ही गोष्ट मला मान्य आहे. परंतु युपीएससीने प्रादेशिक भाषां वगळण्या सबंधीचा निर्णय घेतला आहे. तुम्ही जर पदवी इंग्रजीमध्ये घेतली असेल तर यूपीएससीचे पेपर्स इंग्रजीमध्ये देता येतील. परंतु काही पदवीधरांना मराठीतून पेपर्स द्यावयाचे असतील तर त्यास अनुमती नाही. कोणी बंगाली भाषेत पदवीधर झाला असेल व त्याला यूपीएससीचे पेपर्स द्यावयाचे असतील तर त्यास बंगाली भाषेत पेपर्स देता येणार नाहीत. या सभागृहाने प्रादेशिक भाषांचा आग्रह धरणारा एक ठराव पास करुन तो यूपीएससीकडे पाठवावा. अशा प्रकारचा ठराव पाठविण्याची नितांत गरज आहे असे मला वाटते. सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपणच तसा ठराव मूव्ह केला तर ते संयुक्तीक राहील.

सभापती : आपण दररोज सकाळी 10.30 वाजता माझ्या दालनात बसतो. त्या ठिकाणी आपण, माननीय उप मुख्यमंत्री व सदनातील गट नेते उपस्थित असतात. उद्या आपण सकाळी या विषयाच्या बाबतीत चर्चा करु.

श्री.दिवाकर रावते : आजच दुपारी या विषयावर चर्चा करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती : मला या विषयाच्या बाबतीत माननीय उप मुख्यमंत्र्यांशी बोलावे लागेल. तुमच्या बरोबर देखील चर्चा करावी लागेल. म्हणून माझे मत असे आहे की, त्या पध्दतीचा ठराव आपण उद्या करु.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री.रामनाथ मोते, विनोद तावडे,भगवान साळुंखे यांनी " धर्मवीर आनंद दिघे विद्यालय, शहापूर,जि.ठाणे या शाळेतील बहि:स्थ विद्यार्थी शंकर आनंदा उबाळे हा कारेगाव केंद्रावर परीक्षेस असला असता भरारी पथकाचे प्रमुख यांनी सदरचा विद्यार्थी बोगस असल्याचे सांगून परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करुन विद्यार्थ्याचे केलेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी " उरण तालुक्यातील (जि.रायगड) चिरनेर, कळंबसुरे, दिघाटी ग्रामपंचायत हद्दीतील इंद्रायणी डोंगर तलाखर गावच्या जवळ असलेल्या जंगलांना पाच-सहा दिवसांपासून वणवा लागणे, यात रुक्मिणी रामचंद्र ठाकूर या महिलेचा आगीत जळून झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबतीत शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "केंद्रीय लोकसेवा आयोगाने (युपीएससी) आपल्या परीक्षेतून मराठीसह प्रादेशिक भाषांना वगळून मातृभाषांचा केलेला अपमान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "कवडगाव (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथे पोलीस पाटील भरती प्रक्रिया 2012 अंतर्गत रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदाकरिता एकमेव अर्जदार श्री.सुभाष नरसिंग चव्हाण यांना नियुक्ती मिळण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर यांनी "चिंबईगाव, वांद्रे (पश्चिम) मुंबई येथील मच्छीमार कुटुंबीयांना सिने अभिनेता सलमान खान, वडील सलील खान आणि त्यांच्या बॉडीगार्डने जिवे मारण्याची दिलेली धमकी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी "गुटखा तस्करी करणारे सयद अली सयद हसन यांनी दिनांक 12 मार्च, 2013 रोजी सोलापूर भारतचे पूर्णा प्रतिनिधी दिनेश चौधरी यांच्यासह पत्नी व मुलीवर केलेला ॲसिड हल्ला" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया, डॉ.रणजित पाटील यांनी "अकोला शहरातील नेहरु पार्क येथील जलशुध्दीकरण केंद्र बंद पडल्यामुळे तेथील नागरिकांचे पिण्याच्या पाण्यासाठी होत असलेले हाल" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

--- ..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील विविध गावांमध्ये जंगली हत्ती, गवे, रेडे यांनी शेतीमाल, घरे यांचे केलेले नुकसान

मु.शी.: कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील विविध गावांमध्ये जंगली हत्ती, गवे, रेडे यांनी शेतीमाल, घरे यांचे केलेले नुकसान यासंबंधी सर्वश्री विनायक राऊत, विजय सावंत, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कुडाळ तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) पणदुर-मयेकरवाडी आणि डीगस-सुर्वेवाडीत दिनांक २३ फेब्रुवारी, २०१३ रोजी वा त्या दरम्यान मध्यरात्री ३ च्या सुमारास ३ उन्मत जंगली हत्तींनी हैदोस घालून श्री. बी. बी. सावंत यांचे संपूर्ण घर उद्ध्वस्त करुन मालमत्तेचे अतोनात नुकसान करणे, पणदुर-मयेकरवाडी व डीगस-सुर्वेवाडी परिसरात ग्रामस्थांना जंगली हत्ती, गवे व रेडे यांचा नियमीत होणारा त्रास, त्यातून ग्रामस्थांच्या बागा व शेती उध्वस्त होण्याच्या सर्रास घडत असलेल्या घटना, ग्रामस्थांनी गवे, रेडे व हत्ती यांचा बंदोबस्त करावा म्हणून वनक्षेत्रपाल कडावल वन विभाग यांच्याकडे वारंवार मागणी करुनही वनक्षेत्रपालांनी सुरक्षिततेची उपाययोजना न करणे, परिणामी ग्रामस्थांत व शेतकरी वर्गात वाढते भीतीचे, असुरक्षिततेचे व चिंतेचे वातावरण, शासनाने तातडीने जंगली हत्ती, गवे, रेडे यांचा बंदोबस्त करण्यासाठी करावयाची उपाययोजना."

श्री.भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुद्धित प्रत / शीघ्रलिपी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक.1....

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, खास करुन पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हयातून कोकणामध्ये वन्य हत्ती, गवे, रेडे आणि माकडे यांच्यापासून शेतकऱ्यांना प्रचंड उपद्रव होत असून शेतीमालाचे मोठया प्रमाणात नुकसान केले जात आहे. या विषयाबाबत मी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. वन्य हत्ती, गवे आणि रेडे यांनी शेतकऱ्यांचे जे नुकसान केले आहे त्या संदर्भात शेतकऱ्यांना शासनाकडून जी नुकसान भरपाई दिली जाते ती विचारात घेतली तर शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा केली जात आहे असे अत्यंत दुर्दैवाने नमूद करावे लागते.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत....

श्री. सहदेव कृष्णा मयेकर यांचे 4 क्विंटल भात आणि सुपारीच्या एका झाडाचे नुकसान झाले त्यापोटी त्यांना 2,400 रुपये नुकसान भरपाई दिलेली आहे. श्री.बी.बी.सावंत यांची 5 आंब्याची कलमे व 40 केळीची झाडे याकरिता 2,920 रुपये नुकसान भरपाई दिली आहे. तसेच श्री. प्रताप कानडे यांना 5 केळीची झाडे व एका नारळाच्या झाडाकरिता 2240 रुपये नुकसान भरपाई दिलेली आहे. आपल्याकडे नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष म्हटले जाते. एक नारळाचे झाड एका कुटुंबाचे संसार सावरत असते. ज्या झाडांचे नुकसान झालेले आहे, ती लागवडीयोग्य झाडे होती. यामुळे सध्या 2010 च्या नियमानुसार नुकसान भरपाई दिली जात आहे. ती केवळ रोपटयाला दिली जाणारी आहे. झाडाकरिता दिली जाणारी ही नुकसानभरपाई नाही. संबंधित मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, सन 2010च्या नियमामध्ये सुधारणा करुन सुधारित नियमाप्रमाणे धरत्या झाडांना आवश्यक असणाऱ्या सूत्राप्रमाणे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासन काय प्रयोजन करणार आहे? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ...

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली, त्या भावनेशी शासन देखील सहमत आहे. आज जी नुकसानभरपाई दिलेली आहे ती, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार दिलेली आहे. आपणास माहीत आहे की, राज्यात हत्ती नाहीत. मात्र पहिल्यांदा कर्नाटक राज्यातून हे हत्ती सिंधुदुर्ग जिल्ह्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात हत्तींनी केलेल्या नुकसानीकरिता भरपाई देण्याचा स्वतंत्र निर्णय शासनाने घेतला. तसेच नुकसान भरपाई वाढवण्याचा निर्णय देखील या शासनाने घेतला. सध्या जी नुकसान भरपाई दिली जात आहे ती रोपटयाची देण्याऐवजी लागत्या फळझाडाची दिली जावी ,असे सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितले. आज जी नुकसान भरपाई दिली जाते ती फळझाडांवर लागलेल्या फळांच्या नुकसानीकरिता भरपाई दिली जाते. या ठिकाणी आंब्याची कलमे मोडलेली आहेत. तसेच हे हत्ती नारळ, पोफळी, काजू इ. झाडे मोडत आहेत. याचाच अर्थ हत्ती लागती झाडे मोडत आहेत. आपण ज्या वेळी एखाद्या ठिकाणी धरणाचा प्रोजेक्ट तयार करतो, त्यावेळी धरणामध्ये तेथील झाडे गाडली गेली तर कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून किंवा कृषी विभागाच्या माध्यमातून त्याचे

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

सर्वेक्षण केले जाते, व्हॅल्यूएशन केले जाते, झाडांची आयुष्यमर्यादा पाहिली जाते. त्या झाडापासून किती उतपन्न मिळू शकेल याचा विचार करुन नुकसानभरपाई दिली जाते. सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये हा विचार असेल किंवा त्यांना अशा प्रकारची नुकसान भरपाई शासनाने देणे अपेक्षित असेल परंतु आजच आपल्याला तशा प्रकारचा निर्णय करता येणार नाही. झाडांचे नुकसान झालेले आहे, हे मला मान्य आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्या प्रमाणे नुकसान भरपाई देता येणार नाही, असे मंत्री महोदयांनी सांगितले. मग या नुकसान भरपाईचा काय उपयोग आहे ? अशा प्रकारची मदत देता येईल की नाही, याचे मंत्री महोदयांनी एका शब्दात उत्तर द्यावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,मी अद्याप माझे उत्तर पूर्ण केलेले नाही. शासन किती संवेदनशील आहे, हे मला व्यवस्थितपणे येथे सांगावयाचे होते. आजच्या या प्रचलित धोरणानुसार नुकसान भरपाई दिलेली आहे. मात्र फळझाडांचे नुकसान अशा प्रकारे होत आहे याचा विचार देखील आपल्याला करावा लागेल. वन विभागाच्या मार्फत जी नुकसान भरपाई दिली जात आहे, त्याच्या दुप्पट नुकसान भरपाई देण्याचा प्रयत्न सुरु आहे. नारळ, आंबा,काजू, सुपारी या झाडांच्या नुकसानीकरिता संपूर्ण झाडाची नुकसान भरपाई देण्याकरिता वन विभागाकडून पुढाकार घेतला जाईल.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी जी उपाययोजना सांगितली आहे ती विसंगत स्वरुपाची आहे. वन हत्ती व गवा यांच्या बंदोबस्तासाठी फटाके वाजवणे, ढोलताशे वाजवणे, मशाली इ. स्वरुपाची पारंपारिक उपाययोजना केली जाईल, असे निवदेनामध्ये नमूद केले आहे. आपण प्रत्येक घरात फटाके, ढोलताशा आणून ठेवणार आहात काय ? हे हत्ती कोठून येतात व कोठे जातात, त्यांना पाणी व खाण्यासाठी काही मिळते की नाही, याचा विचार केला पाहिजे. या करिता वन विभागाकडून उपाययोजना केली पाहिजे. हे हत्ती कर्नाटक राज्यामध्ये नेऊन सोडणार, असे या पूर्वी सांगितले होते. त्याप्रमाणे हे हत्ती कर्नाटक राज्यात सोडण्याची कायम स्वरुपी उपाययोजना केली जाणार आहे काय ?केवळ फटाके वाजवून काही उपयोग होणार नाही.

यानंतर श्री. भारवि....

अशुद्धीत प्रत / शुद्धीपत्र नाही

श्री.विजय सावंत...

दुसरे असे की, आंब्या आणि नारळाच्या झाडातून 20 ते 50वर्षे उत्पन्न येत असते. त्याचे व्हॅल्युएशन निर्णय घेऊन केले पाहिजे. त्यासंबंधीचा निर्णय शासन किती दिवसात घेणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हे रानटी हत्ती आहेत. ते परराज्यातून आलेले आहेत. हे हत्ती कर्नाटक राज्यात कसे पाठविता येतील यासाठी फटाके वाजवून, वाद्य वाजवून, प्रशिक्षित माहूत बोलावून उपाययोजना करण्यात येत आहेत. या हत्तींची संख्या खूप आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मागच्या वेळी जंगलामध्ये इंग्रजीमध्ये बोर्ड लावले होते की, गो बॅक एलिफन्ट. त्यावेळी हत्तींना इंग्रजीमधील बोर्ड वाचता आला नाही म्हणून आपण आता कानडीमध्ये बोर्ड लावणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी मुळात कोकणातील असल्यामुळे हत्तींनी केलेले अत्याचार, नुकसान मी स्वत: डोळ्याने पाहिलेले आहे. कारण मी तेथील संपर्क मंत्री देखील आहे. मी येथे गांभीर्याने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कायदेशीर स्वरूप कसे देता येईल हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. पण एका गोष्टीचे मला वाईट वाटते. काल-परवा पर्यंत मराठीचा पुरस्कार करणारे लोक आज कानडीचा पुरस्कार करायला लागले, ही अत्यंत खेदाची बाब आहे. हे काही बरोबर नाही. त्यांचा विचार बदलतो आहे. हा मराठी भाषेवर अन्याय आहे. आपण यातील विनोदाचा भाग सोडून द्यावा.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, गो बॅक एलिफंटचा बोर्ड लावलेला फोटो मी मागच्या वेळी सभागृहात दाखविलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना सांगू इच्छितो की, या सदनामध्ये कोकणातील प्रश्न एक तर कधी येत नाहीत. कोकणातील एखादा प्रश्न सभागृहामध्ये आल्यानंतर सांघिकरित्या शासनाकडून कसा न्याय मिळवून घ्यायचा हे आपण बघावे. त्याची टिंगळटवाळी करण्यापेक्षा शासनाचा प्रतिनिधी म्हणून मी त्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तराच्या माध्यमातून सुधारणा करून क्ल्यू दिला. त्याचा आपण उपयोग करून घेण्याचे राहिले बाजूला. मी आपणास अधिकचा क्ल्यू दिलेला आहे. आज आपण कोकणाला काय देत आहोत ?

सभापती महोदय, या हत्तींना परत कसे पाठवायचे याबाबत दोन-तीन गोष्टी आहेत. हत्तींना आपण ठार मारू शकत नाही. हत्तींना परतवून लावण्यासाठी आपण अनेक उपाययोजना करीत आहोत. त्यासाठी आपण सोलर लाईटचे कुंपण घालण्याचा देखील विचार करीत आहोत. याकरिता सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्या डीपीडीसीने 70 लाख रूपये देखील मंजूर केले आहेत. तेथे कुंपण देखील घालता येईल.

तिसरी गोष्ट आहे की, घरी सुकत घातलेला भात हत्तींनी नष्ट केलेला आहे. आपला जो जी.आर.आहे तो काय आहे ? शेतातील पिकाचे नुकसान झाले तर त्यासाठी मदत करण्याची तरतूद आहे. शेतकऱ्यांने घरी आणलेल्या भाताचे नुकसान हत्तींनी केलेले आहे. या हत्तींचे देखील वैशिष्ट्य आहे. ते आपल्याला कदाचित पटणार नाही. हत्तींचा बंदोबस्त करण्यासाठी गुप्त ठिकाणी बैठक घेतली तर ते तेथेच हल्ला करतात. त्यांना कसे काय कळते हेच माहीत नाही. हत्ती त्या घरांवरच हल्ला करतात. अशी अनेक उदाहरणे आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ही चेष्टा आहे.

तालिका सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना सूचना आहे की, आपण खाली बसावे. माननीय मंत्र्यांना त्यांचे उत्तर पूर्ण करू द्यावे. त्यानंतर आपण बोलावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण सोलर लाईट फेन्सिंग बांधत आहोत. त्याच पद्धतीने या शेतकऱ्यांना धान्य साठवण्याकरिता कोठारे बांधून देता येतील काय, याचाही विचार करीत आहोत. तसेच, या संबंधातील नुकसान भरपाई दुप्पट करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. झाडांची नुकसान भरपाई देण्यासाठी शासन पुढाकार घेण्याचा प्रयत्न करील.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव हे सकारात्मक उत्तर देत आहेत म्हणून मला त्यांचे आभार मानले पाहिजेत. त्यांची अशी भावना आहे की, हा कोकणातील प्रश्न आहे आणि कोकणातील लोकांना न्याय मिळाला पाहिजे त्याबद्दल कोणाचेही दुमत नाही. मी प्रश्न डेव्हलप करीत आहे. हा कोकणातील विषय आहे. आपण कोकणाला कधी तरी न्याय द्यावा. काही सन्माननीय सदस्य दहा-दहा मिनिटे प्रश्न डेव्हलप करीत असतात त्यावेळी असा प्रश्न उपस्थित होत नाही. सभापती महोदय, हा प्रश्न पहिल्यांदाच सभागृहात उपस्थित झालेला नाही. हा प्रश्न पन्नासवेळा सभागृहात उपस्थित झालेला आहे. तेव्हा शासनाने त्याबाबत कोणत्या उपाय योजना केलेल्या आहेत ? शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यापेक्षा हत्तींचा कायम स्वरुपी बंदोबस्त करण्याच्या उपाय योजना शासन करणार आहे काय ? इंग्रजी आणि कानडी भाषेत बोर्ड आहे यामध्ये न जाता हत्तींचा कायम स्वरुपी बंदोबस्त कसा करता येईल हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय मंत्री म्हणाले की, लोकांनी गुप्तपणे घेतलेली बैठक हत्तींना कशी कळते आणि ते नेमके त्याच घरावर कसे हल्ले करतात हे माहीत नाही. त्यावर प्रश्नाच्या इतक्या खोलवर गेल्यास त्या प्रश्नाची थट्टा केल्यासारखे वाटते असे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना म्हणावयाचे होते. माझा प्रश्न आहे की, हत्ती, गवे, माकडे हे शेतीचे नुकसान करीत असल्यामुळे त्यांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या उपाय योजना करणार आहात ? हत्तींच्या हैदोसामुळे शेतीचे आणि बागांचे जे नुकसान झालेले आहे त्याचे व्हॅल्युएशन वन विभाग आणि कृषी विभागाकडून करुन घ्यावे. ज्या प्रमाणे पुनर्वसनामध्ये आपण झाडांचे आणि फळबागांचे व्हॅल्युएशन करुन नुकसान भरपाई देतो त्याप्रमाणे त्या ठिकाणी इ ालेल्या माडांच्या झाडांचे व शेतीचे व्हॅल्युएशन करुन त्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल काय ? या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री येथे उपस्थित आहेत. माझी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, शासनाच्या जी.आर.प्रमाणे कोकणातील शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. तेव्हा मी सांगितल्याप्रमाणे झाडांचे व्हॅल्युएशन करुन त्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी अगोदर देखील सांगितले आहे की, आताच्या जी.आर.प्रमाणे शेतकऱ्यांना लागलेल्या फळांची नुकसान भरपाई मिळेल. ही फळझाडे आहेत, त्यांची आयुष्यमर्यादा कोकण कृषी विद्यापीठाकडून तपासून त्याचे व्हॅल्यूएशन केले जाईल. त्यानंतर या संदर्भात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याकरिता वन विभागाला हा विषय मंत्रिमंडळासमोर आणावा लागेल. कारण वित्त विभागाकडून देखील त्याचा सर्व्हे सुरु आहे. आता आपण माकडांपासून होणाऱ्या नुकसानी भरपाई मिळण्याची तरतूद केलेली आहे.तशा पध्दतीने या प्रश्नाच्या बाबतीत शासन सकारात्मक प्रयत्न करील.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, सन 2007 आणि 2010 च्या शासन निर्णयानुसार वन्य प्राणांच्या हल्ल्यामुळे कोणतीही व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्यास तिला 50 हजार रुपये व कोणतीही व्यक्ती मृत झाल्यास किंवा तिला कायम स्वरुपी अपंगत्व आल्यास 2 लाख रुपये नुकसान भरपाई मिळते. माझी मागणी आहे की, या रकमेमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे वन्यप्राण्यांच्या हैदोसामुळे शेतीचे व फळबागांचे जे नुकसान होते त्यामध्ये मिळणारी रक्कम सुध्दा किरकोळ स्वरुपाची आहे. तेव्हा त्या रकमेमध्ये वाढ करण्यात येईल काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, राज्यामध्ये विशेषत: कोकणामध्ये सर्पदंशामुळे मृत्यू होण्याची संख्या जास्त आहे.कारण कोकणामध्ये भातशेती खूप आहे. तेव्हा सर्पदंशामुळे ज्या व्यक्तींचा मृत्यू होईल त्यांचा समावेश शासन निर्णय 2007 आणि 2010 मध्ये करणार काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दुप्पट मिळण्याच्या दृष्टीने शासनाचा प्रस्ताव आहे आणि त्याप्रमाणे प्रयत्न होईल. सर्पदंशामुळे एखाद्या शेतकऱ्याचा मृत्यू झाला तर त्याकरिता आम आदमी विमा योजना आहे. त्यातून त्याच्या कुटुंबीयांना एक लाख रुपये मिळतात. सन्माननीय सदस्यांना मत्स्य विभागाला ज्याप्रमाणे राज्य आणि केंद्र सरकारकडून मदत मिळते त्याप्रमाणे वन विभागाकडून देखील मदत मिळेल काय असे त्यांना सुचवावयाचे आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, ही बाब तपासून पाहिली जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, हत्ती, गवे यासारखे वन्यप्राणी पुन्हा शेतीच्या हद्दीपर्यंत येणार नाहीत म्हणून कायम स्वरुपी उपाय योजना करण्यात येईल काय ?

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, तारेचे कंपाऊंड घालणे, सोलरचे फिन्सिंग करणे असे उपाय आपण करु शकतो. परंतु वन्य प्राणी येणारच नाहीत असे सांगणे अवघड आहे. वन्य प्राणी येऊ नयेत अशाप्रकारचा प्रयत्न जरुर केला जाईल. हत्ती आले नाहीत तर रानगवे किंवा नीलगाय किंवा माकडे आली तर काय करणार,

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

या शिवाय गिधाडांच्या विष्ठेपासून सुध्दा नारळ झाडांचे नुकसान होते. हे सुध्दा आपण समाविष्ट केले आहे. या बाबत योग्य तो प्रयत्न केला जाईल. परंतु शेतामध्ये वन्यप्राणी येणारच नाहीत असे म्हणता येणार नाही.

श्री.विनायक राऊत : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेला सकारात्मक उत्तर दिलेले आहे. परंतु या बाबतची अंमलबजावणी करण्यासाठी हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन या बाबतचा निर्णय जाहीर करेल काय ? तसेच संदर्भाधीन शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचा फायदा मिळवून देण्यासाठी शासन ठोस आश्वासन देईल काय ?

श्री.भास्कर जाधव : महोदय, काल-परवा पर्यंत फळ झाडांऐवजी फळांचे नुकसान झाल्यासच नुकसान भरपाई दिली जात होती. आता परिस्थितीनुसार फळझाडांचे नुकसान झाल्यास त्यांना सुध्दा नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. मी या ठिकाणी चार फळझाडांचा उल्लेख केला. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. मी सकाळी सर्व बाजू तपासून पाहिल्या. या विषयाच्या बाबतीत वित्त विभागाचे थोडेसे वेगळे अभिप्राय आहेत. त्यामुळे या विषयी माननीय वित्त मंत्री तथा उप मुख्यमंत्री यांना या विषयी लवकरात लवकर बैठक आयोजित करण्याबाबत विनंती केली आहे. ती बैठक लवकर झाली आणि त्यामध्ये निर्णय झाला तर तो सभागृहाला अवगत केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील के.ई.एम.रुग्णालयातील यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया बंद असणे.

मु. शी. : मुंबईतील के.ई.एम.रुग्णालयातील यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया बंद असणे, या संबंधी सर्वश्री. विक्रम काळे , हेमंत टकले, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. जयवंतराव जाधव, किरण पावसकर, अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. प्रकाश बिनसाळे, नरेंद्र पाटील, राणा जगजितसिंह पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयातील यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया फेब्रुवारी, २०१३ पासून बंद करण्यांत येणे, राज्यातील व परराज्यातील शेकडो रुग्ण या शस्त्रक्रियेच्या प्रतिक्षा यादीवर असणे, परंतु शस्त्रक्रिया बंद केल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांच्या नातेवाईकांत पसरलेला तीव्र असंतोष, परिचारिका, प्रशिक्षणार्थी डॉक्टर व अवयवदान कार्यक्रमातील तज्ञ यांच्यात असलेला विसंवाद, केईएम रुग्णालयांत परदेशातून प्रशिक्षण घेवून आलेले डॉक्टर्स असताना त्यांचा ज्ञानानुभवांचा उपयोग करुन घेण्यास होत असलेली चालढकल, परिणामी या सेवेपासून आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेले रुग्ण वंचित राहणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया. "

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, यकृत प्रत्यारोपण हा महत्त्वाचा विषय असल्यामुळे शासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि केंद्रीय कृषी मंत्री श्री.विलासराव देशमुख यांना यकृत प्रत्यारोपणाअभावी आपला प्राण गमवावा लागला. अशा परिस्थितीत गरिबांचे काय हाल होत असतील ? के.ई.एम. रुग्णालयात यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया बंद आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, के.ई.एम. रुग्णालयात किती गरीब रुग्णांवर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाल्या आहेत ? वास्तविक पाहता यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया सोपी नाही. यकृत प्रत्यारोपणासाठी रुग्णाला यकृतदाता तातडीने मिळणे आवश्यक आहे. जे रुग्ण मेंदू मृत अवस्थेत जातात त्यांचे यकृत वेळीच प्रत्यारोपणासाठी मिळणे आवश्यक असते. मेंदू मृत अवस्थेतील रुग्ण रुग्णालयात आल्यानंतर त्याच्या कुटुंबाशी सल्लामसलत करुन त्याचे यकृत घेण्याबाबत के.ई.एम. रुग्णालयात यकृत समुपदेशन केंद्र अस्तित्वात आहे काय ? समुपदेशन केंद्र कार्यरत असेल तर त्याबाबत काय अंमलबजावणी झाली आहे आणि आजपर्यंत किती रुग्णांना त्याचा लाभ झाला आहे ?

श्री.भास्कर जाधव : महोदय, सन 2010 ते 2012 या कालावधीत एकूण 7 रुग्णांवर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाल्या आहेत. तसेच गोरगरिबांच्या बाबतीत जी काळजी घेणे आवश्यक आहे, तितकी निश्चितपणे शासनाच्या माध्यमातून घेतली जात आहे. एखाद्याने यकृत देण्याची इच्छा व्यक्त केली तर, ज्याच्यावर यकृतरोपण करावयाचे आहे त्याला ती मॅच व्हावी लागते. त्यासाठी विविध प्रकारच्या 6 चाचण्या कराव्या लागतात. त्यापैकी एक चाचणी जरी मॅच झाली नाही तर अनेक प्रकारच्या अडचणी येऊ शकतात. अशा प्रकारच्या अडचणी आल्यामुळे परिस्थिती गंभीर होऊन बसते. त्यामध्ये थोडा वेळ जातो. मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, के.ई.एम. रुग्णालयातील यकृत प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया बंद झालेल्या नाहीत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, यकृत प्रत्यारोपणाचे काम गेल्या सहा महिन्यांपासून बंद आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, सदरहू काम बंद नाही.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी खरोखरच महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. यकृतासाठी किंवा किडनीसाठी त्यांच्या टेस्ट होण्याकरिता मृत व्यक्तींच्या नातेवाईकांशी चर्चा करणे आवश्यक आहे. डॉक्टरला किंवा रुग्णालयाला दोष न देता या बाबतीत जनजागृती होणे गरजेचे आहे असे मला वाटते. मृत व्यक्तींच्या नातेवाईकांशी जे अधिकारी चर्चा करतात त्यांची संख्या खरोखर या सर्व रुग्णालयांमध्ये किती आहे ? फॉरेन कन्सेप्ट आल्यानंतर अपोलो किंवा इतर मोठमोठ्या रुग्णालयांचा आपण विचार करतो. पण हिंदुजा हॉस्पिटलमध्ये पाहिले तर पैसे घेण्याचा काऊंटर मोठा आहे. रजिस्ट्रेशन करण्याच्या काऊंटरची लांबी दहा फूट असेल परंतु ट्रस्टच्या माध्यमातून रुग्णांच्या नातेवाईकांशी चर्चा करण्यासाठी किंवा आलेली जी व्यक्ती असेल त्यांना समजावून सांगण्याचा काऊंटर हा फक्त दोन फुटाचा दिसेल. जसलोकमध्ये सुध्दा तशीच व्यवस्था आहे. केईएम हॉस्पिटलमध्ये तशीच व्यवस्था आहे. यासाठी खरोखर जनजागृती करणे गरजेचे आहे.

आता यकृताची रिक्वायरमेंट जास्त आहे. डोनरही तयार आहेत पण डोनर असलेल्या मृत व्यक्तींच्या नातेवाईकांशी चर्चा करुन त्यांना समजावून सांगण्यासाठी शासन शासकीय किंवा निमशासकीय किंवा खाजगी रुग्णालयांसाठी काही नियम करणार आहे का ? तो नियम केला तर योग्य होईल. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की, आज किडनी दिवस आहे. किडनीचे डोनेशन असेल किंवा यकृताचे डोनेशन असेल, कोणत्याही अवयवाच्या डोनेशनसाठी नातेवाईकांना समजावून सांगण्यासाठी, त्यांच्याशी सल्लासमलत करण्यासाठी त्या ठिकाणी आपण जास्त स्टाफ डेप्युट करणार का आणि त्यासाठी इतर रुग्णालयांमध्ये काही नियम करणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना फक्त के.ई.एम. हॉस्पिटलच्या संदर्भात असली तरी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारताना मोठमोठ्या हॉस्पिटल्सचा उल्लेख केला. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, आपल्याकडे जे झोनल सेंटर आहे त्याचे कार्यालय सध्या सायन हॉस्पिटलमध्ये आहे. तेथून सर्व कम्युनिकेशन केले जाते. संपूर्ण मुंबईकरिता हे एकच सेंटर ठेवलेले आहे आणि तेथून कम्युनिकेशन केले जाते. ही लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

के.ई.एम. हॉस्पिटलसंबंधी असल्यामुळे नगरविकास विभागाकडे आलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीच्या बाबतीत आरोग्य विभाग आणि आमचा विभागाकडून एकत्रित चर्चा करुन यामध्ये अधिक चांगल्या प्रकारचे कोऑर्डिनेशन कसे होईल, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या नातेवाईकांना चांगल्या प्रकारची माहिती मिळण्याकरिता सुसूत्रता कशी आणता येईल, जनजागृती कशी करता येईल, ज्या पध्दतीने या राज्यामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना लागू केलेली आहे, राज्यातील 431 चॅरिटी हॉस्पिटल आहेत त्यांचे चांगल्या प्रकारे कम्युनिकेशन करुन आज सुसूत्रता आणली आहे त्या पध्दतीने दोन्ही विभाग मिळून यामध्ये देखील सुसूत्रता आणण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, यकृत प्रत्यारोपणाचा अत्यंत गंभीर आणि महत्वाचा विषय सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चेसाठी आलेला आहे. के.ई.एम. रुग्णालयाचे देशाच्या पातळीवर, राज्याच्या पातळीवर आणि मुंबईच्या पातळीवर एक विशेष स्थान आहे. आपण कधीही के.ई.एम. हॉस्पिटलला भेट दिली तर लक्षात येईल की, एखाद्या रेल्वे प्लॅटफॉर्मवर दिसणार नाही एवढी प्रचंड गर्दी त्या ठिकाणी असते. त्या ठिकाणी असणाऱ्या सोयीसुविधा, रुग्णांना मिळणारे औषधोपचार आणि त्या ठिकाणी होणाऱ्या शस्त्रक्रिया या बाबतीत संपूर्ण देशाने आदर्श घ्यावा असे हे एक महत्वाचे रुग्णालय आहे. माझ्या माहितीप्रमाणे या अगोदर के.ई.एम. हॉस्पिटलचे जे डीन होते त्यांच्याच कारकिर्दीमध्ये त्या ठिकाणी यकृत प्रत्यारोपणाची सुरुवात झालेली आहे. त्यावेळी सरकारी हॉस्पिटलमध्ये यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याच्या बातम्या आल्या होत्या त्याचा आम्हा सर्वांना त्याचा फार अभिमान वाटला होता. पुढे काय गोष्टी घडल्या हे माहीत नाही पण त्या डीनने नंतर स्वेच्छानिवृत्ती घेतल्याचे वाचनात आले. काही महिने ते राहिले.

या लक्षवेधी सूचनेवरील निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, के.ई.एम. रुग्णालयात परदेशातून प्रशिक्षण घेऊन आलेले एक डॉक्टर असून त्यांच्या शिक्षणाचा फायदा गरीब व गरजू रुग्णांना तसेच प्रशिक्षणार्थी डॉक्टर्सना होत आहे. त्या ठिकाणी प्रशिक्षण घेऊन आलेले डॉक्टर आहेत, त्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री आणि यंत्रणा असताना सहा महिन्यांपासून यकृत न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

मिळाल्यामुळे एकही शस्त्रक्रिया किंवा प्रत्यारोपण झालेले नाही. हे सर्व व्यवस्थित चालू राहण्यासाठी अवयवदानाने मिळणारे जे यकृत आहे ते मिळण्यासाठीचे कार्यक्रम अधिक महत्वाचे आहेत. मी स्वत: नेत्रदानाच्या मोहिमेमध्ये तसेच प्रत्यारोपणामध्ये काम केले असल्यामुळे मला खात्री आहे की, जेव्हा आम्ही एखादे नेत्रदान मिळवितो तेव्हा दोन अंधांना त्याचे डोळे मिळू शकतात. त्यावेळी आमच्याकडे रेसिपंटची दहा लोकांची यादी तयार असावी लागते. त्या दहा लोकांची नेत्ररोपण करण्याच्या वेळेला फिजिकल कंडिशन बरोबर असेल तर त्यापैकी दोन लोकांना नेत्ररोपण करता येण्याची शक्यता असते. त्यापेक्षा लिव्हर हा तर अतिशय महत्वाचा भाग आहे. या बाबतीत जे करता येणे शक्य असेल ते करणे गरजेचे आहे. झोनल टान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर यांचा निश्चित काय कार्यक्रम आहे हे यातून स्पष्ट होत नाही. मला असे वाटले की, हा देशातील एखादा झोन घेऊन ते झोनल सेंटर आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

आताच मंत्री महोदयांनी असे सांगितले की, सायन हॉस्पिटलमध्ये झोनल सेंटर आहे. म्हणजे नक्की काय आहे त्याचाही खुलासा करण्यात यावा. या विषयाचे जनजागरण झाले पाहिजे. मृत व्यक्तीचे यकृत मिळण्याची शक्यता असेल तर ते किती वेळामध्ये घेतले पाहिजे, त्याचे प्रिझर्वेशन कसे करावयाचे आहे ? योग्य रेसिपिअण्ट यकृताची गरज असलेल्या माणसाला ते कसे बसवावयाचे हा एक मोठा कार्यक्रम आहे. 7-8 रुग्णांवर अशा प्रकारची शस्त्रक्रिया झाल्याचे सांगण्यात आले आहे. या शस्त्रक्रियेनंतर त्यांचे आयुष्य किती वाढले, आयुर्मर्यादा किती वाढली, याचाही सातत्याने अभ्यास होण्याची गरज आहे. हा सर्व विषय शासन गंभीरपणे घेईल काय आणि त्यावर योग्य उपाययोजना करील काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, गेल्या सहा महिन्यात अशा प्रकारची एकही केस होऊ शकलेली नाही ही गोष्ट खरी आहे. याकरिता एक डोनर मिळाला होता, नाही असे नाही. कोकिळाबेन हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांची टीम सुध्दा गेली होती. प्रत्यारोपणापूर्वी वेगवेगळ्या प्रकारच्या सहा टेस्ट कराव्या लागतात. डोनर व ज्यांच्यावर यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करावयाची असते अशा दोघांच्या सर्व टेस्ट मॅच व्हाव्या लागतात. तरच ही शस्त्रक्रिया यशस्वी होऊ शकते. हा आव्हानात्मक काम आहे. दिल्लीमध्ये अशा 7 केसेस झालेल्या आहेत. मागील 15 वर्षापासून चेन्नईमध्ये अशा प्रकारच्या केसेस करण्याचे काम सातत्याने सुरु आहे. त्या प्रमाणात आपल्या राज्यात आपण यशस्वी झालो आहोत असे मी म्हणत नाही. परंतु तुलनात्मक दृष्ट्या विचार करता आपल्याकडे चांगले काम होत आहे असे लक्षात येईल. हे काम अधिक चांगले झाले पाहिजे. याकरिता सायन हॉस्पिटलमध्ये जी व्यवस्था आहे ती लोकांना कळावी, त्यामध्ये आणखी सुसूत्रता यावी, लोकांमधील कम्युनिकेशन आणखी वाढावे यादृष्टीने आरोग्य विभाग व नगरविकास विभाग या दोन्ही विभागांकडून प्रयत्न केले जाते. तज्ज्ञांची मदत घेण्याची गरज असेल तर निश्चितपणे ती घेतली जाईल. हे आव्हानात्मक काम अधिक गतीने करण्यासाठी शासन स्वत:ची जबाबदारी सक्षमपणे पार पाडेल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, स्व.विलासराव देशमुख हे लिव्हरच्या आजारामुळे गेले त्यामुळे हा विषय ऐरणीवर आला असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. एकच वाईट वाटते की, चेन्नईच्या ग्लोबल हॉस्पिटलमध्ये किंवा एच.एन.हॉस्पिटलमध्ये जे होते ते मुंबईच्या के.ई.एम.हॉस्पिटलमध्ये, जे.जे.हॉस्पिटलमध्ये, बॉम्बे हॉस्पिटलमध्ये का होत नाही ? कोठे तरी आपली मानसिकता कमी पडत आहे. अवयव दानासाठी जे निकष लागतात ते निकष सर्वसामान्य रुग्णालयांपर्यंत किंवा रुग्णांपर्यंत पोहोचलेले नाहीत. कॅडेव्हर लिव्हर ट्रान्सप्लाण्ट हा जो विषय आहे तो अजूनही लोकांपर्यंत पोहोचलेला नाही. विदेशामध्ये एखाद्या व्यक्तीचे ब्रेन डेड झाले तर डायरेक्टली त्याचे अवयव दानासाठी वापरले जातात. तेथे तसा कायदा आहे. तो कायदा आपल्याकडे आणण्यासाठी मानसिकता तयार केली पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी, माननीय विधी व न्याय मंत्र्यांनी, माननीय मुख्यमंत्र्यांनी यामध्ये लक्ष घालून कायद्यामध्ये सुधारणा केली पाहिजे. कायद्यामध्ये सुधारणा केली तरच अवयव दानाबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण होईल आणि किडनी चोरीचे रॅकेटही बंद होईल...

उप सभापती : सन्मानीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

डॉ. दीपक सावंत : नेत्रदान, अवयव दान या विषयी वेगळी कमिटी करुन राज्य शासन कायद्यामध्ये बदल करील काय ?

श्री. भास्कर जाधव :कायदा करणे किंवा कायद्यामध्ये सुधारणा करणे हे राज्य शासनाच्या हातामध्ये आहे. हा अत्यंत नाजूक आणि भावनिक स्वरुपाचा विषय असल्यामुळे याबाबतीत समाजाचे मोठया प्रमाणावर प्रबोधन होणे गरजेचे आहे असे मला वाटते. ब्रेनडेड संबंधी 5 टेस्ट आहेत.शव विद्युत दाहिनीद्वारे नष्ट करण्यासाठी लोकांमध्ये जागृती होण्यास बराच वेळ लागला. हळूहळू या संबंधी देखील लोकांमध्ये जागृती आणणे महत्वाचे आहे. भविष्यामध्ये कायद्याने प्रश्न सुटतील असा भाग नाही. हा विषय देशपातळीवरचा होऊ शकतो. राज्यपातळीवरचा हा विषय आहे असे मला तरी वाटत नाही. तरी देखील तशी वेळ आली तर राज्यशासनामार्फत जशी एडस्च्या बाबतीत, पोलिओच्या बाबतीत जनजागृती करण्यात आली त्याप्रमाणे हा विषय हाताळला जाईल.

श्रीमती विद्या चव्हाण : शासन हा विषय गांभीर्याने घेत नाही. माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना उपचारासाठी दुस-या राज्यात जावे लागले.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली म्हणजे तो विषय गांभीर्याने घेतला जातो असे नाही. प्रत्येक गोष्टीचे गांभीर्य सरकारला असते. मी आता तिस-या लक्षवेधी सूचनेकडे वळतो.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कल्याण-डोंबिवली येथे बांधकाम पूर्णत्वाचा दाखला न घेतलेल्या विकासकांकडे 50 कोटीची असलेली थकबाकी

मु. शी. : कल्याण-डोंबिवली येथे बांधकाम पूर्णत्वाचा दाखला न घेतलेल्या विकासकांकडे 50 कोटीची असलेली थकबाकी यासंबंधी श्री. रामदास कदम व ॲड. अनिल परब,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कल्याण-डोंबिवली येथे बांधकाम पूर्णत्वाचा दाखला न घेतलेल्या विकासकांकडे महापालिकेची जवळपास ५० कोटी रुपयांची असलेली थकबाकी, ज्या विकासकांना सन १९९६ ते २०१० या कालावधीत इमारत बाधंण्यासाठी परवानगी देण्यात आली, त्यांनी इमारत बांधून पूर्ण केल्या तसेच त्या विकून त्यातून पैसाही कमविला, मात्र बांधकाम पूर्ण झाल्यावर फ्लॅटची विक्री करतांना महापालिकेकडून बांधकाम पूर्णत्वाचा दाखला न घेताच अशा अनेक इमारतीत फ्लॅटधारक वास्तव्य करीत असणे, दाखला मिळाल्याशिवाय वास्तव्य करणे बेकायदा असणे, या थकबाकी वसुली केल्यास महापालिकेच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांची भर पडणार असूनही या वसुलीकडे महापालिका अधिकारी करीत असलेले दुर्लक्ष, सर्वसामान्य जनतेची विकासकांकडून होत असलेली फसवणूक, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित विकासकांकडून थकबाकी वसूल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये जवळ जवळ 284 प्रकरणामध्ये बांधकाम पूर्णत्वाचा दाखला न घेता मोठ्या प्रमाणावर महसूल बुडविण्यात आलेला आहे. विकासक आणि जागेचे मालक आणि अधिकारी यांच्या संगनमताने हा महसूल बुडविलेला आहे. लक्षवेधीच्या सूचनेमध्ये 50 कोटीचा महसूल बुडालेला आहे असे मी म्हटलेले आहे. लक्षवेधीच्या निवेदनामध्ये दीड कोटी महसूल बुडालेला आहे असे म्हटलेले आहे. मी अनधिकृत बांधकामाबाबत बोलणार नाही. परंतु सोमवार दिनांक 11.3.2013ला स्थायी समितीची मिटींग झाली. त्या मिटींगमध्ये 1800 बिल्डर आणि जमीन मालक यांची 138 कोटी रुपयांची थकबाकी आहे अशी माहिती संबंधित अधिका-यांनी दिलेली आहे. आता या ठिकाणी उत्तर देताना फक्त दीड कोटीचे नुकसान झाले असे म्हटलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

या बाबतीत माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, स्थायी समितीमध्ये नेमके काय उत्तर दिले आहे आणि सभागृहामध्ये काय उत्तर दिले आहे याची तत्काळ चौकशी करावी. ज्या अधिकाऱ्यानी चुकीची माहिती दिली असेल, त्या अधिकाऱ्यांविरुध्द तात्काळ निलंबनाची कारवाई करणार आहात काय? तसेच या अधिकाऱ्यांनी राज्य शासनाचा महसूल बुडविण्यास मदत केली म्हणून त्यांच्या विरुध्द दंडात्मक कारवाई करुन गुन्हे दाखल करणार काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माजी विरोधी पक्ष नेते श्री.रामदास कदम यांनी दोन महत्वाचे प्रश्न या ठिकाणी विचारलेले आहेत. दिनांक 11 रोजी वृत्तपत्रात एक बातमी आली होती. 1800 विकासक आणि जमीन मालक यांनी शासनाचा 138 कोटी रुपयांचा महसूल बुडविला अशा प्रकारची चर्चा स्थायी समितीमध्ये झाली होती असे सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले. आज यासंबंधीची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ती माहिती आणि सभागृहात देण्यात आलेली माहिती तपासून घेऊन ज्या अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिली असेल त्यांच्याविरुध्द करणार काय असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे.

महोदय,आपण आपल्या लक्षवेधी सूचनेत बघितले तर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून सन 1995 ते 2005 या कालावधीत 284 लोकांनी कंम्प्लीशन सर्टिफिकेट घेतलेले नाही. त्यातील 63 लोकांकडून 48 लाख 60 हजार रुपये वसूल करण्यात आले आहेत. उर्वरित 188 लोक आहेत त्यांच्याकडून साधारणत: 1.50 कोटी रुपये वसूल होऊ शकतात अशा पध्दतीचे सदर निवेदन आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे माहितीमध्ये तफावत असेल ती गोष्ट आपल्याला बघावी लागेल. सदर वसुली प्रॉपर्टी टॅक्सची आहे, वॉटर टॅक्सची आहे,अनधिकृत बांधकामांना प्रिमियम आकारला जातो त्याची ती रक्कम आहे, एवढीच माहिती बघावी लागेल. सदर माहिती चुकीची आहे काय ही बाब तपासून घेतली जाईल तसेच या संदर्भात 2005 पासून ते आतापर्यंत काय घडले आहे हे सुध्दा तपासून घेतले जाईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, 33 प्रकरणात विकासकाविरुध्द फौजदारी कारवाई सुरु करण्यात आली आहे. ज्या इमारतींच्या बांधकामांसाठी वास्तुशास्त्रज्ञ प्लॅन सादर करतात. तुम्ही विकासकाला काळया यादीत टाकले तर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

तो दुसऱ्या नावाने पुढे येऊन बांधकाम करु शकतात. परंतु वास्तुशास्त्रज्ञाचे काम आहे की, इमारतीचा प्लॅन सादर करणे, त्यांच्या देखरेखीखाली त्या इमारतीचे बांधकाम करुन घेणे आणि ते बांधकाम पूर्ण झाल्यावर ऑक्यूपेशन सर्टिफिकेट देणे आणि त्यानंतर कंम्प्लीशन सर्टिफिकेट देणे. या क्षेत्रातील किती इमारतींना बांधकामाची परवानगी दिली, किती लोकांनी कंम्प्लीशन सर्टिफिकेट दिले आहे असा माझा प्रश्न आहे. माझी माहिती अशी आहे की, कंम्प्लीशन सर्टिफिकेट घेण्यासाठी विकासक पुढे येत नाहीत. इमारतींचे वास्तुशास्त्रज्ञ कंम्प्लीशन सर्टिफिकेट घेत नाहीत. जे वास्तुशास्त्रज्ञ अशा पध्दतीचे इमारतींचे प्लॅन सादर करतात, ते कंम्प्लीशन सर्टिफिकेट घेत नाहीत, त्या वास्तुशास्त्रज्ञांविरुध्द कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांच्या जी गोष्ट लक्षात आली, ती गोष्ट शासनाच्या देखील निदर्शनास आलेली आहे. बऱ्याच वेळेला इमारतींचे प्लॅन सादर केल्यानंतर आपण त्यांना आय.ओ.डी.देतो. आय.डी.ओ. दिल्यानंतर इमारतीचे बांधकाम करण्यासाठी विकासकाला पाच प्रकारच्या परवानग्या घ्याव्या लागतात. त्यासाठी प्रकरणवाईज काही रक्कम डिपॉझीट म्हणून भरली जाते. डिपॉझीटची रक्कम भरल्यानंतर त्यांनी कंम्प्लीशन सर्टिफिकेट घेतले पाहिजे. ते सर्टिफिकेट घेत नाहीत. डिपॉझीटची रक्कम बुडाली तरी चालेल अशी त्यांची भावना झालेली आहे. त्यांनी कंम्प्लीशन सर्टिफिकेट घ्यावे आणि त्यांनी भरलेली डिपॉझीटची रक्कम परत घ्यावी अशी प्रोव्हीजन आहे. परंतु डिपॉझीटची रक्कम अतिशय नाममात्र असल्यामुळे ते कंम्प्लीशन सर्टिफिकेट घेण्यासाठी येत नाहीत. ते कंम्प्लीशन सर्टिफिकेट घेण्यासाठी येत नसल्यामुळे असे प्रश्न उदभवतात ही गोष्ट खरी आहे. या ठिकाणी वास्तुशास्त्रज्ञाला जबाबदार धरावे अशा प्रकारची सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेली आहे. ती योग्य आहे. वास्तुशास्त्रज्ञांना जबाबदार धरण्याबाबत डी.सी.रुलमध्ये, एमआरटीपी ॲक्टमध्ये तरतूद असेल तर आनंद आहे. जर तरतूद नसेल तशी तरतूद ॲक्टमध्ये करावी लागेल.

यानंतर श्री. भोगले.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3.....

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मुंबई आणि लगतच्या परिसरामध्ये जागेचे भाव वाढल्यामुळे कल्याण येथे बालाजी कन्स्ट्रक्शन, आकृती कन्स्ट्रक्शन कंपनीच्या नावाने पुण्यनगरी, चौफेर वृत्तपत्रात मोठमोठ्या जाहिराती प्रसिध्द होत आहेत. 2 लाख रुपयात वन बीएचके, 3 लाख रुपयात टू बीएचके अशा जाहिराती प्रसिध्दीला दिल्या जात आहेत. गरजू लोकांनी पैसे भरल्यानंतर त्या पैशातून इमारती उभ्या केल्या जातात, ऑक्यूपेशन सर्टिफिकेट न घेता सदनिका वितरित केल्या जातात. कालांतराने अशा इमारती तोडल्या जातात. अनेक सामान्य लोकांची अशा जाहिरातींमुळे फसवणूक झालेली आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, यामध्ये शासनाची काही अंशी जबाबदारी आहे. आज समाजामध्ये सर्व स्तरापर्यंत शिक्षण पोहोचले आहे. लोकांना आकर्षित करण्यासाठी मोठमोठया जाहिराती दिल्या जातात. वृत्तपत्र हातामध्ये घेतले तर पहिल्या पानावर पूर्ण पान भरुन जाहिरात प्रसिध्द झालेली पहावयास मिळते. 175 रुपये भरा, 1 लाख रुपये भरा, 5 लाख रुपये भरा आणि घराचे मालक व्हा, जागेचे मालक व्हा अशी जाहिरात वाचावयास मिळते. हे कसे काय घडू शकते याचे गणित मला अद्याप कळलेले नाही. मी त्या अभ्यासाच्या भानगडीत पडलेलो नाही. लोकांना आकर्षित करणा-या जाहिराती देत असताना निश्चितपणे त्या बाबतीत काही बंधने घालता येतील का? समाजामध्ये शिक्षण पोहोचलेले आहे. आजपर्यंत लोकांना माहिती नव्हती. लोकांनी चुकून घरे खरेदी केली, भावनेच्या आहारी जाऊन घरे घेतली. आता प्रत्येकाला कायद्याची माहिती झालेली आहे. प्रत्येकाने घर खरेदी करीत असताना कायदेशीर बाबी तपासल्या पाहिजेत हेही तितकेच खरे आहे. ज्या भागासाठी जाहिरातबाजी केली जाते त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी याबाबत नियंत्रण ठेवावे अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महापालिकेचा जवळपास 50 कोटी रुपयांचा महसूल बुडविला आहे. या सभागृहात याच महापालिकेचा प्रश्न मागील काळात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चेला आला होता. श्री.सुनील जोशी नावाचे अभियंता यांना 50 की 100 कोटी रुपयांची संपत्ती गोळा केल्याबद्दल अटक झाली होती व त्यांना सेवेतून निलंबित केले होते. त्यांना पुन्हा सेवेत घेण्यासाठी महापालिकेतील सत्ताधाऱ्यांनी ठराव आणला होता. श्री.सुनील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

जोशी यांनी चुकीच्या मार्गाने काम केल्यामुळेच 100 कोटी रुपयांची मालमत्ता गोळा करणे शक्य झाले असावे. अशा प्रकारामुळेच महापालिकेचे 50 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. श्री.सुनील जोशी यांना पाठीशी घालून सेवेत पुन्हा घेण्यासाठी महापालिकेतील सत्ताधाऱ्यांनी ठराव आणण्याचा प्रयत्न केला होता. बिल्डरांवर कारवाई करण्यापेक्षा अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर आणि संबंधित सत्ताधाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा नैतिकतेचा प्रश्न असला पाहिजे. मोठ्या प्रमाणावर अधिकारी भ्रष्टाचार करतात. अशा अधिकाऱ्यांना पाठीशी घालायचे की त्यांना घरी पाठवायचे? जो ठराव आणला होता तो नंतरच्या काळात विथ्ड्रॉ करण्यात आला. त्या अभियंत्याला सेवेत घेतलेले नाही. सेवेत घेतले नसले तरी माननीय सदस्य म्हणतात ते रास्त आहे. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालणे म्हणजे आपल्या नैतिकतेचे अध:पतन झाले आहे का याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. तसा विचार केला तर निश्चितपणे असे प्रश्न उद्‌भवणार नाहीत.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, सदर विषयामध्ये ओसी न मिळालेल्या इमारतींना ओपन लॅण्ड टॅक्स लागू होतो. या 284 प्रकरणांमधील ओपन लॅण्ड टॅक्स प्राप्त झालेला आहे का? त्याची रिकव्हरी व्हॅल्यू 60 ते 70 कोटी रुपये मिळू शकते.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी अत्यंत बेसिक प्रश्न विचारला आहे. ओपन लॅण्ड टॅक्स आकारला जातो, तो प्राप्त झाला की नाही याची माहिती या क्षणाला माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती निश्चितपणे दिली जाईल. जर त्यांनी ऑक्यूपेशन सर्टिफिकेट घेतले नाही आणि त्यांना हे ॲप्लिकेबल असेल तर ते लागू करण्यात येईल.

नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ.शी. : राज्य परिवहन महामंडळामध्ये अपंग व्यक्तींना रोजगाराच्या व स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देणे

मु.शी. : राज्य परिवहन महामंडळामध्ये अपंग व्यक्तींना रोजगाराच्या व स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देणे यासंबंधी सर्वश्री. जयप्रकाश छाजेड, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, मोहन जोशी, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री.अनिल भोसले, जयवंतराव जाधव वि.प.स.,वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.जयप्रकाश छाजेड (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्य परिवहन महामंडळामध्ये अपंग व्यक्तींना रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी परिपत्रक क्र.४ अन्वये प्रत्येक स्थानकात एस.टी.डी. बूथचा परवाना देण्यात येणे, सदरहू परवान्यांची संपलेली मुदत न वाढविल्याने राज्यातील सुमारे साडेचार हजार अंध - अपंग व्यक्तींच्या कुटुंबीयांचा चरितार्थ चालवायचा निर्माण झालेला प्रश्न, त्यांच्या कुटुंबीयांवर ओढवलेली उपासमारीची वेळ, एसटीच्या अडीचशे आगारामध्ये सन १९९२ पासून अपंगांना एसटीडी बूथसाठी दिलेल्या स्टॉलची तत्काळ मुदतवाढ देऊन, गोरगरिब अपंग बूथ धारकांना न्याय मिळवून देण्याची गरज, यावर शासनाने केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना. "

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, हा एस.टी.महामंडळाच्या संदर्भातील एक सामाजिक व संवेदनशील स्वरुपाचा विषय आहे. या ठिकाणी अतिशय थोडक्यात उत्तर दिले असून एस.टी महामंडळाकडून कोणती प्रक्रिया अवलंबली जाते, एवढयापुरते मर्यादित उत्तर दिलेले आहे. सन 1992 साली साधारणपणे 400-450 अंध व अपंगांना एस.टी महामंडळाने बूथ दिले होते. आता ते काढून घेण्याचा प्रयत्न महामंडळाकडून केला जात आहे. या माध्यमातून अंध व अपंगांना विस्थापित करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सन 1992 मध्ये या लोकांना ज्यावेळी एस.टी.डी. बूथ दिले होते त्यावेळी आपल्या देशामध्ये आजच्या प्रमाणे मोबाईल क्रांती झालेली नव्हती. त्यावेळी एस.टी.डी. सेवा नव्याने आलेली होती. अंध,अपंग व बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा, या हेतूने एस.टी. महामंडळाने बूथ दिले होते. बूथ देत असताना महामंडळाने केवळ जमीन दिली. या जागेवर या लोकांनी स्वत: एस.टी.डी. चे 5 बाय 5 आकाराचे बूथ बांधले. त्यांच्याकडून महिन्याला 4 हजार रुपये भाडे घेतले जाते. आता महामंडळाने अचानकपणे एक सर्क्युलर काढले व टेंडर काढण्यास सुरुवात केली. अंध, अपंगांना टेंडर देण्याच्या ऐवजी त्यांच्या नावाने सर्वसाधारण व्यक्तींना टेंडर दिले. भाव वाढवून हे टेंडर देण्यात आले. यामुळे सन 1992 पासून टेलिफोन बूथ चालवणारे अंध, अपंग आज विस्थापित होणार आहेत. म्हणून मी आपल्यामार्फत शासनाला प्रश्न विचारु इच्छितो की, हे सर्व सामाजिक संवेदनशीलता लक्षात घेऊन बूथ देण्यामागची भूमिका स्वीकारली जाणार आहे काय, तसेच निव्वळ दर 3 वर्षाने भाडे वाढवून आहे त्यांचेच बूथ कायम ठेवले जाणार आहे की नाही ? हा एक महत्वाचा प्रश्न आहे. या संदर्भात एसटी महामंडळाकडून कोणता धोरणात्मक निर्णय घेतला जाणार आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन 1992 मध्ये अपंग व्यक्ती, माजी सैनिक यांच्याकरिता एस.टी.डी. बूथ देण्याचे धोरण एस.टी. महामंडळाने त्यावेळी ठरवले होते. तेव्हा जाहिरात काढून अर्ज मागवले जात होते. त्यामध्ये अपंगांना प्राधान्य देऊन बूथ देण्याचे धोरण शासनाने राबवले होते. नंतर सन 2006 व सन 2008 मध्ये या निर्णयात काही बदल केला गेला. त्या नुसार 9 वर्षाचा कालावधी ठरवला आहे. पहिल्या 5 वर्षाच्या कालावधीमध्ये कोणतीही दरवाढ

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर ....

होणार नाही. पुढील 4 वर्षासाठी प्रत्येक वर्षी 10 टक्के दरवाढ होईल, असे धोरण ठरवले आहे. मात्र सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, अपंग, अंध व्यक्तींवर अन्याय होऊ नये याकरिता कोणते धोरण स्वीकारले जाणार आहे ? शासनाचा असा प्रामाणिक उद्देश आहे की, अंध अपंगांना प्राधान्य दिले जाते. या निविदेच्या प्रक्रियेमध्ये 3 वर्ग ठरवले असून त्यामध्ये प्रामुख्याने पहिले प्राधान्य अपंग व्यक्तींकरिता दिलेले आहे. ज्यांचे पूर्वीचे एस.टी.डी. बूथ असतील ते या प्रक्रियेत पुन्हा समाविष्ट झाल्यास त्यांना प्राधान्य देण्याचे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. टेंडर सादर केल्या नंतर अपंग व्यक्तीचा दर कमी असेल व दुसऱ्या व्यक्तीचा दर जास्त असेल तरी देखील अपंग व्यक्तीला कायम स्वरुपी एसटीडी बूथ देण्याचे धोरण ठरवलेले आहे. यामुळे पूर्वीच्या अपंग व्यक्तींना कोठेही डावलले जाणार नाही, अशी व्यवस्था या ठिकाणी केलेली आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात असे सांगितले की, अंध व अपंगांना टेंडर प्रक्रियेत प्राधान्य दिले जाईल. मात्र या व्यक्तींना कधी सामावून घेतले जाणार आहे ? टेंडर काढल्यानंतर आपल्या समोर दर येतील. त्या दराप्रमाणे हवे असल्यास आपण व्यापाऱ्यांना बूथ द्या. अंध व अपंग हे आपल्या समाजातील दुर्बल घटक आहेत. त्यांना बूथ दिल्यानंतर आवश्यकता असल्यास 3 वर्षाने भाडेवाढ करा. मात्र त्यांच्यावर अन्याय होऊ नये, या करिता शासनाने सध्या जे धोरण ठरवले आहे, त्यामध्ये बदल केला जाणार आहे काय ?

यानंतर भारवि....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चांगली सूचना केली आहे. या धोरणासंबंधी शासन निश्चितपणे विचार करील.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा अतिशय संवेदनशील असा विषय आहे. त्याला शासनाकडून अत्यंत सकारात्मक असे उत्तर दिलेले आहे. परंतु, आपण जी प्रक्रिया तयार केली आहे त्यासंबंधी प्रश्न आहे. ज्या अधिकाऱ्याने हे तयार केले आहे त्याची पडताळणी करून पहावी. हा प्रश्न अंध-अपंगांच्या जीवनाशी निगडित आहे. माजी सैनिक, मृत सैनिकांचे वारसदार यांच्या कुटुंबांशी संबंधित असलेला हा प्रश्न आहे. आपण जाहीररित्या लिलाव करून त्याकडे व्यापारी दृष्टीने बघणे हा शासनाचा दृष्टिकोनच मुळात चुकीचा आहे. पूर्वी ज्यांना स्टॉल दिलेले आहेत अशांचे स्टॉल आपण कायम ठेवणार आहात असे आता सांगितले आहे. त्याला जोडून माझी एक विनंती आहे की, पूर्वी एसटीडी बूथ चालत होते. ते आता चालत नाही. हे एसटीडी बूथ त्या लोकांनीच बांधलेले आहेत. त्या लोकांकडून 5-10 टक्के भू भाडे आकारले आहे. एसटीडी बूथ हा कालबाह्य झालेला व्यवसाय आहे. त्यामुळे या स्टॉलधारकांना एसटीडी बरोबरच चरितार्थ चालेल अशा प्रकारच्या वस्तू विकण्यासाठी मुभा देणार आहात काय ?

गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. पूर्वी एसटीडीचा व्यवसाय चांगल्या पद्धतीने चालत होता. आता मोबाईलची सुविधा झाल्यामुळे एसटीडी सेवा बंद होण्याच्या मार्गावर आहे. एसटीडी बूथचा स्टॉल चालला पाहिजे म्हणून फॅक्स, झेरॉक्स मशिन्स किंवा मोबाईला लागणारे सीमकार्ड, त्याला लागणारे कव्हर, मोबाईल दुरूस्ती या सर्व व्यवसायाची व्यवस्था करता येईल अशा प्रकारची सुविधा आपण केलेली आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, अपंग आणि अंधांच्या क्षेत्रामध्ये पूर्वी उपलब्ध असलेले रोजगार आता कमी होत चालले आहेत. अंधांना स्वयं रोजगाराच्या संधी उपलब्ध होत्या. त्या देखील कमी होत चालल्या आहेत. खुर्च्यांचे विणकाम करण्याचे कामही आता बंद झालेले आहे. त्यांना जर स्वत:च्या पायावर उभे करायचे असेल तर जास्तीत जास्ती संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. परंतु त्यांच्या रोजगाराची संधी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. एस.टी.आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

कंपनी म्हणून चालवितो. इतर उद्योगांना कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सीबिलिटी असते तशी आपल्या महामंडळाला आहे काय ? त्यासाठी आपण वेगळ्या निधीची तरतूद केली आहे काय ? तो निधी आपल्या महामंडळाकडून खर्च केला जातो काय, असल्यास, तो कशा प्रकारे केला जातो, याची माहिती आपण घेणार आहात काय ? आपल्याकडे बीओटीचे प्रस्थ आता मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. मोक्याच्या ठिकाणच्या एस.टी.स्टँडचे खाजगीकरण होत आहे. आता तर तो नवीन बसस्टँड व्यक्तिगत नावाने ओळखला जात असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. ज्यांना आपण दीर्घ मुदतीवर आपली जागा लीजवर देणार आहात ते या अंध-अपंगांना त्यात सामावून घेणार आहेत काय असा फार मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. तेव्हा याबाबत घ्यायची काळजी तसेच कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सीबिलिटी प्रमाणे आपले महामंडळ अपंगांवर किती निधी खर्च करते यासंबंधातील शासनाचे धोरण आपण येथे सांगू शकाल काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हा अत्यंत संवेदनशील प्रश्न आहे. महामंडळाने नवीन धोरण आणण्याचा जो प्रयत्न केला आहे त्यासंबंधी सन्माननीय सदस्यांचा थोडा गैरसमज झाला आहे असे मला वाटते. पहिली पॉलिसी 1992 मध्ये आली. त्यानंतर 2006 मध्ये ती पॉलिसी बदलली आणि 2008 पासून निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली. हे रिझर्व्हेशन अपंग, माजी सैनिक, मृत सैनिकांचे जवळचे वारसदार याच वर्गाकरिता आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

महामंडळाने निविदा काढण्याचा प्रयत्न केला. पूर्वी दरवर्षी दहा टक्के वाढ करण्याची कल्पना होती. पहिली पाच वर्षे कोणतीही फी वाढ करायची नाही अशाप्रकारे नऊ वर्षे परवाना देण्याची पध्दती होती. आता जुन्या माणसाला बाजूला करुन नवीन व्यक्तीला बूथ देण्याची शक्यता निर्माण झाली. शेवटी उपजीविकेचा प्रश्न निर्माण होईल व कोणीतरी जास्त पैसे दिले म्हणून जुन्या माणसाला काढून ते नवीन माणसाला द्यायचे हे उचित होणार नाही म्हणून नवीन विचार सुरु आहे.

सभापती महोदय, आता असा विचार करण्यात आला की, निविदा काढायच्या परंतु त्या त्याच वर्गातील लोकांकडून घ्यायच्या. इतर व्यापाऱ्यांकडून किंवा श्रीमंत व्यक्तींकडून या निविदा घेतल्या जाणार नाहीत. यामध्ये एखादी निविदा जास्त दराने आली तर जो आता बूथ चालवित आहे त्यालाच तेवढी रक्कम भरुन बूथ चालविण्यास द्यावी अशी कल्पना आहे. परंतु यामध्ये देखील पुनर्विचार करण्याची गरज आहे आणि हे राज्य मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. एकूण 310 बस स्थानकांवर हे बूथ आहेत आणि त्याचे वार्षिक उत्पन्न फक्त 40 लाख रुपये आहे. म्हणजे हा फार मोठा विषय आहे अशातला देखील भाग नाही. तो उत्पन्न वाढविण्याचा विचार झाला.

सभापती महोदय, एका बाजूला एस.टी.कडे एकाधिकारशाही होते तेव्हा वेगळा प्रश्न होता. आपण लोकांना अर्ध्या तिकिटामध्ये प्रवास करण्याच्या सवलती देत होतो. त्यामुळे एस.टी.महामंडळास दरवर्षी 700 ते 800 कोटी रुपयांचा तोटा होत होता. म्हणून आपण ती नुकसान भरपाई प्रवासी करातून करत होतो. परंतु आज हे सर्व अर्थकारण अडचणीत आलेले आहे. आपण खाजगी बस सेवांना परवानगी दिलेली असल्यामुळे स्पर्धा सुरु झाली आहे. परंतु महामंडळाचा कारभार जुन्याच नियमांप्रमाणे सुरु आहे. त्यामुळे हे महामंडळ स्पर्धेत टिकेल किंवा कसे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्याशिवाय डिझेलची दरवाढ आहे, तसेच कर्मचाऱ्यांचे पगार वाढविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. यामध्ये महामंडळाची आर्थिक परिस्थिती कशी राहणार आहे, हे महामंडळ नफ्यामध्ये राहील किंवा कसे हा देखील प्रश्न आहे. आपण एका विशिष्ट वर्गाला मदत करण्याचे धोरण आखलेले आहे. अस्तित्वात असलेल्या व्यक्तीला बाहेर काढून तेथे दुसऱ्या व्यक्तीला आणणे औचित्याला धरुन नाही. फक्त जास्त पैसे मिळणार असतील तर त्यालाच जास्त पैसे देण्यास भाग करावे अशा प्रकारचे धोरण होते. तरी देखील मी सांगितले या बाबत पुनर्विचार करण्यात येईल. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी केलेली सूचना निश्चित चांगली आहे. त्यांना या पूर्वीच फॅक्स आणि ॲक्सेसरीज विकण्याची परवानगी दिलेली आहे. पण हे व्यावहारिक आहे किंवा नाही हे पहावे लागेल. कारण झेरॉक्स किंवा फॅक्स मशीन बसवावयाची झाल्यास त्यासाठी जास्त खर्च आहे. तेव्हा त्यांना बँकेकडून कर्ज देता येईल किंवा कसे याबाबत देखील विचार करण्यात येईल. या धोरणाबद्दल विचार करुन हे धोरण आणखी कशाप्रकारे राबविता येईल याचा महामंडळातर्फे विचार होईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी निधी बद्दल विचारले. आता महामंडळाकडे तसा निधी नाही. परंतु महामंडळ स्पर्धेत उतरलेले आहे. या महामंडळाला देखील सीएसआर निधी उपलब्ध करुन त्यातून काही समाजोपयोगी कार्यक्रम राबविता आले पाहिजेत. त्यामध्ये अपंगाना बूथ देण्याचा कार्यक्रम देखील असू शकेल आणि त्यामध्ये महामंडळाने काही रक्कम उचलली तरी काही वावगे होणार नाही.

सभापती महोदय, आज ज्या सवलती दिल्या जातात त्यासाठी वर्षाला जवळपास 900 कोटी रुपये दिले जातात. त्यामुळे हे सर्व गणित बिघडले आहे. त्याबाबत देखील मूलभूत विचार सुरु आहे. ज्या विभागामार्फत सवलत दिली जाते त्या विभागाच्या बजेटमधून ते पैसे महामंडळाला द्यावेत अशाप्रकारची चर्चा सुरु आहे, परंतु अंतिम निर्णय झालेला नाही. मला असे वाटते की, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी निधी सुरु करणे आवश्यक आहे. त्याबद्दल महामंडळाला निश्चिपणे सूचना देण्यात येतील. मी चर्चेमध्ये तशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. तेव्हा या दोन्ही गोष्टींबाबत शासन विचार करील.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ. शी. : कोकणात सातत्याने बदलत असणाऱ्या हवामानामुळे आणि आंबा पिकावर थ्रिप्स रोग पसरल्यामुळे आंबा पिकाची होत असलेली घट

मु. शी. : कोकणात सातत्याने बदलत असणाऱ्या हवामानामुळे आणि आंबा पिकावर थ्रिप्स रोग पसरल्यामुळे आंबा पिकाची होत असलेली घट यासंबंधी सर्वश्री विजय सावंत व जयवंतराव जाधव,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" संपूर्ण कोकणपट्टीत सध्या सातत्याने बदलत असणारे हवामान, ढगाळ वातावरण काही वेळा सोसायट्याचा वारा व परिणामी आंबा फळाची होत असलेली प्रचंड घळ, सार्वत्रिकरित्या होत असलेली ही घळ वातावरणातील नेमक्या कोणत्या घटकामुळे होत आहे यांचे संशोधन कोकण कृषि विद्यापीठाने करणे आवश्यक असतानाही त्याकडे होणारे दुर्लक्ष, त्यातच आंबा पिकांवर थ्रिप्स रोग पसरलेला असल्याची फेब्रुवारी, 2013 मध्ये उघडकीस आलेली माहिती, थ्रिप्स रोगाचा प्रादुर्भाव झालेला असल्याने आंबा काळवंडत असणे, परिणामी, आंबा बागादारांमध्ये वाढीस लागत असलेली असंतोषाची भावना, यासंदर्भात शासनाने तातडीने पाऊले उचलून या हंगामातील आंबा उत्पादन हातचे जाणार नाही यादृष्टीने करावयाची तातडीची उपाययोजना व याबाबतची प्रतिक्रिया. "

डॉ.विजयकुमार गावित (फलोत्पादन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत : महोदय, या लक्षवेधी सूचनेचे निवेदन वाचल्यानंतर असे वाटते की, हे उत्तर नेमके कोणी तयार केले आहे. गेली 7 वर्षे आंबा पिकावर काही ना काही परिणाम होत असल्यामुळे आंबा बागायतदार हैराण झालेला आहे. आंब्याच्या बागा नेमक्या कोठे केल्या जातात हे तरी लक्षवेधी सूचनेचे उत्तर देणाऱ्यांना माहीत आहे काय ? महोदय, आंबा पीक डोंगरावर होते. डोंगरावर 150-200 लीटर पाणी नेऊन त्या पिकांना द्यावे लागते. अशा परिस्थितीत डोंगरावर एवढे पाणी कसे घेऊन जाणार ? या बाबतचे उपाय रत्नागिरीत करुन पाहिले आहेत. आंबा पिकावर येणाऱ्या रोगांवर उपाययोजना करण्यासाठी कोकण कृषी विद्यापीठ कोणतेही काम करीत नाही. इतर पिकावर रोग आला तर त्यावर ताबडतोब उपाय केले जातात. पश्चिम महाराष्ट्रात ऊस पिकावर रोग पडल्यानंतर ताबडतोब उपाय करण्यात आले.

या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, आंबा पिकावर पडणाऱ्या रोगांवर उपाययोजना करण्याबाबत नवीन शास्त्रज्ञांना सांगण्यात येईल काय ? आज कोकण कृषी विद्यापीठाकडे शास्त्रज्ञ नाहीत. आज हवामानात बदल होत राहतो. परंतु त्या दृष्टीने काहीच उपाययोजना केल्या जात नाहीत. इराणमध्ये वाळवंटात सफरचंद होऊ शकते. परंतु आपल्याकडे थोडीशी उष्णता वाढली की, आंब्याचे नुकसान होते, अशी परिस्थिती आहे. परंतु यावर उपाययोजना केल्या जात नाहीत. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, आंबा पिकावर पडणाऱ्या रोगाच्या बाबतीत ठोस अशा नवीन प्रकारच्या उपाययोजना करण्यात येतील काय, तसेच या अनुषंगाने कोकण कृषी विद्यापीठ काम करीत नाही म्हणून हे काम दुसऱ्या संस्थेकडे देण्यात येईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : महोदय, कोकण कृषी विद्यापीठाने या संदर्भात निश्चितपणे प्रयत्न केलेले आहेत. या विद्यापीठाच्या प्रयत्नातून काही गोष्टी निदर्शनास आल्यानंतर त्यांनी उपाय सुध्दा सुचविले. त्यानुसार त्यांनी प्रयत्न सुध्दा चालविले आहेत. मुळात त्यांना आवश्यक त्या सुविधा प्राप्त झाल्या तर त्यांना परिपूर्ण संशोधन करता येईल. कोकण कृषी विद्यापीठाकडे अपुरा कर्मचारी वर्ग आहे, शिवाय त्यांच्याकडे आवश्यक ती सामुग्री सुध्दा नाही. शिवाय आवश्यक त्या मशिनरीज सुध्दा नाहीत. या बरोबरच हवामानाची पूर्वसूचना देणारी यंत्रणा नाही. शास्त्रज्ञांची आणि इतर पदे कमी आहेत. एकंदरीत अशी परिस्थिती त्या ठिकाणी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित....

महोदय, केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी त्या ठिकाणी भेट दिल्यानंतर तेथील अडचणींबाबतचा संपूर्ण प्रस्ताव सादर करण्यास सांगितले होते. त्यांनी प्रस्ताव पाठविल्यानंतर केंद्राच्या कृषी विभागातील अधिकारी त्या ठिकाणी येऊन गेले. त्यांनी सदरहू प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यात येईल असे सांगितले आहे. त्यानुसार तो प्रस्ताव मंजूर होईल. त्या ठिकाणी 5 कर्मचारी आणि शास्त्रज्ञ आहेत. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे आणि साधनसामुग्रीमुळे कोकण विद्यापीठाला जे जे करणे शक्य होते ते त्यांनी केलेले आहे. त्यांनी पिकांच्या वेगवेगळ्या जाती निर्माण केलेल्या आहेत. त्या भागातील उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने त्यांनी निश्चितपणे प्रयत्न केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांना सांगू इच्छितो की, त्या विद्यापीठामध्ये स्टाफ आणि इतर आवश्यक गोष्टी कमी आहेत. त्यामुळे या गोष्टी उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर संशोधनाचे आणि इतर कामे परिपूर्णरित्या होतील. संशोधनानंतर आंबा पिकाची फळगळ ग्रोथ-हार्मोन्सने कमी करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. तसेच अवेळी पाऊस पडल्यानंतर झाडांना मोठ्या प्रमाणावर पालवी फुटते आणि त्यामुळे किडीचा प्रादुर्भाव होतो. शिवाय तो सतत होतो. तो थांबावा म्हणून केविलीनसारखे लिक्विड त्वरित फवारुन कीड होणार नाही या बाबतचा प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यांनी आतापर्यंत जे संशोधन केले आहे त्या नुसार त्यांनी उपाय सुचविले आहेत.

श्री.भाई गिरकर : महोदय, देवगड तालुक्यातील गिर्ये गावात दापोली कृषी विद्यापीठाचे उपकेंद्र आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की, आंब्यामध्ये देवगडचा आंबा सर्वश्रेष्ठ आंबा आहे. सध्या हवामानाच्या लहरीमुळे आंबा पिकावर रोगाचा सतत प्रादुर्भाव होतो. परिणामी दरवर्षी आंब्याचे उत्पादन कमी होते. गिर्ये येथील उपकेंद्राला प्रयोगशाळेची आवश्यकता आहे. ती प्रयोगशाळा असती तर या रोगावर नेमकी कोणती औषधे वापरावी हे समजले असते. त्या ठिकाणी पुरेसा कर्मचारी वर्ग असून सुध्दा केवळ प्रयोगशाळा नसल्यामुळे येणाऱ्या रोगाचा प्रादुर्भाव कसा रोखावा किंवा हवामानाच्या लहरीपणामुळे त्या पिकाला कसे वाचवाचे हा मुख्य भाग आहे.

अपुर्ण प्रत / शोधनेसाठी नाही

नंतर श्री.बरवड....

श्री. भाई गिरकर .....

म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, गिर्ये उपकेंद्राच्या ठिकाणी प्रयोगशाळा करुन त्या ठिकाणी आपल्याकडे जे शास्त्रज्ञ आहेत त्यांची नेमणूक करणार का ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आधीच सांगितले की, या ठिकाणी स्टाफ कमी आहे. स्टाफ मंजूर झाल्यानंतर एक सुसज्ज संशोधन केंद्र त्या ठिकाणी सुरु होईल.

श्री. भाई गिरकर : त्या ठिकाणी संशोधन केंद्र सुरु आहे. त्या ठिकाणी प्रयोगशाळा सुरु होईल का ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी सांगितले की, त्या ठिकाणी बाकीचे इक्विपमेंट आणि स्टाफ नसल्यामुळे फक्त विद्यापीठामध्ये हे काम सुरु आहे व ते सुध्दा पूर्ण नाही. ते पूर्ण करण्यासाठी निधीच्या मंजुरीसाठी ही बाब पाठविली आहे. देशाचे कृषी मंत्री आदरणीय श्री. पवार साहेबांनी प्रस्ताव मागितलेला आहे आणि तो प्रस्ताव ते मंजूर करुन देणार आहेत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले त्यामध्ये त्यांनी स्टाफचा अभाव आहे, प्रयोग शाळेचा अभाव आहे अशा अनेक उणिवा सांगितल्या. पण मला मुख्य कारण असे दिसते की, यांच्यामध्ये इच्छाशक्तीचा अभाव आहे. ही जी कृषी विद्यापीठे आहेत त्या ठिकाणी काही तरी संशोधन करुन त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा असे त्यांना अजिबात वाटत नाही. कोकणातील विद्यापीठ असेल किंवा इतर कोठलेही विद्यापीठ असेल, ते नुसते त्या ठिकाणी बसणार आणि सांगणार की आम्हाला हे नाही, आम्हाला ते नाही. या ठिकाणी त्यांनी सांगितले आहे की, आम्ही 12 आंबा बागांचे सर्वेक्षण केलेले आहे. दरवर्षी आंब्याचा जो मोहोर येतो तो कधी उशिरा येतो तेव्हा कधी ते सांगतात की, थंडीचा अभाव आहे त्यामुळे मोहोर आला नाही. मोहोरावर चिकटा नावाचा रोग पडतो. त्यामुळे आंबे सुध्दा काळे होतात. आंब्याच्या कोयीला लासा लागतो आणि देठातून तो रोग कसा पसरतो याचे जर संशोधन झाले असेल तर तुम्ही बागांमध्ये जाऊन तेथील शेतकऱ्यांना मदत करा. तसे करीत नाहीत. त्यांची इच्छाशक्ती वाढविण्यासाठी तसेच काही बागांमध्ये जाऊन त्यांना मदत करण्यासाठी ते आहेत याचे भान त्यांना कधी येणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, आमच्या शास्त्रज्ञांची इच्छाशक्ती निश्चितपणे खूप चांगली आहे म्हणूनच त्यांनी वेगवेगळे संशोधन करुन वेगवेगळ्या आंब्यांचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे त्या भागामध्ये उत्पादन वाढत आहे. परंतु या ठिकाणी एक गोष्ट निश्चितपणे सांगितली पाहिजे की, त्यांनी वेगवेगळ्या उपाययोजना सुचविल्या त्यामुळे त्यामध्ये बराचसा कंट्रोल येऊ शकलेला आहे. त्यामध्ये सध्या मल्चीन्गचा वापर करावयाचा आहे. त्याचप्रमाणे फळगळ रोखण्यासाठी त्यांनी झिब्रॅलिक ॲसीड या नवीन ॲसीडचे संशोधन केलेले आहे की ज्यामुळे त्या ठिकाणी जो मोहोर येतो तो पुन्हा पुन्हा येत नाही. हे मुळात ॲन्टी फ्लॉवरींग म्हणून काम करीत असते. त्याचप्रमाणे शेतकरी मेळावे आणि वेगवेगळ्या माध्यमातून लोकांना प्रशिक्षण देण्याचे काम ते मोठ्या प्रमाणात करतात. ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये ते होते त्या ठिकाणी काय उपाय केले पाहिजे त्याबाबत मोठे पोस्टर लावून सांगत असतात.

यानंतर श्री. खंदारे ....

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे उत्तर ऐकल्यानंतर त्यामध्ये शासनामध्ये इच्छाशक्तीचा अभाव दिसून आला आहे. मंत्री महोदयांच्या गोल गोल उत्तरातून काहीच ध्वनित होत नाही. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे अर्थकारण हे काजू, आंबा व बाकीच्या फळबागांवर अवलंबून आहे. असे असताना या फळबागांवर संशोधन का होत नाही ? या फळांवर संशोधन करणाऱ्या प्रयोगशाळा सुरु करणार की नाही, गेल्या 7-8 वर्षांचा हा अनुभव आहे. मंत्री महोदयांचे उत्तर ऐकल्यानंतर शासनाला काहीच करण्याची इच्छा दिसत नाही. त्यामुळे कोकणातील फळांवर संशोधन कधी केले जाईल याबाबत मंत्री महोदयांकडून आम्हाला ठोस आश्वासन पाहिजे. आम्ही कोकणामध्ये फिरतो तेव्हा जळालेला मोहोर, गळालेले आंबे पहावयास मिळतात. हे सर्व पाहिल्यानंतर सरकारला आणि संबंधित अधिकाऱ्यांना त्रासलेल्या लोकांबद्दल काही दयामाया वाटते की नाही आणि या फळांवर कधी संशोधन करणार आहे ते मंत्री महोदय सांगतील का ?

डॉ.विजयकुमार गावित : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना मी सांगू इच्छितो की, कोकण कृषी विद्यापीठाचे केंद्र चांगल्या प्रकारे काम करीत आहे. पूर्वी आपल्याकडे हापूस आंब्याचे उत्पादन दोन ते अडीच टनापर्यंत मिळत होते. त्यांनी वेगवेगळे संशोधन करुन लिली व ऑस्ट्रीय या नावाची नवी जात तयार केल्यामुळे 15-16 टनापर्यंत आंब्याचे उत्पादन वाढलेले आहे. तसेच रत्ना व कोकण रुची या जातीच्या आंब्याचे उत्पादन दीड टन होत होते ते आता 10 ते 15 टनापर्यंत वाढलेले आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, कोकण कृषी विद्यापीठाकडून काहीही संशोधनाचे काम होत नाही.

डॉ.विजयकुमार गावित : बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठाने आंब्यावर संशोधन केलेले आहे. त्या विद्यापीठाने आंब्याच्या वेगवेगळ्या जाती निर्माण केलेल्या आहेत. त्यामुळे कॅनिंगच्या आंब्याला अधिक किंमत मोजावी लागत होती. परंतु कॅनिंगसाठी आता वेगवेगळ्या जाती उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे त्या विद्यापीठाने संशोधन केले नाही असे म्हणणे चुकीचे आहे. मी आता एवढेच सांगेन की, संशोधन करण्यासाठी बाकीच्या गोष्टी लागतात त्या सहा महिन्यामध्ये सुरु होतील.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे : 3 वर्षापूर्वी आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी संपूर्ण कोकणातील भागाचा दौरा केला होता. मी स्वत: त्यांच्याबरोबर होतो. वेंगुर्ल्याच्या संशोधन केंद्रावर ते गेले असताना दक्षिणेतील शास्त्रज्ञांना आणि कोकण कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी एकत्रितपणे सर्व्हे करण्याच्या सूचना केल्या होत्या. या दोन्ही टीमने कोकणातील अनेक भागांची पाहणी केली होती, त्या पाहणीचे निष्कर्ष काय आहेत, केंद्रीय व राज्य सरकारच्या टीमने एकत्रित काम करण्यासाठी बैठक घेऊन त्यांनी निर्देश दिले होते. त्याचे पुढे काय झाले ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.बिनसाळे हा विषय ओढूनताडून मांडत आहेत.

श्री.प्रकाश बिनसाळे : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे माझा प्रश्न पूर्ण करु देत नाहीत. आपण मला संरक्षण द्यावे.

श्री.दिवाकर रावते : माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांना या देशामध्ये वेगवेगळ्या भागात निर्माण होणाऱ्या आंब्यांच्या जातीसंबंधी ज्ञान नाही असे सन्माननीय सदस्यांना म्हणावयाचे आहे का ? या महाराष्ट्रातील ते ज्येष्ठ नेतृत्व आहे. ते अनेक वर्षे मुख्यमंत्री होते.

श्री.प्रकाश बिनसाळे : त्यांच्या सूचनेनुसार दोन्ही टीमने काम केलेले आहे. त्यासंबंधी तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्या टीमच्या पाहणीचे निष्कर्ष काय आहेत आणि माननीय श्री.शरदराव पवार यांनी जे निर्देश दिले होते त्याचा पाठपुरावा करण्यात आला आहे का ?

डॉ.विजयकुमार गावित : त्याबद्दलची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी चांगला प्रश्न विचारला होता. आता मंत्री महोदयांची इच्छाशक्तीच शिल्लक राहिलेली नाही असे त्या म्हणाल्या आहेत. तेव्हा मंत्री महोदयांची इच्छाशक्ती वाढविण्यासाठी कोकण कृषी विद्यापीठाने काही संशोधन केलेले आहे काय, केले नसेल तर ते करणार आहे काय, त्यात फवारणीचा विषय आहे काय ?

उप सभापती : फवारणी करण्याकरिता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : मंत्री महोदयांची इच्छाशक्ती वाढविण्यासाठी एखाद्या विद्यापीठाने खाद्य, खत किंवा औषध तयार केले आहे काय, संशोधन केले आहे काय याची विद्यापीठांकडून माहिती घेण्यात येईल, सन्माननीय सदस्यांकडूनही माहिती घेतली जाईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

श्री. आर.आर.पाटील...

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे कोणते खाद्य किंवा औषध फवारुन घेत होते याची देखील माहिती आम्ही घेऊ.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, कोकणामध्ये तीन-चार दिवसात तापमान 40 डिग्री सेल्सियस पर्यन्त गेले होते. त्याआधी अचानक पाऊस पडला. नंतर 15 दिवसांनी पुन्हा तापमान 40 डिग्री सेल्सियस पर्यन्त गेले. त्यामुळे आंबा पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. या आंबा पिकाच्या झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण करुन शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात येईल काय ?

डॉ. विजयकुमार गावित : प्रथम हे सांगितले पाहिजे की, मंत्र्यांच्या मानसिकतेपेक्षा सन्माननीय सदस्य जे बोलले त्याप्रमाणे त्यांची मानसिकता आहे काय ? शास्त्रज्ञ जे सांगतात त्याचे अनुकरण न केल्यामुळे या गोष्टी घडत आहेत....

श्री. विनोद तावडे : माननीय मंत्री महोदयांचे वक्तव्य हे कोकणातील माणसांचा अवमान करणारे आहे. हे विधान आक्षेपार्ह आहे. ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

डॉ. विजयकुमार गावित : या ठिकाणी सन्माननीय सदस्य अशा प्रकारे विधान करुन मंत्री महोदयांचा अवमान करीत आहेत असे आपणास वाटत नाही काय ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळील वेलमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

उप सभापती : कार्यवृत्त तपासून आक्षेपार्ह विधान असेल तर ते काढून टाकण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये पदक पटकावलेल्या खेळाडूंना नोकरी देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे

मु. शी. : आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये पदक पटकावलेल्या खेळाडूंना नोकरी देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, अशोक उर्फ भाई जगताप व चरणसिंग सप्रा,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाने राज्याचे क्रीडा धोरण घोषित करतांना त्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये ब्राँझ पदक पटकावलेल्या खेळाडूला राज्यसेवा परीक्षा न देता प्रथम श्रेणीची नोकरी देण्याचा निर्णय घेण्यात येणे, परंतू याची ठोस अंमलबजावणी झालेली नसणे, सन २००६ साली मेलबर्न येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेतील नेमबाजीमध्ये दोन सुवर्णपदके मिळविणाऱ्या तेजस्विनी सावंत ह्या खेळाडूस शासनाने प्रथम श्रेणी नोकरी देणे, परंतु त्यात वेतन श्रेणी कमी ठरविण्यात येणे, सन २०१० साली तेजस्विनी सावंत विश्वविजेती नेमबाज झाल्यानंतर शासनाने तिला पदोन्नती देण्याचे ठरविणे, परंतु तीन वर्षाचा कालावधी लोटला तरी अद्याप पदोन्नती मिळालेली नसणे, आंतरराष्ट्रीय नेमबाज राही सरनोबत, तसेच राष्ट्रीय पातळीवरील तलवारबाज उत्कर्षा मोटे, अशा अनेक खेळाडूंना अद्याप नोकरी न मिळणे, कबड्डीमध्ये विश्वचषक जिंकणाऱ्या खेळाडूंना प्रत्येकी १ कोटी रुपये देण्याचे शासनाने ठरवून देखील ते अद्याप देण्यात न येणे, यामुळे खेळाडूंच्या मनात शासनाप्रती निर्माण झालेली चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.पद्माकर वळवी (क्रीडा व युवक कल्याण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केलेल्या आहेत. सदरहू निवेदनामध्ये आपल्या अनुमतीने मी दुरुस्ती करु इच्छितो.

उप सभापती : ठीक आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी : लक्षेवधी सूचनेच्या निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक 2 वरील सहाव्या ओळीतील "ग्रेड पे रु. 6600" या ऐवजी "ग्रेड पे रु.5400" असे वाचावे. बाकी वितरित केल्याप्रमाणे निवेदन आपल्या अनुमतीने मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : सुधारल्याप्रमाणे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सन्माननीय क्रीडा राज्यमंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेवरील निवेदनात जी दुरुस्ती केली, तोच खरा महत्वाचा आहे. खेळाडूसांठी वेगवेगळया प्रकारच घोषणा सरकार करीत असते, परंतु त्या घोषणांची अंमलबजावणी मात्र होत नाही. 2006 मध्ये जागतिक स्तरावर झालेल्या स्पर्धेत नेमबाज श्रीमती तेजस्विनी सावंत हिने दोन सुवर्ण पदके पटकाविली आहेत. सरकारने घोषणा केली की, एम.पी.एस.सी.ची परीक्षा न देता श्रीमती तेजस्विनी सावंत यांना राज्य शासकीय कार्यालयात प्रथम श्रेणीतील नोकरी उपलब्ध करुन देणार. शासनाने श्रीमती तेजस्विनी सावंतला दोन वर्षानंतर प्रथम श्रेणीतील नोकरी दिली. परंतु वेतन निश्चित करताना मात्र वेतन कमी ठरविले. 2010 या वर्षी जागतिक स्तरावर भारतातील पहिली महिला विश्वविजेती झाली. माननीय मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी सत्कार करीत असताना घोषित केले की, पहिली महिला विश्वविजेती असल्यामुळे तिला तिच्या नोकरीमध्ये पदोन्नती देणार आहोत. घोषणा करुन तीन वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे, अजूनही त्या विश्वविजेत्या महिलेला पदोन्नती दिली गेलेली नाही.

महोदय,कबड्डीच्या प्रत्येक खेळाडूंना 1 कोटी रुपये देऊ अशा प्रकारची घोषणा शासनाने केली आहे. गेल्या तीन अधिवेशनात हा विषय चर्चेला येतो आहे. कबड्डीच्या प्रत्येक खेळाडूंना 1 कोटी रुपये अद्याप मिळालेले नाहीत. इयत्ता 10 आणि 12 मधील विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये खेळले तर त्यांना आम्ही 25 गुण देण्यात येतील अशा प्रकारची घोषणा शासनाने केली होती. त्या घोषणेत पुन्हा बदल करण्यात आला आहे. ते विद्यार्थी नापास होणार असतील तर त्या विद्यार्थ्यांना 25 गुण देऊ. अशा प्रकारच्या किती तरी विषयांच्या बाबतीत शासनाने घोषणा केलेल्या आहेत, त्या घोषणांची अमंलबजावणी होत नाही. जागतिक स्तरावर कोणतेही पदक मिळाले तर त्या खेळाडूला श्रेणी-अ मधील पद देऊ असे शासनाने जाहीर केलेले आहे. आता शासन सांगते आहे की, क्रीडा क्षेत्रात कोणतेही पदक मिळाले तर त्याला श्रेणी-अ मधील पदक देण्यात येईल. खेळाडूंना वेगवेगळया वेळेला प्रोत्साहन देण्यासाठी घोषणा केल्या जातात. त्या घोषणांची अंमलबजावणी शासनाकडून होत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे.

महोदय,श्रीमती तेजस्विनी सावंत यांना रु. 6600 ग्रेड पे देणे आवश्यक असताना त्यांना रु.5400 ग्रेड पे का देण्यात आला याचा माननीय क्रीडा राज्यमंत्र्यांनी खुलासा करावा. तीन वर्षापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की, भारतातील पहिली महिला विश्वविजेती असल्यामुळे तिला पदोन्नती देण्यात येईल. अजूनही या विश्वविजेत्या महिलेला पदोन्नती का देण्यात आली नाही ?

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.पद्माकर वळवी : सभापती महोदय, श्रीमती तेजस्विनी सावंत हिने राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेमध्ये दोन सुवर्णपदके मिळविली म्हणून तिला शासनात वर्ग-1 ची नोकरी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. रुपये 15600 ते 39100 असे वेतन निश्चित केलेले आहे. ग्रेड पे 6600 होता, तो 5400 करण्यात आला आहे. त्याचे कारण असे आहे की, आपण त्या खेळाडूस वर्ग-1 ची ग्रेड दिलेली आहे. श्रीमती तेजस्विनी सावंतला विशेष कार्य अधिकारी म्हणून नेमणूक दिलेली आहे. क्रीडा संचालनालयामध्ये विशेष कार्य अधिकाऱ्याचे एकमेव पद आहे. ते एकाकी पद असल्यामुळे त्या पदास पदोन्नती नाही. खेळाडूला वर्ग-1 ची नोकरी देतो, त्यानंतर त्यांचे रेग्युलरली प्रमोशन व्हावे असे सामान्य प्रशासन विभागाचे आणि शासनाचे धोरण आहे. त्या क्रीडा संचालनालयामध्ये विशेष कार्य अधिकाऱ्याचे पद निर्माण करण्यात आले आहे. श्रीमती तेजस्विनी सावंतला वर्ग-1 ची नोकरी दिली. श्रीमती सावंतला सर्व बक्षिसे व अनुदान दिलेली आहेत. तसेच कोल्हापूर शहरात एक प्लॉट सुध्दा देण्यात आला आहे. खेळाडूंना सन्मान म्हणून शासनामार्फत गौरव बक्षिसे देण्याचे शासनाचे धोरण ठाम आहे. त्या धोरणाप्रमाणे खेळाडूंना गौरव बक्षिसे देण्यात येतात.

सभापती महोदय, अभिलाषा म्हात्रे, सुवर्णा बारटक्के आणि दिपिका जोसेफ हया तिन्ही कबड्डीच्या खेळाडू आहेत. या तिन्ही कबड्डी खेळाडूंना प्रत्येकी 1 कोटी रुपये देण्याचे मान्य केले आहे. मार्च महिन्याच्या बजेटमध्ये पुरवणी मागणी सादर केलेली आहे, ती पुरवणी मागणी मान्य होईल अशी अपेक्षा आहे. ही पुरवणी मागणी वित्त विभागाने मंजूर केलेली आहे. अधिवेशन संपण्याच्या आत या तिन्ही महिला कबड्डी खेळाडूंना प्रत्येकी 1 कोटी रुपयांचे बक्षीस शासनातर्फे दिले जाणार आहे. इयत्ता 10 आणि 12 वी मधील राज्यस्तरीय खेळाडू विद्यार्थ्यास 25 गुण देण्याच्या संदर्भात मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. इयत्ता 10 आणि 12 वी मधील राज्यस्तरीय खेळाडू विद्यार्थ्यांस 25 गुण देण्याचे धोरण शासनाने हाती घेतले होते. या धोरणाचा शासनाने पुनर्विचार केला. खेळाडू अनुत्तीर्ण झाला तर त्याला 25 गुण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत खेळणाऱ्या इयत्ता 10 वी 12 मधील विद्यार्थी उत्तीर्ण असले तरी त्यांना 25 गुण देण्यात यावे अशा प्रकारची मागणी होत आहे. त्यामुळे ही बाब आम्ही तपासून बघू. राज्यस्तरीय स्पर्धेत खेळणारा इयत्ता 10 वी 12 मधील विद्यार्थी अनुत्तीर्ण असेल तर त्याला 25 गुण देण्याचे सध्या शासनाचे धोरण आहे.

यानंतर श्री. भोगले.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-6.....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, शासनाने क्रीडा धोरण जाहीर केले त्या धोरणाचे आम्ही स्वागत केले, मंत्री महोदयांचे व शासनाचे कौतुक केले होते. ज्या ज्यावेळी शासनाने खेळाडूंबाबत धोरणात्मक निर्णय घेतले ते खेळाडूंवर मेहेरबानी म्हणून नव्हे तर त्या खेळाडूंनी या देशासाठी, या राज्यासाठी विशिष्ट कामगिरी केली, म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला. तेजस्विनी सावंत यांनी शूटिंगमध्ये तर अभिलाषा म्हात्रे, सुवर्णा बारटक्के आणि दिपिका जोसेफ यांनी कबड्डी खेळामध्ये देशाचे नाव उज्ज्वल केले आहे, कबड्डी खेळात देशाला सुवर्ण चषक मिळवून दिला. आम्ही त्यांचा गौरव केला, त्यांना बक्षिसे जाहीर केली, वृत्तपत्रात त्याचे फोटो प्रसिध्द झाले. परंतु आजपर्यंत जाहीर केलेली बक्षिसाची रक्कम त्यांना दिली गेली नाही. .....(गोंधळ).....31 मार्चपूर्वी बजेटमध्ये तरतूद केली जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले मी त्या निर्णयाचे स्वागत करतो.

उप सभापती : मंत्री महोदयांनी कबूल केले की, 31 मार्चपर्यंत बक्षिसाची रक्कम दिली जाईल. मी सुस्पष्ट निर्देश देतो की, ही रक्कम या खेळाडूंना 31 मार्चपर्यंत अदा करावी आणि या खेळाडूंचा सन्मान करावा.

श्री.भाई जगताप : हा पैशाचा किंवा रक्कमेचा प्रश्न नाही. शासनाने घेतलेल्या निर्णयाचे मी स्वागत करतो आणि आभार मानतो. शासनाने या खेळाडूंना नोकरी देण्याचे मान्य केले आहे. त्यासाठी कायद्यामध्ये काही बदल करण्यात आले. कबड्डी खेळामध्ये ज्या खेळाडूंनी देशासाठी आणि राज्यासाठी विशेष कामगिरी केली, त्यांना नोकरी देण्यासाठी कायद्यात बदल केला आहे. या तीनही मुलींना शासन सेवेत केव्हा घेण्यात येईल आणि त्यांना वर्ग 1 च्या पदावर नियुक्ती दिली जाईल काय?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, कबड्डी खेळामध्ये पुरस्कार मिळविलेल्या तीनही मुलींना 31 मार्चच्या आत बक्षिसाची रक्कम देण्यात येईल. सुवर्णा बारटक्के, अभिलाषा म्हात्रे आणि दिपिका जोसेफ यांना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यात येणार आहे. दिपिका जोसेफ हिचा अर्ज अगोदरच आल्यामुळे त्यावरील प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यांना थेट नियुक्ती देण्याचा प्रस्ताव शासनाने मान्य केला आहे. दिपिका जोसेफ हिने विक्रीकर अधिकारी, वर्ग 1 हे पद मागितले होते. त्या अनुषंगाने वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता. शासनाने त्यांची विनंती मान्य केली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी.....

असून त्यांना नोकरी देण्यात येणार आहे. सुवर्णा बारटक्के आणि अभिलाषा म्हात्रे यांना थेट सेवेत घेण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास क्रीडा विभागाने सांगितले आहे. आतापर्यंत 12 खेळाडूंना थेट सेवेत घेण्याचे ठरविले होते. त्यातील दहा खेळाडूंना शासन सेवेत जिल्हा क्रीडा अधिकारी, पोलीस उप अधीक्षक, नायब तहसीलदार, तहसीलदार या पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. थेट नियुक्ती देण्याबाबत मुख्य सचिवांची समिती आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आहे. कबड्डी खेळात विशेष नैपुण्य प्राप्त तीनही खेळाडूंबाबत या दोन्ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येतील.

नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी ...

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, तेजस्विनी सांवत यांना पदोन्नती देण्याच्या संदर्भातील फाईल सामान्य प्रशासनाकडे पाठवण्यात आली असून हे पद एकाकी असून त्यासंदर्भात सुध्दा शासन निश्चितपणे विचार करेल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, तेजस्विनी सावंतच्या पदोन्नतीच्या संदर्भात खरे म्हणजे आपण निर्देश देण्याची आवश्यकता आहे. तेजस्विनी सावंतने प्राविण्य मिळवले व तिचे यश जगात पहिले ठरले म्हणून आपण तिला नोकरी दिली. माननीय मुख्यमंत्र्यांनी तेजस्विनी सावंतचा सत्कार करतांना यासंदर्भात तीनदा उच्चार केला होता तसेच या सभागृहातही उच्चार केला होता. माननीय मुख्यमंत्र्यांनी तेजस्विनी सावंतच्या संदर्भात तीनदा उच्चार केल्यामुळे माझे ठाम मत आहे की, सामान्य प्रशासन विभागाशी पाठपुरावा करणे हे क्रीडा विभागाचे काम आहे. आपल्याकडे डेप्युटी डायरेक्टर स्पोर्टच्या दोन जागा रिक्त आहेत. तेजस्विनी सावंतकडे डेप्युटी डायरेक्टर स्पोर्टचे कॉलीफिकेशन सुध्दा आहे. प्रमोशन मिळाल्यानंतर जो स्केल पाहिजे तो आपण देऊ शकतो. त्यामुळे तेजस्विनी सावंतची पदोन्नती डायरेक्टर ऑफ स्पोर्ट या पदावर केली जाणार आहे काय ?

श्री. पद्माकर वळवी :सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. हा विषय पदोन्नतीचा असल्यामुळे यामध्ये थोडा विलंब लागण्याची शक्यता आहे, असे असले तरी या विषयाला लवकरात लवकर न्याय दिला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ. शी./मु. शी. : मौजे पोयसर, गायत्री नगर सह. गृहनिर्माण संस्था, ठाकूर कॉम्लेक्स ,कांदिवली (पूर्व) येथील झोपडया प्रस्तावित रस्त्याला बाधा करीत असणे याबाबत श्री. रामदास कदम ,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय,मौजे पोयसर,न.भु.क्र. 759, गायत्री नगर सह. गृहनिर्माण संस्था, ठाकुर कॉम्पलेक्स, कांदिवली (पूर्व) मुंबई येथील झोपडीधारकांच्या झोपडया रस्त्यामध्ये बाधित होत असून तेथे बोगस एस.आर.ए. योजना राबविण्यात येत आहे. विकासकामार्फत एका झोपडयाच्या तीन-तीन झोपडया दाखवून बनावट कागदोपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक करण्यात यत आहे, गेल्या 6 वर्षापासून सदर गृहनिर्माण संस्थेला उपजिल्हाधिकाऱ्याकडून नोटीसा देण्यात येत आहे, परंतु नागरिकांसाठी रस्ता खुला करण्याबाबत कोणताही ठोस निर्णय घेण्यात येत नाही, परिणामी सदर ठिकाणी झोपटपट्टीचे प्रमाण वाढत आहे, झोपडी धारक बगीच्याच्या आवारात केर-कचरा-विष्टा टाकत असल्यामुळे तेथील गटारे पूर्णपणे भरुन गेली असून त्याच्या दुर्गंधीमुळे परिसरातील रहिवाश्यांमध्ये रोगाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे, झोपडपट्टीमुळे झगडूसिंग ठाकूर बगिच्याचा तेथील करदात्या नागरिकांना उपभोग घेता येत नाही.

या झोपडपट्टीच्या दोन्ही बाजूने रस्ता असून या ठिकाणचा बगिचा अजून मोठा व्हावा यासाठी मी गेल्या सात वर्षापासून सतत प्रयत्न करीत आहे. दोन्ही बाजूने 90 फूटांचा रस्ता आहे व या झोपडया रस्त्याच्या मध्येच ठेवण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भात प्रांताधिकारी, जिल्हाधिकारी तसेच महानगर पालिकेकडून नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. परंतु कोणाचा तरी राजकीय वरदहस्त असल्यामुळे या झोपडया खाली केल्या जात नाहीत. या झोपडया एका विशिष्ट समाजाच्या आहेत. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, समाज न पाहता, विकास पहावा व झोपडीच्या बाजूपर्यंत जो रस्ता आलेला आहे तो जोडावा अशी मी विशेष उल्लेखाद्वारे सूचना करीत आहे.

उप सभापती :शासनाने या विषयात गांभीर्याने लक्ष घालून तातडीने कार्यवाही करावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी.:मानव विकास कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या बसेसचा वापर केवळ विद्यार्थीनीच्या प्रवासासाठी करणे याबाबत श्री. सतीश चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. सतिश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"मानव विकास कार्यक्रमांतर्गत विद्यार्थीनीच्या मोफत प्रवासासाठी राज्य परिवहन महामंडळाला(एस.टी) मिळालेल्या बहुतांश एसटी महामंडळ लांब पल्ल्याच्या वापरासाठी वापरण्यात येणे, तसेच आहेत या एसटी बसेस वेळेवर सोडण्यात न येणे, परिणामी राज्यभरातील विद्यार्थींना मिळेल त्या वाहनाने प्रवास करावा लागणे, 109 कोटी रुपये खर्च करुन 625 बसेस खरेदी करण्यात आल्या होत्या. या बसेसचा उपयोग केवळ विद्यार्थीनीच्या प्रवासासाठी करण्यात यावा अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास करीत आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कोल्हापूर येथील विमानतळाचे "छत्रपती राजाराम महाराज विमानतळ" असे नामाभिधान करण्याबाबत श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासात विमान सेवेचे विशेष महत्व आहे. देशाच्या इतिहासात सामाजित समतेचे प्रणेते म्हणून ओळखले जाणारे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे कर्तृत्ववान सुपुत्र छत्रपती राजाराम महाराज यांनी दूरदृष्टीने 1939 साली कोल्हापूर विमानतळाची स्थापना करुन विमान सेवेस प्रारंभ केला होता.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

कोल्हापूर विमानतळाचे लवकरच विस्तारीकरण होणे प्रस्तावित आहे. सुमारे 74 वर्षापूर्वी विमानतळ सुरू करून क्रांतिकारी पाऊल उचलणाऱ्या "छत्रपती राजाराम महाराज" यांचे नाव विमानतळास द्यावे अशी तमाम कोल्हापूरवासियांची तीव्र इच्छा आहे व ते औचित्यपूर्ण ठरणार आहे.

कोल्हापूरकर यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. भारतीय विमानपत्तन प्राधिकारण यांच्यातर्फे कळविण्यात आले आहे की, यासंबंधी राज्य विधिमंडळात मान्यता घेऊन महाराष्ट्र शासनातर्फे विमान वाहतूक मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

कोल्हापूर विमानतळाचे नामकरण "छत्रपती राजाराम महाराज विमानतळ" असे करण्यासाठी राज्य विधिमंडळाच्या या अधिवेशनात ठराव संमत करून घेण्याची विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील रिक्त पदे तातडीने भरणे याबाबत श्री.मोहन जोशी वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यात दरवर्षी डी.एड्.परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून राज्यात बेकार शिक्षकांची संख्या वाढली आहे. यावर्षी 91 हजार विद्यार्थ्यांपैकी 61 हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अशा प्रकारे दरवर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या मिळून ती लाखोंच्या घरात गेली आहे. या लाखो विद्यार्थ्यांची संख्या पाहता राज्यातील डी.एड्. कॉलेजची संख्या वाढत चालली आहे हे स्पष्ट होते. शिक्षकीपेशा समाजाला दशा आणि दिशा देण्याचे काम करतो. शिक्षक चांगला असेल तर भावी पिढ्या देखील चांगल्या सुजाण तयार होतात. मात्र जे शिक्षक ज्या विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवायला निघाले आहेत त्याच शिक्षकांचे भवितव्य अंधारात असल्याचे या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवरून स्पष्ट होते. राज्यात शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत आणि एकीकडे लाखोंच्या संख्येने बेकार असलेले पदविकाधारक शिक्षक आहेत. तरी सदर बाब लक्षात घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील रिक्त पदे भरण्याची तातडीने कार्यवाही करावी तसेच इतर राज्यांप्रमाणे टीईटी किंवा सीईटी आयोजित करून हा प्रश्न सोडवावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास करीत आहे."

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : श्रीमती शिल्पा केतन कटारिया यांनी घरांचे आमिष दाखवून लोकांची केलेली फसवणूक याबाबत श्रीमती विद्या चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

सभापती महोदय, मुंबईत घरांचे आमिष दाखवून अनेक लोकांची फसवणूक करण्यात येत आहे. अशा लोकांवर कारवाई करण्यासंबंधी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. अनेक प्रकरणे आलेली आहेत त्यापैकी हे एक प्रकरण आहे.

"मुंबईत श्री इंटरप्रायझेसचे भागीदार श्रीमती शिल्पा केतन कटारीया कार्यालयीन पत्ता 3/526 नवजीवन कमर्शियल प्रिमायसेस, लॅमिन्टन रोड, मुंबई यांनी आर.एल.रेसिडेन्सी सर्व्हे नं.20/3, चितळे गाव, ता. पनवेल, जि. रायगड येथे घर बांधून देतो असे सांगून श्री. धीरज बंगाळे, श्री. नितीन सिंह, सौ. पूनम शिंदे व इतर यांच्याकडून प्रत्येकी 4 लाख प्रमाणे पैसे घेऊन घर बांधण्याचे आश्वासन देणे, मात्र श्रीमती शिल्पा केतन कटारिया यांचे मुंबई सेंट्रल येथील कार्यालय चार महिन्यांपासून बंद असणे, पनवेल येथील ज्या प्लॉटवर घरे देणार होते, त्याचे सातबारा उतारे दुसऱ्याच्या नावे असणे, येथे कोणत्याही बांधकामाची परवानगी नसताना पैसे देणाऱ्यांना आर.सी.एल. या इमारतीमध्ये ताबा पत्र व प्रोव्हिजन बुकींग रिसिट देऊन त्यांची फसवणूक करण्यात आल्याचे उघडकीस येणे, अशाच प्रकारे मुंबईमध्ये घरांचे आमिष दाखवून अनेक लोकांची फसवणूक केली जाणे, सदर प्रश्नी फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून फसवणूक झालेल्यांना त्यांचे पैसे परत मिळवून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई येथील इमारत क्रमांक 30 ते 43 या इमारतींचा पुनर्विकास करणे याबाबत श्रीमती अलका देसाई, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई येथील इमारत क्रमांक 30 ते 43 या मुंबई महानगरपालिकेच्या 14 इमारती, मुंबई हौसिंग बोर्डाच्या जागेवर आहेत. महानगरपालिकेच्या रस्ता रूंदीकरणामध्ये विस्थापित झालेल्या झोपडपट्टीधारकांना येथे पुनर्वसित करण्यात आले होते, या बाबीस सद्य:स्थितीत 40 वर्षे पूर्ण होत आले असून या इमारती मोडकळीस आल्याने या इमारतीतील रहिवाशांनी सोसायटी करून ती व्होरा बिल्डरला विकसित करण्यास दिली. परंतु, या बिल्डरने सदरहू इमारती अन्य विकासकांस विकसित करण्यास देऊन दहा वर्षे होत आली आहेत. तरी सुद्धा अद्यापही संबंधित विकासकाने उक्त इमारतींचे बांधकामास सुरूवात केलेली नाही. या कारणास्तव या इमारतीमध्ये पूर्वी वास्तव्य करणारे भाडेकरू घराबाहेर असून ते इतरत्र वास्तव्य करून असल्यामुळे त्यांची गैरसोय होत आहे. सदरहू भाडेकरूंची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता त्वरित या इमारतींचे बांधकाम विकासकाने सुरू करावे किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळाने या इमारतींचा पुनर्विकास करावा याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

.....

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : कर्णबधिर मुलांच्या उपचारासाठी असलेले कॉक्लीअर ट्रान्सप्लान्ट यंत्राचे बंद केलेले उत्पादन पुन्हा सुरु करणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.दीपक सांवत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, एका सर्वेक्षणानुसार भारतात साधारणत: दहा हजार कर्णबधिर मुले आहेत, ज्यांना ऐकू येत नाही. काहींना जन्मजात ऐकू येत नाही तर काहींना ॲन्टीबायोटिक्सच्या उपचारामुळे ऐकू येत नाही. माननीय श्री.अब्दुल कलाम हे राष्ट्रपती असताना त्यांनी संरक्षण संशोधन व विकास या माध्यमातून भारतीय बनावटीचे कॉक्लीअर ट्रान्सप्लांट बनविण्याचा उपक्रम हाती घेतला होता आणि त्यांनी सर्व राज्यांना अशा प्रकारचा इन्प्लांट बनविण्यास सांगितले होते. कारण इम्पोर्टेड इन्प्लांटची किंमत सहा ते बारा लाख रुपयांपर्यंत असते. मुंबईमध्ये दरवर्षी 500 लोकांना हा इन्प्लांट लागतो. सर्वसामान्य कुटुंबातील माणसे हा इन्प्लांट खरेदी करु शकत नाही. एकूण 13 राज्ये अशी इन्प्लांट बनवितात. परंतु महाराष्ट्र राज्य अशाप्रकारचे कॉक्लीअर इन्प्लांटचे उत्पादन करीत नाही. राज्य शासनातर्फे या कॉक्लीअर इन्प्लांटचे उत्पादन करण्यात येत होते परंतु सध्या ते बंद करण्यात आले आहे. तरी राज्य शासनाने सदर यंत्रांचे उत्पादन सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे ही बाब मी विशेष उल्लेखाद्वारे मांडत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु.शी. : पुणे महापालिकेच्या वतीने जेएनएनयुआरएमच्या निधीतून बीएसयुपी योजनेंतर्गत झोपडपट्टी योजनेंतर्गत हडपसर, वारजेसह काही भागात बांधण्यात येणाऱ्या घरकुलांचे रखडलेले काम लवकरात लवकर करणे याबाबत श्री. अनिल भोसेल, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, पुणे महापालिकेच्यावतीने जेएनएनयुआरएमच्या निधीतून बीएसयूपी योजनेंतर्गत झोपडपट्टी योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत हडपसर,वारजेसह काही भागात घरकुले बांधण्यात आली. आतापर्यंत सुमारे चार हजार घरे बांधण्यात आली व त्यासाठी प्रत्येक घरांसाठी 3लाख 80 हजार रुपये खर्च करण्यात आला. सामान्य झोपडीधारकांना ही रक्कम भरण्यासाठी बँकेकडून कर्ज घेतले. परंतु आता मुद्रांक शुल्क नोंदणी विभागाने घरकुलाची नोंदणी करण्यासाठी रेडीरेकनरच्या एक टक्का रक्कम भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे घरांचे वाटप रखडले आहे. हे वाटप लवकरात लवकर करण्यात यावे अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : शालेय शिक्षण विभागाच्या निकषपात्र ठरलेल्या शाळा, तुकड्या, वाढीव पदे, वेतन, वेतनेतर देयके इत्यादी आर्थिक मागण्यांसाठी शासनाने लक्ष घालून शालेय शिक्षण विभागास आवश्यक पैसा मिळण्यासाठी निर्णय घेणे याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.भगवान साळंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाचे सर्व आदेश मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार असतात. सर्व विभागाप्रमाणे शालेय शिक्षण विभागातही आर्थिक गरजांसाठी अर्थ विभागावर अवलंबून रहावे लागते. शालेय शिक्षण विभागाच्या निकषपात्र ठरलेल्या शाळा, तुकड्या, वाढीव पदे, वेतन, वेतनेतर देयके इत्यादी आर्थिक मागण्यांसाठी वित्त विभागाकडे धाव घ्यावी लागते. वित्त विभागाचे सर्वच अधिकारी या देयकांकडे नकारात्मक भूमिकेतून पाहत ते प्रस्ताव नामंजूर करतात. त्यामुळे शालेय शिक्षण विभागच लोकक्षोभाचा बळी ठरतो. तेव्हा शासनाने लक्ष घालून शालेय शिक्षण विभागास आवश्यक पैसा मिळण्याच्या कामी निर्णय घेण्यात यावा अशी मी विशेष उल्लेखाद्वारा विनंती करीत आहे.

उप सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.23 ते 3.00 पर्यंत मध्यंतर)

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्यंतरानंतर

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>ॲडव्होकेट जनरल यांनी इंडीया बुल्स कंपनीच्या संदर्भात सरकारच्या वतीने न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राबाबत</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु होणार आहे. मुळात हा विषय मांडण्यास माझा आक्षेप आणि हरकत आहे. राज्यपाल हे घटनात्मक पद आहे. माननीय राष्ट्रपतींच्या अधिपत्याखाली कोणत्याही राज्याचे राज्यपाल त्यांच्या वतीने काम करीत असतात. राज्यात घटनेचे संरक्षण करुन, घटनादत्त कारभार चालविण्याची त्यांची जबाबदारी असते. कायद्याच्या बाबतीत कोणताही निर्णय घेतला तरी माननीय राज्यपालांच्या मान्यतेशिवाय तो कायदा पारित होत नाही. एकप्रकारे विधिमंडळाच्या सर्वश्रेष्ठतेवर शिक्कामोर्तब करण्याचा अधिकार आदरणीय राज्यपाल महोदयांचा आहे. पूर्वी राज्यपालांना 'महामहिम' संबोधले जायचे. परंतु आपल्या राज्याच्या आदरणीय राज्यपालांनी यापुढे मला 'महामहिम' नव्हे तर 'माननीय' असे संबोधावे असे सांगितले. अशाप्रकारे आपल्या राज्याचे राज्यपाल लोकाभिमुख काम करणारे आहेत. त्यांच्याबद्दल आम्हाला आदर असून, त्यांच्या भावनांबद्दल सन्मान आहे. माननीय राज्यपालांकडे कोणत्याही कामानिमित्त गेल्यानंतर ते ज्या पध्दतीने आपल्या राज्याबद्दल जे बोलतात ते ऐकून खूप बरे वाटते, किंबहुना अभिमान वाटतो.

महोदय, देशात महाराष्ट्र, गुजरात आणि नागालँड या तीन मागासलेल्या राज्यांना घटनेच्या 371 (2) अंतर्गत संरक्षण दिले आहे. या कलमानुसार महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भ या मागास भागासाठी खास तरतूद असावयास पाहिजे. तसेच त्या भागातील अनुशेष दूर करण्यासाठी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

वैधानिक विकास मंडळे निर्माण करावी आणि त्या माध्यमातून अनुशेष भरुन काढावा अशी त्यात तरतूद आहे. गुजरात राज्यासाठी वेगळी तरतूद आहे.

महोदय, घटनेच्या 371 (2) मध्ये नमूद केले आहे की, "या संविधानात काहीही असले तरी, (महाराष्ट्र किंवा गुजरात ह्या राज्याबाबत) आदेश करुन त्याद्वारे राष्ट्रपतीला पुढील गोष्टींसाठी राज्यपालावर कोणतीही विशेष जबाबदारी सोपविण्याचा उपबंध करता येईल --

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

(क) विदर्भ, मराठवाडा (व उर्वरित महाराष्ट्र किंवा, यथास्थिती) सौराष्ट्र, कच्छ व उर्वरित गुजरात यांच्यासाठी अलग अलग विकास मंडळ स्थापन करुन, त्यापैकी प्रत्येक मंडळाच्या कामकाजाचा अहवाल दरवर्षी राज्य विधानसभेसमोर ठेवला जाईल अशी तजवीज करणे ;

(ख) सबंध राज्यांच्या गरजा साकल्यानें लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधीचे समन्यायी वाटप करणे ; आणि

(ग) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रांबाबत तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यांसाठी पर्याप्त सोयी व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीची पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्यायी व्यवस्था करणे" अशा प्रकारची तरतूद असल्यामुळे या महाराष्ट्रामध्ये या मागास भागाला न्याय मिळावा याकरिता फार मोठे आंदोलन झाले. मराठवाड्याला वैधानिक विकास मंडळ द्यावे आणि आमचा मागासलेपणा दूर करावा अशा प्रकारची तीव्र मागणी घेऊन आदरणीय श्री. गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा मुक्ती लढ्यानंतर या लढ्याचे नेतृत्व त्यांना करावे लागले.

सभापती महोदय, श्री. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना 1984 साली वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याची घोषणा राज्य सरकारने केली. पण ते स्थापन झाले नाही. माननीय श्री. शंकरराव चव्हाण यांचा वैधानिक विकास मंडळ निर्माण करण्यास कडवट विरोध असल्यामुळे वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याकरिता कोणताही मुहूर्त मिळत नव्हता. आदरणीय श्री. शरद पवार साहेब हे तिसऱ्यांदा या राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर 1994 मध्ये नामांतराचा प्रचंड लढा पेटला. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या संदर्भामध्ये त्यावेळी संपूर्ण मराठवाडा घुसळून निघाला. त्या लढ्यामध्ये मी सुध्दा तुरुंगात गेलो होतो. त्यावेळच्या तडजोडीमध्ये श्री. गोविंदभाई श्रॉफ आणि सर्व मंडळींची मुख्यमंत्री श्री. शरद पवार साहेब यांच्याबरोबर बैठक झाली त्यावेळी मराठवाडा विद्यापीठाची स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ आणि दुसरे मराठवाडा विद्यापीठ अशी दोन विद्यापीठे करण्याचे ठरले. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करताना आदरणीय शिवसेनाप्रमुखांनी नामांतराबाबत सुचविलेला तोडगा स्वीकारुन मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. दिवाकर रावते ....

मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर करण्यात आले. त्याच वेळेला श्री. गोविंदभाई श्रॉफ यांचा कडवट विरोध पाहून वैधानिक विकास मंडळ स्वीकारण्यात आले आणि वैधानिक विकास मंडळाची घोषणा आणि ते स्वीकारण्याची घोषणा 1994 साली झाली. ती घोषणा झाल्यानंतर वैधानिक विकास मंडळाची निर्मिती झाली. नंतरच्या काळात 1995 साली शिवशाही सरकार आल्यानंतर मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली.

मला अभिमान वाटतो की, दांडेकर समितीच्या अनुशेषाच्या अहवालानंतर त्यांची सूत्रे बरोबर नव्हती, त्या अनुशेषामध्ये योग्य पध्दतीने दखल घेतली गेली नाही अशा ज्यावेळी तक्रारी आल्या तेव्हा जी अनुशेष कमिटी नेमण्यात आली त्याचेही नेतृत्व मी केले आणि तो अहवाल विधिमंडळाला सादर झाला. अनुशेषाच्या संदर्भामध्ये घटनेच्या अनुच्छेद 371(2) नुसार माननीय राज्यपाल तरतूद करीत राहिले परंतु त्याचे बंधन आहे की, नाही हे काही न जुमानता आमची सत्ता गेल्यानंतर आलेल्या सत्ताधाऱ्यांकडून निधी दिला जात होता परंतु तो निधी दुसरीकडे वळविला जात असे. त्या संदर्भात या विधिमंडळात फार मोठे युध्द प्रा. बी.टी.देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आपण पाहिलेले आहे. ते प्रकरण इथपर्यंत गेले की, हा हक्क प्रस्थापित करण्याकरिता प्रा.बी.टी.देशमुख, श्री. नितीन गडकरी साहेब आणि मी असे मिळून आम्ही शेवटी न्यायालयात गेलो. मला आठवते की, त्यावेळी श्री. जयंत पाटील अर्थमंत्री होते त्यावेळी ही मोठी लढाई झाली.

त्यांनी याला छेद दिल्यानंतर त्यावेळचे विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांच्या आग्रहावरुन ॲडव्होकट जनरल यांना या सदनामध्ये वेगवेगळ्या कारणाकरिता तीन वेळा बोलविले. त्यामध्ये या कारणाकरिताही त्यांना बोलविले होते. त्यावेळी श्री. सावंत हे ॲडव्होकट जनरल होते. त्यांची साक्ष या ठिकाणी नोंदली गेली आहे. त्यानंतर ॲलोकेशन बदलता येणार नाही असे ठरले. त्यानंतर परत मराठवाड्यातील तरतूद विदर्भात, पश्चिम विदर्भातील तरतूद पूर्व विदर्भात अशा पध्दतीने घडू लागले त्यानंतर माननीय राज्यपालांनी आदेश काढले की, विभागीय स्तरावर दिलेले पैसे सुध्दा तुम्हाला बदलता येणार नाहीत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

एवढा अनुशेष भरुन काढण्यासाठी घटनेनुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर राज्यपालांनी केला. तत्कालीन राज्यपाल डॉ.पी.सी.ॲलेक्झांडर यांनी त्यामध्ये खूप लक्ष घातले होते. युतीच्या काळामध्ये दुष्काळ पडला होता त्यावेळी डॉ.ॲलेक्झांडर हे स्वत: मराठवाड्यात 8 दिवस ठाण मांडून बसले होते, संपूर्ण मराठवाड्यात फिरताना त्यांनी मला सोब

सभापती महोदय, काल परवा सुध्दा दुष्काळाची चर्चा झालेली आहे. पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ पडलेला असताना त्या भागासाठी तरतूद करुनही निधी मिळत नाही असे सांगून राजकीय वादळ निर्माण झाले होते. आताच्या राज्यपालांबाबत मला कौतुकाने सांगावे लागेल. माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांची भेट घेतल्यानंतर दुष्काळग्रस्त भागात कोणताही निधी वळविण्याबद्दल संविधानातील ही तरतूद आडवी येणार नाही अशा प्रकारची भूमिका राज्यपालांनी घेतलेली आहे. घटनात्मक तरतुदीनुसार उपलब्ध झालेला निधी दुसरीकडे वळविता येत नाही असे बंधन असताना आणि विदर्भ व मराठवाड्यासाठी एक आशेचा किरण दिसलेला असताना, विदर्भ व मराठवाड्यातील सिंचनाबाबत चर्चा झाली होती. सिंचनामध्ये झालेला भ्रष्टाचार योग्य की अयोग्य हे नंतर सिध्द होईल. परंतु त्या भ्रष्टाचारामध्ये सर्वच्या सर्व सिंचन प्रकल्प मराठवाडा व विदर्भातील निघाले हे आमचे दुर्दैव आहे.

या भागात प्रकल्प आले, पैसे मिळाले, आम्हाला थोडासा न्याय मिळाला आहे असे वाटत असताना त्या प्रकल्पांची जी काही वाताहत लागलेली आहे त्याचा उल्लेख शासनाच्या श्वेत पत्रिकेत केलेला आहे. त्यावर चर्चा झालेली नाही अन्यथा ते मांडता आले असते. मागास भागाचा विकास 100 टक्के व्हावा यासाठी वैधानिक विकास मंडळाची घोषणा झाली. त्याला 10 वर्षे झाल्यानंतर ती स्थापन झाली. गोविंदभाई श्रॉफ यांच्या प्रखर लढ्यामुळे व आग्रहामुळे निर्माण झाली. माननीय श्री.शरद पवार यांनी त्यांचा मान ठेवल्यामुळे ही तीन वैधानिक विकास मंडळे निर्माण झाली. त्याबद्दल माननीय श्री.शरद पवार साहेबांबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो. आम्हाला न्याय मिळण्याची वेळ आल्यानंतर या सदनात आणखी एक इतिहास घडला. त्यावेळी सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व माजी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख हे होते. मूळ मुद्दा असा आहे की, विदर्भात अमरावती हा सर्वात अनुशेषग्रस्त जिल्हा आहे. त्या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.दिवाकर रावते....

जिल्ह्यातील प्रा.बी.टी.देशमुख होते. विदर्भात 42 वीज निर्मितीचे प्रकल्प आहेत, तेवढेच कोकणातही आहेत. कोकणात तर पर्यावरणाची वाट लागणारच आहे. 42 प्रकल्पांपैकी 5 प्रकल्प अमरावतीमध्ये घेतले. अनुशेषासंबंधी राज्यात क्र.1 वर असलेला अमरावती जिल्हा आहे. त्या जिल्ह्यातील वीज प्रकल्पांसंबंधी सरकारबरोबर दोन दिवस युध्द झाले. त्यावेळी श्री.अशोक चव्हाण हे मुख्यमंत्री होते. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हेही होते. त्याबाबत 4 बैठका झाल्या होत्या. त्यावेळी 5 प्रकल्पांपैकी मी 4 प्रकल्प रद्द करीत आहे व एक प्रकल्पाबाबतचा निर्णय नंतर जाहीर करीन असे म्हणाले होते. त्यानंतर ते अधिवेशन संपले होते. नंतर पुढील अधिवेशन आल्यावर इंडिया बुल्सचा तो प्रकल्प असल्याचे कळले.

इंडिया बुल्सचा प्रकल्प रद्द न करण्याची कारणे मला येथे मांडावयाची नाहीत, तशी माझी इच्छा नाही. कारण त्याबाबत आक्षेप किंवा आरोप करण्यासाठी मी येथे उभा नाही. परंतु इंडिया बुल्स या कंपनीने तेथे जे निर्माण केले ते गंभीर होते. त्यानंतर पाण्याचे वाटप झाले. 2005 साली पाणी वाटपासंबंधी या सदनात एक विधेयक आले होते. इंडिया बुल्स कंपनीसंबंधी माननीय उप सभापतींच्या दालनात बैठका झाल्या होत्या.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यावेळी श्री. अजितदादा पवार म्हणाले की, पाणी कोठून देता येईल ? त्यावर हा तोडगा सांगण्यात आला की, सिंचनाचे पाणी वाचवायचे असेल तर ज्याप्रमाणे एका प्रकल्पाला नागपूर महानगरपालिकेचे रिसायकल केलेले पाणी देण्यात येते आणि त्याबदल्यात ती कंपनी 10 कोटी रुपये महानगरपालिकेला देते त्याप्रमाणे अमरावतील जे 62 टीएमसी पाणी मिळते त्यातील 40 टीएमसी पाणी रिसायकल करुन त्यांना वापरता येईल आणि अमरावती महानगरपालिकेला पैसेही मिळतील अशा प्रकारच्या अनेक तोडग्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या मार्फत चर्चा झाली. इंडिया बुल्स प्रकल्पाला सिंचनाचे पाणी देऊ नये असा तो विषय होता. नंतर त्याबाबतीत न्यायालयीन लढाई झाली. ती लढाई झाल्यानंतर अनेक गोष्टी घडत गेल्या.

महाराष्ट्रामध्ये सिंचनाच्या बाबतीत निच्चतम असलेल्या जिल्हयाला महाराष्ट्र शासनाकडून न्याय दिला जाईल अशी अपेक्षा होती. परंतु शासनाने इंडिया बुल्सची बाजू घेतली. इंडिया बुल्सची बाजू घेतल्यानंतर मला अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते की घटनेच्या अनुच्छेद 371(2) नुसार माननीय राज्यपालांना प्राप्त झालेल्या घटनात्मक अधिकारानुसार त्यांनी अनुशेषाच्या बाबतीत शासनाला निदेश दिले. माजी सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विदर्भ आणि मराठवाड्यातील सर्वपक्षीय सदस्यांची समिती काम करीत होती. अनुशेषग्रस्त भागाला न्याय मिळाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. मराठवाड्याला ते सुखासुखी मिळालेले नाही. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे विभागीय निधी देखील वळवायचा नाही असे ठरले. या ठिकाणी मी माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश वाचून दाखवून सभागृहाचा वेळ घेणार नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे मत मांडत असताना "माननीय राज्यपालांना अधिकार नाही" अशा प्रकारचे वृत्त कोणत्या तरी प्रकरणावरुन निदर्शनास येते त्यावेळी त्यांच्या माध्यमातून या ठिकाणी आलेली सरकारची भूमिका स्वीकारायची की नाही असा प्रश्न निर्माण झालेला आहे. ही बाब घटनात्मक आणि अतिशय गंभीर आहे. इंडिया बुल्स प्रकरणामध्ये राज्य शासनाच्यावतीने जी बाजू मांडण्यात आली ती दुर्दैवी, घटनाविरोधी, या सदनाचा, माननीय राज्यपाल महोदयांचा आणि घटनेचा अवमान करणारी आहे असे माझे मत मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

मी या ठिकाणी हायकोर्टातील रिटपिटीशन वाचून दाखवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

"IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION

WRIT PETITION NO. 757 OF 2011

Society for Backlog Removal and
Development Amravati (Help Line) and others ...Petitioners

Versus

State of Maharashtra and others ...Respondents"

हे प्रतिज्ञापत्र सरकारच्या वतीने सादर करण्यात आले आहे हे खेदजनक आहे. यामध्ये पुढे असे नमूद केले आहे की,

"1. It is the equitable allocation of funds for development expenditure alone that falls within Article 371(2)(b). The special responsibility of the Governor is restricted to the matter of allocation of funds for development expenditure to intervene where there are regional imbalances in the proposed allocation of funds.

2. Any other interpretation with mean that in effect that powers of development or of governance are sought to be vested in the Governor-belied by the plain language of Article 371 (2). Such an interpretation will have the consequence of rendering Article 371(2) unconstitutional as in violation of the basic structure of the Constitution.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3. The detailed exercise undertaken by the Governor is to determine what this equitable allocation of funds should be. Consequently it becomes necessary for the Governor to exercise and analyze data concerning physical backlogs, efficiency of implementation of the previous years spending, needs of each region, competing needs for expenditure other than for water resources etc."

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते.....

या प्रतिज्ञापत्रातील क्रमांक 4 मध्ये जे म्हटले आहे ते मी आपल्याला वाचून दाखवितो.

"4. Any reference to targets, deadlines or objectives of the physical work or elimination of physical backlog even if couched as directives by the Governor or any aspect of governance is given the highest respect by the State Government and will be adhered to if possible," म्हणजे त्यांनी दिलेल्या डायरेक्टीव्हचा आदर सरकारने करावा आणि जमत असेल तर अंमलात आणावे.

यापुढे जे नमूद करण्यात आले आहे ते वाक्य जखमेवर मीठ चोळणारे असून सभागृहाचा अवमान करणारे आहे. ते वाक्य मी आपल्याला वाचून दाखवितो. "...but is not a binding directive or decision under Article 371 (2)." इतके गंभीर वाक्य आहे. याच्यापुढे 10 क्लॉज नमूद केलेले आहेत, ते सगळे क्लॉज निगेटिव्ह आहेत. हे शासन सोफियाला पाणी द्यावयास निघाले आहे. 2005 मध्ये पाण्याच्या संदर्भातील कायदा करण्याच्या अनुषंगाने आपल्या बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये मी तो कायदा अडवून धरला होता. त्यावेळी मी खूप हट्ट केला होता. मी तुमचा आभारी आहे की, एकटा सदस्य का होईना, त्याचे समाधान होईपर्यंत आपण ती बाब कधीही प्रोसेस होऊ दिली नाही. एक सदस्य बोलतो आहे, या संदर्भात काय होणार आहे. ते मायनॉरिटीमध्ये आहेत. सभागृहात बहुमत आहे, बहुमताने कायदा पास करा असे आपण कधीही केले नाही. सभागृहात उपस्थित झालेल्या शंकांचे निराकरण केल्याशिवाय कोणताही कायदा पास होऊ दिला नाही. आपल्या कारकिर्दीमध्ये अशा चांगल्या गोष्टी घडता आहेत त्या बद्दल तुमचा मला अभिमान वाटतो. त्यावेळी आपल्या दालनात पाच वेळा बैठका झाल्या. त्यावेळी माननीय श्री.अजित पवार हे उप मुख्यमंत्री नव्हते. शेतकऱ्यांचे पाणी विकून कारखान्यांना दिले आणि आता कशासाठी विधेयक आणता आहात असे मी त्यावेळी बोललो. त्यावेळी आपल्या दानलात माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, माननीय श्री.गडकरी साहेब, असे सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित होतो.

महोदय,मी त्या ठिकाणी सर्वांनाच विनंती केली होती. त्यावेळी माननीय श्री.अजित पवार जे बोलले ते शब्द मला आठवतात. ते शब्द असे आहेत की, श्री. रावतेजी हा निर्णय माननीय मुख्यमंत्री महोदय घेत आहेत. आता तुम्ही विधेयक अडवू नका. ते विधेयक मंजूर करण्यासाठी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मदत करा. माननीय मुख्यमंत्री महोदय, त्यावेळी आपण दालनात सांगितले की, गेल्या 60 वर्षात पाणी देण्याच्या बाबतीत जी प्रायारिटी ठरविली होती, ती आज पासून आम्ही बदलतो आहोत. आपण पाण्याच्या प्रायारिटी संदर्भात निर्णय घेतला, त्यावेळीही मी तुमचे अभिनंदन केले होते. पहिले पाणी पिण्यासाठी, दुसरे पाणी शेतीसाठी आणि तिसरे पाणी उद्योगधंद्यांसाठी असा प्राधान्यक्रम ठरविण्यात आला. हे विधेयक अडविल्यानंतरची माहिती मी या ठिकाणी देतो आहे. ते विधेयक सभागृहात आले, त्यावर चर्चा करण्यात येऊन ते विधेयक मंजूर करण्यात आले.

सभापती महोदय, मी एवढयासाठी सांगतो आहे की, आमचे गेलेले पाणी कसे थांबविता येईल. सर्वात जास्त पाण्याचा अनुशेष असलेल्या अमरावती जिल्हा आहे. आमच्यावर बंधनच नाही अशा प्रकारचे सरकारच्या वतीने लिहून देण्यामुळे आमच्या समोर प्रश्न निर्माण झालेला आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी या सरकारला अनुशेषाच्या बाबतीत दिलेले निदेश सभागृहाच्या पटलावर ठेवले गेले, त्या निदेशाचे सभागृहात वाचन झाले. पूर्वी राज्याचा अर्थसंकल्प सादर होतो, त्यावेळी ढोबळ यावयाचे. आम्ही आग्रह धरल्यानंतर आता प्रत्येक प्रकल्पाप्रमाणे ॲलोकशन्स येतात. ते माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे येतात. माननीय राज्यपालांचे निदेश शासनावर बंधनकारक नसतील तर आता ते होणार नाही. कोणी जुमानणार नाही. खरे तर हा घटनेचा भंग आहे. सरकारने स्वीकारलेल्या जबाबदारीचा हा अवमान आहे. या संदर्भात हक्कभंग येऊ शकतो. चर्चा केल्याशिवाय हक्कभंग कशासाठी टाकावयाचा म्हणून मी थांबलो. आज माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा होणार असेल तर अभिभाषण सन्मानित होणार नाही. कारण माननीय राज्यपालांचे घटनादत्त कर्तव्य सरकार मानावयास तयार नाहीत. आम्ही का मानावयाचे हा महत्वाचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे 12 पाने असून प्रत्येक क्लॉज त्यामध्ये आहे. ते वाचून मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. सरकारच्या वतीने ॲडव्होकट जनरल यांनी जे केलेले आहे, ते सरकारला मान्य आहे काय ?

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीरत प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री.दिवाकर रावते.....

राज्यपालांची परवानगी घेतली आहे का? त्यात एक वाक्य असे नमूद केले आहे की, "but is not a binding directive or decision under Article 371 (2)" त्यावेळी माननीय राज्यपालांचे मत घेतले का, त्यांनी याकरिता मान्यता दिली आहे का? घटनेनुसार हा माननीय राष्ट्रपतींचा अवमान आहे. घटनेच्या आर्टिकल 371(2) नुसार माननीय राष्ट्रपतींच्या वतीने माननीय राज्यपाल हे काम पाहतात. एका अर्थाने हा माननीय राष्ट्रपतींचा अवमान आहे. हे शासनाला मान्य आहे का? सरकार ज्यावेळी म्हणते की, आम्हाला हे बंधनकारक नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. या संदर्भात आम्हाला माननीय राज्यपालांचे म्हणणे समजून घ्यायचे आहे. आम्हाला ॲडव्होकेट जनरल यांचे म्हणणे समजून घेणे हा कायदेशीर विषय आहे. मी एवढीच विनंती करतो की, या संदर्भात आपण योग्य तो निर्णय द्यावा. ही घटनात्मक बाब असल्यामुळे आणि हे सदन घटनेनुसार चालत असल्यामुळे या विषयाबाबत खूप चर्चा व्हावी अशी इच्छा नाही.

सभापती महोदय, ॲफिडेव्हीटमधील एका वाक्याने आमच्या जखमेवर मीठ चोळले गेले आहे. यापुढे महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा या मागास भागांना वैधानिक विकास मंडळांच्या माध्यमातून न्याय मिळेल हे विसरुन जा. यापुढे आहे त्यापेक्षा जास्त अनुशेष निर्माण होणार आहे. विदर्भात आज 17 हजार कोटी रुपयांचा अनुशेष आहे. अशी परिस्थिती असताना ही भूमिका शासनाकडून स्वीकारली गेली तर प्रचंड गंभीर परिस्थिती निर्माण होईल. माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांच्यावर पुन्हा एकदा विदर्भाला न्याय मिळत नाही म्हणून उठून बोलण्याची वेळ येईल. आपण स्वत: हे सगळे निमंत्रित करीत आहोत का अशी स्थिती निर्माण झाली आहे. राज्यपाल महोदयांची अभिभाषणाला मान्यता नसल्यामुळे हा घटनादत्त पेच निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, मी विनंती करतो की, घटनात्मक बाबीवर खुलासा होत नाही तोपर्यंत आपण चर्चा कशी करायची हा प्रश्न आहे. ही माझा घटनात्मक हरकतीचा मुद्दा आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश हे भाग मागासलेले आहेत. उर्वरित महाराष्ट्रामध्ये एका बाजूला अर्धा ठाणे जिल्हा समृध्द आणि दुसऱ्या बाजूला अर्धा ठाणे जिल्हा अत्यंत मागासलेला आहे. त्या भागाला न्याय देणार का? त्या अविकसित भागाला न्याय देणार नसाल तर महाराष्ट्रात गंभीर प्रसंग निर्माण होईल. हा विरोधी पक्षाचा विषय नाही. त्या भागातील तरुण आमदार या प्रश्नावर भांडत होते. मी आपल्याकडून या प्रश्नाबाबत न्यायाची अपेक्षा करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अतिशय सविस्तरपणे या विषयावर आपले म्हणणे मांडले आहे. त्यामुळे सभागृहासमोर या विषयाचे गांभीर्य स्पष्ट झाले आहे. आम्ही ज्यावेळी माननीय राज्यपालांचे अभिभाषण ऐकतो त्यावेळी प्रत्येक परिच्छेदाची सुरुवात माझे शासन अमुक करेल, माझे सरकार अमुक गोष्टी करेल अशा शब्दांनी केली जाते. असे असताना राज्य सरकारच्या वतीने ॲडव्होकेट जनरल न्यायालयात ॲफिडेव्हीट दाखल करतात त्यात असे नमूद केले आहे की, "...but is not binding directive or decision under Article 371 (2)." हे लिहिणे विचारपूर्वक आहे की ही हिंमत दाखविलेली आहे? एखाद्या प्रकल्पाला मदत करण्यासाठी अशा पध्दतीने मिस-डायरेक्शन होते का असे अनेक प्रश्न स्वाभाविकपणे सन्माननीय सदस्यांच्या मनात, मागास भागातील जनतेच्या मनात निर्माण झाले असतील.

एखादा विशिष्ट उद्योग समूह डोळ्यासमोर ठेवून शासनाच्या वतीने ॲफिडेव्हीट न्यायालयात दाखल केले असेल तर माननीय राज्यपालांचे जे काही म्हणणे असेल ते आम्हाला कळले पाहिजे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु होण्यापूर्वी या विषयाची स्पष्टता झाली पाहिजे. तरच यापुढे चर्चा करण्यास अर्थ राहील. कारण या विषयावर आजच खालच्या सभागृहात चर्चा होऊन त्या सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित झालेले आहे. सरकारचे हेच मत आहे का, याबाबत आम्हाला स्पष्टता कळली पाहिजे. ॲडव्होकेट जनरल यांनी कोणत्या पार्श्वभूमीवर ॲफिडेव्हीट सादर केले आहे? सरकारची बाजू न्यायालयापुढे मांडण्याचे ॲडव्होकेट जनरल काम करतात.

नंतर V V. 1....

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

सरकारचेही हेच मत आहे काय, ॲडव्होकेट जनरलने हा निर्णय कोणत्या पार्श्वभूमीवर दिलेला आहे. ॲडव्होकेट जनरल न्यायालयात सरकारची बाजू मांडत असतात. ॲडव्होकेट जनरलकडे सरकारकडून यासंदर्भात काय म्हणणे आले आहे व त्यावर त्यांनी काय म्हटले आहे यासंदर्भातील स्पष्टता आम्हाला मिळाली तरच या विषयावर पुढे चर्चा करण्यात काही अर्थ राहील.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विषयाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. या विषयाच्या संदर्भातील चर्चा आज विधानसभेत होऊ शकली नाही व विधान सभागृह दिवसभरासाठी स्थगित झाले. आपण आता जी प्रत वाचून दाखवली ती प्रत माझ्याकडे सुध्दा आहे. या प्रतीमध्ये जे रेफरन्सेस दिलेले आहेत त्यावर कोणाचीही सही दिसत नाही. मला असे वाटते की, या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे त्यासंदर्भात सविस्तर माहिती घेणे आवश्यक असून ही माहिती घेण्यासाठी आपल्याला ॲडव्होकेट जनरल, लॉ सेक्रेटरींशीही चर्चा करावी लागेल. माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. उद्या या विषयाच्या संदर्भात आपण सकाळी बैठक बोलावली तर नेमकी वस्तुस्थिती काय आहे, ॲफेडव्हीट काय दिलेले आहे,ए.जी. यांनी यासंदर्भात कोणती भूमिका मांडली हे स्पष्ट होईल. माननीय राज्यपाल महोदयांच्या अनुच्छेद 371(2) मध्ये जी भूमिका आहे त्यासंदर्भात नेमके काय म्हटले आहे याचा खुलासा होणे गरजेचे आहे. यामध्ये संभ्रमाचे वातावरण राहणे योग्य नाही असे मला वाटते. राज्य सरकारच्या वतीने कोणत्याही अविकसित भागावर अन्याय होणार नाही याबाबतची सातत्याने भूमिका माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण स्वत: बैठक घेण्याची वेळ ठरवून द्यावी अशी विनंती आहे. सदर बैठक घेत असतांना एकत्रितपणे आपल्या उपस्थित बैठक पार पडली तर अधिक चांगले स्पष्टीकरण होऊ शकेल त्यामुळे यांसदर्भात आपण रुलींग द्यावे व नंतर माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाला सुरुवात करावी अशी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय,यामध्ये दोन विषय आहेत. या विषयाच्या संदर्भात आपल्या दालनात माननीय विधानसभा अध्यक्ष तसेच माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बोलावून चर्चा करावी हा एक विषय झाला. परंतु या सदनात आपण गेल्या 15 वर्षापासून चर्चा केल्यानंतर या मताशी आलो आहोत की,आर्टीकल 371(2) नुसार माननीय राज्यपाल महोदयांनी जे निदेश दिलेले आहेत ते सरकारवर बंधनकारक आहेत की, नाही याबाबत आम्हाला चर्चा करावयाची नाही तर माननीय राज्यपाल महोदयांचे निदेश बंधनकारक आहेत का यासंदर्भात भाष्य करावे. माननीय राज्यपाल महोदयाचे निदेश पाळणे सरकारवर बंधनकारक असतांना असे का झाले त्यासंदर्भात आपल्या दालनात बैठक होणार आहे. यामध्ये माननीय राज्यपालांचा अवमान,सभागृहाचा अवमान, सरकारचा अवमान झालेला आहे. त्यामुळे आर्टीकल 371 (2) प्रमाणे राज्यपालांच्या निदेशानुसार हे सरकार काम करीत आहे व पुढेही काम करीत राहणार याची माहिती राज्यातील जनतेपर्यंत जाण्याची आवश्यकता आहे. अर्थसंकल्प सुध्दा माननीय राज्यपालांकडे जात असतो. माननीय राज्यपाल महोदयांनी अर्थसंकल्पाला मान्यता दिल्याशिवाय आपल्याला अर्थसंकल्प मांडता येत नाही अशी आता परिस्थिती आहे. न्यायालयात आपण जे काही केले ते योग्य की, अयोग्य याकरिता उद्याची बैठक आपण बोलावत असेल तर ते योग्य होईल परंतु मुळातच सरकारच्या वतीने यासंदर्भातील भाष्य येणे आवश्यक आहे. या ठिकाणी नाईलाजाने न्यायालयातील दस्तऐवज आपल्या पुढे दिलेले आहेत.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय,मला असे वाटते की, यासंदर्भातील वस्तुस्थिती पाहणे अत्यंत आवश्यक आहे. उद्या या विषयाची बैठक किती वाजता घेणार आहोत यासंदर्भातील आपण निर्देश द्यावेत अशी विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय,वस्तुस्थिती तपासून पहावी यासंदर्भात सन्माननीय संसदीय कार्यमंत्री माहिती देत आहेत. परंतु आपण कशाची वस्तुस्थिती तपासून पाहतो आहोत ? आर्टीकल 371(2) नुसार राष्ट्रपतींनी व घटनेने माननीय राज्यपालांना जे निर्देश दिलेले आहेत ते निर्देश सरकारने पाळणे बंधनकारक आहे किंवा नाही याबाबतीतील खुलासा या ठिकाणी होण्यास काही हरकत नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

ॲफिडेव्हीट चुकीचे आहे किंवा नाही याची चर्चा आपल्याला उद्या करता येऊ शकेल. घटनेच्या अनुच्छेद 371 (2) मधील तरतुदी नुसार माननीय राज्यपालांना अधिकार आहे. माननीय राज्यपालांच्या निदेशा संबंधी शासनाची काय भूमिका आहे हे येथे स्पष्ट झाले पाहिजे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्याला संसदीय कामकाज मंत्री यांनी उत्तर देखील दिलेले आहे. येथे राज्याचे प्रमुख बसलेले आहेत. सभागृहाचा नेता या नात्याने मी राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, 371 (2) प्रमाणे माननीय राज्यपालांना घटनेने, कायद्याने, दोन्ही सभागृहाने ठराव करून लोकसभेने जो काही अधिकार दिलेला आहे तो त्यांचाच आहे. त्यांच्या अधिकारा प्रमाणेच राज्य सरकार कामकाज करते. त्यांच्या निदेशा प्रमाणेच उद्याचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. माननीय राज्यपालांनी अनुशेषासंबंधी धोरण ठरवून दिलेले आहे. 100 रूपयाचे वाटप करीत असताना मराठवाड्याला किती, विदर्भाला किती निधी द्यायचा हे त्यांनी ठरवून दिलेले आहे. वंचित भागाला इतरांबरोबर आणण्यासाठी राज्य शासनाची पहिल्या पासून भूमिका आहे. हे राज्य सरकार जेव्हा तिसऱ्यांदा सत्तेवर आले त्यावेळी त्याची मुदत संपली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या कॅबिनेटने देखील पुढील पाच वर्षासाठी तो कालावधी वाढवला आहे हे ही सभागृहाला ज्ञात आहे. त्यामुळे शक्यतो माननीय राज्यपालांनी घालून दिलेल्या निदेशा प्रमाणेच सरकार काम करीत राहणार आहे.

सभापती : संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) मधील तरतुदी नुसार माननीय राज्यपालांना विदर्भ, मराठवाड्याच्या विकासासाठी विशेष अधिकार दिलेले आहेत. ते सर्व अधिकार माननीय राज्यपाल महोदयांना आहेत व ते तसेच राहतील असे आता माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आता स्पष्ट केले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि माननीय विरोधी पक्ष नेते यांनी ॲडव्होकेट जनरल यांनी जे ॲफिडेव्हीट केले आहे त्यासंबंधी आपली भावना येथे मांडली आहे. त्यांनी माननीय राज्यपालांच्या अधिकारावर काही बंधन येईल काय, अशा प्रकारचा एक मुद्दा येथे प्रकर्षाने मांडला

... 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती....

आहे. त्याबाबत माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी येथे एक सूचना केली आहे की, उद्या सकाळी माझ्या दालनात सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय उप मुख्यमंत्री, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, विधान सभेचे माननीय अध्यक्ष, तेथील सन्माननीय विरोधी पक्ष नेते, संसदीय कामकाज मंत्री, गट नेते यांची एकत्रित बैठक मी माझ्या दालनात घ्यावी. त्याप्रमाणे मी माझ्या दालनात बैठक बोलावित आहे. या बैठकीसाठी माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी सर्वांना निमंत्रित करावे. आता आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चेला सुरूवात करू या.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल शासनाला न विचारता ॲफिडेव्हीट करू शकते काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण यासंबंधातील निर्णय दिलेला आहे. माननीय सदस्य देखील एका पक्षाचे गट नेते आहेत. त्यांना आम्ही उद्या बैठकीला बोलावू तेव्हा त्यांची भूमिका त्यांनी तेथे मांडावी.

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, सभापती म्हणून मी निर्णय दिलेला आहे. या संदर्भात उद्या गट नेत्यांची बैठक होणार आहे. त्या बैठकीला आपण उपस्थित राहून तेथे आपल्या ज्या काही शंका असतील त्या आपण मांडाव्यात.

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यापालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

सभापती : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी मांडला असून सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी अनुमोदन दिले आहे. सदरहू प्रस्ताव प्रस्तुत झालेला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आज, गुरुवार, दिनांक 14 मार्च व शुक्रवार, दिनांक 15 मार्च, 2013 अशी एकूण दोन दिवस होणार असून या दोन दिवसांचे सभागृहातील कामकाज लक्षात घेता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस सर्वसाधारणपणे एकूण 8 तासांचा कालावधी उपलब्ध आहे व त्यातील मुख्यमंत्र्यांच्या उत्तरासाठीचा एक तासाचा कालावधी गृहीत धरल्यास उर्वरित 7 तास चर्चेसाठी उपलब्ध होतील. त्यातील प्रस्तावकांना 15 मिनिटे देण्यात येतील व प्रस्तावाला पाठिंबा देणारे अनुमोदक 10 मिनिटे भाषण करतील. तसेच सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणासाठी 20 ते 30 मिनिटे देण्यात येतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे आपल्या पक्षाच्या प्रतादामार्फत माझ्याकडे 10 मिनिटांत पाठवावीत. नावे प्राप्त झाल्यानंतर वेळेचे बंधन घालावे काय याचा विचार करता येईल.

या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सन्माननीय सदस्यांकडून काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. सुधारणांची एकत्रित यादी सन्माननीय सदस्यांना मिळाली आहे असे मी समजतो. तसेच सन्माननीय सदस्यांना सुधारणा मांडावयाच्या नाहीत असेही मी समजतो.

आता प्रस्ताव मांडणारे सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण हे भाषणास सुरुवात करतील. त्यानंतर प्रस्तावाला अनुमोदन देणारे सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले भाषण करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त): सभापती महोदय, अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी म्हणजे दिनांक 11 मार्च 2013 रोजी दोन्ही सभागृहाच्या मध्यवर्ती सभागृहात संयुक्त बैठकीपुढे महाराष्ट्राचे राज्यपाल माननीय के.शंकरनारायणन् यांचे अभिभाषण झाले. त्यांचे अभिनंदन करणारा ठराव मी या ठिकाणी मांडलेला आहे. या ठरावाच्या संदर्भात बोलण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महाराष्ट्र निर्मितीचे शिल्पकार स्व.यशवंतराव चव्हाण, हरित क्रांतिचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांच्या स्मृतीला वंदन करुन मी माझ्या भाषणाला सुरुवात करीत आहे.

सभापती महोदय, आपण स्वत:, माननीय मुख्यमंत्री आणि या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री यांनी मला येथे बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांचा शतश: आभारी आहे.

सभापती महोदय, आपण नुकताच विधिमंडळाचा अमृत महोत्सव साजरा केला. गेल्या 75 वर्षाचा इतिहास पाहता 1935 च्या कायद्यान्वये 20 जुलै 1937 रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेचे पहिले अधिवेशन पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्ये झाले होते. त्यानंतर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रक्रिया 11 वर्षांनी म्हणजे 1948 च्या सुमारास सुरु झाली हे दिसून येते. अगदी सुरुवातीच्या अभिभाषणावर होणाऱ्या चर्चेचे स्वरुप आणि आजच्या चर्चेचे स्वरुप याची तुलना आपल्यापुढे यावी याचा मागोवा मी स्वत: घेत आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

महोदय, 1948 मध्ये अभिभाषण झाले. परंतु 1950 मध्ये स्व्.मोरारजी देसाई मुख्यमंत्री असताना दि.21 फेब्रुवारी, 1950 रोजी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर पहिल्यांदा चर्चा झाली. त्यावेळी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा पहिला ठराव विधानपरिषदेत विधानपरिषद सदस्य जी.एम.तांबे यांनी मांडला होता. त्यानंतर आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या कारकिर्दीतील पहिले भाषण दि.27 नोव्हेंबर, 1956 रोजी झाले. त्यावेळी आभार प्रदर्शनाच्या उत्तराचा ठराव सातारा स्थानिक स्वराज्य मतदारसंघातून निर्वाचित झालेले आर.एन.भावे यांनी मांडला. या दोन भाषणांचा उल्लेख मी एवढ्यासाठीच केला की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या आभार प्रदर्शनावरील सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील प्रत्येक शब्दामध्ये देश प्रेम असल्याचे दिसून येते. त्या सदस्यांची सर्व भाषणे मी वाचलेली आहेत.

महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपला देश कसा मोठा होईल, आपला प्रांत कसा मोठा होईल ही त्यांच्यामध्ये भावना होती. राज्याचा सर्वांगीण विकास कसा होईल, स्वातंत्र्याचे फायदे सर्वसामान्य माणसापर्यंत कसे पोहोचेतील या विचाराने ते प्रेरित झाले. त्यानंतर हळूहळू प्रथेमध्ये बदल होत चाललेला आहे. अशा प्रकारचा बदल लोकशाहीमध्ये स्वाभाविक आहे. विधिमंडळाला 75 वर्षे झाल्यानंतरचे हे पहिले अधिवेशन आहे. तसेच या अधिवेशनात मला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडण्याची संधी मिळाली ही बाब मी माझ्यासाठी भाग्याची समजतो.

महोदय, मी राज्यपाल नियुक्त आमदार आहे. विधानपरिषदेमध्ये राज्यपाल नियुक्त एकूण 12 आमदार आहेत. राज्यपाल महोदयांनी नियुक्त केलेल्या माझ्यासारख्या आमदाराला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा ठराव मांडण्याची संधी मिळाली हा एक योगायोग आहे. राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे सरकारचे प्रतिबिंब असते. राज्य शासनाच्या कामाला दिशा देणारा, त्यांच्या कामकाजाचा संपूर्ण आलेख, सरकारच्या सर्व प्रश्नांचा समतोल, धोरण, नियोजन या सर्वांचा तो त्रिवेणी संगम असतो.

महोदय, ग्रामीण भागातून शहरी भागापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रात विखुरलेल्या महाराष्ट्राला देशात अग्रगण्य स्थान मिळविण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी या राज्यात हाती घेतलेले धोरण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

म्हणजेच राज्यपालांचे अभिभाषण असते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, आदिवासी, विशेष मागासवर्गीय, तसेच त्या अंतर्गत येणाऱ्या असंख्य जाती व उपजाती, गट व उपगट, ज्यांना शासनाच्या कोणत्याही योजनांच्या सवलतीचा फायदा झाला नाही अशा समाजातील दुर्बल घटक या सर्वांसाठी देशाच्या व राज्याच्या पातळीवर जनसामान्यांच्या सर्व योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याबाबतचा संपूर्ण आलेख म्हणजेच राज्यपालांचे अभिभाषण होय. धनिकांच्या चेहऱ्याकडे न बघता पिढ्यानपिढ्या समाजाच्या मुख्य प्रवाहात ज्यांना घेता आले नाही अशा जनमानसाच्या पायाकडे बघून सरकार करीत असलेला राज्यकारभार हा राज्यपालांच्या अभिभाषणातून स्पष्ट होतो.

महोदय, सिंचन, आरोग्य, संरक्षण, क्रीडा, गृहनिर्माण सांस्कृतिक, मराठी बाणा हाच विचार शासनाच्या धोरणात आहे. हाच राज्यपालांच्या अभिभाषणाचा ठसा आहे. त्यांचे अभिभाषण हे राज्याला दिशा देणारे आहे. माननीय राज्यपालांनी मध्यवर्ती सभागृहात अभिभाषणाची सुरुवात मराठी भाषेतून केली होती आणि हाच शासनाचा 'मराठी बाणा' आहे.

महोदय, माननीय राज्यपालांनी अभिभाषणाच्या सुरुवातीलाच महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या क्रांतिसूर्याचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी केंद्र सरकारने इंदू मिलची साडेबारा एकर जागा उपलब्ध करुन देण्यास संमती दिली आहे. ती जमीन स्मारकासाठी आरक्षित ठेवण्याकरिता बृहन्मुंबईच्या मंजूर विकास आराखड्यात फेरबदल करण्याची प्रक्रिया राज्य शासनाने सुरु केल्याचे नमूद केले आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य राष्ट्रीय स्मारक उभारण्याचे देशाचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे, असेही अभिभाषणात नमूद आहे.

महोदय, मी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात दि.12 ,13, व 14 डिसेंबर रोजी 260 अन्वये प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न, औचित्याचे मुद्दे, विशेष उल्लेख इ. विविध आयुधांच्या माध्यमातून ज्या बाबी मांडल्या त्याचा संपूर्ण आलेख करुन सर्व भाषणाचा संग्रह केला आहे.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीकार नोंद

श्री. सुभाष चव्हाण.....

त्याचेही प्रकाशन येत्या दोन चार दिवसात करणार आहे. हा एक दस्तऐवज आहे. या आयुधांचे भंडार म्हणजे एक दस्तऐवज आहे. याची नोंद पुढील कार्यकर्त्यांना मिळावी हा माझा हेतू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या प्राधिकरणाची स्थापना लवकरात लवकर व्हावी. माननीय मुख्यमंत्र्यांकडे नगरविकास खाते आहे. त्यांनीच हे मुख्यमंत्री पद घ्यावे. मला एक सन्माननीय सदस्य विचारत होते की, इंदू मिलची जागा मिळून हे स्मारक खरोखरच होणार आहे का ? अहो होणार नाही का, सर्व झालेले आहे, ॲग्रीमेंट झालेले आहे, मुंबईच्या विकास आराखड्यात बदल होत आहे. लागतील तेवढे पैसे माननीय मुख्यमंत्री देतील असे त्यांचे भाषण मी एका पुस्तकात छापलेले आहे. हे सर्व होणार आहे. हे नुसते आश्वासन नाही. आम्ही ते पूर्ण करणार आहोत. ते माननीय उप मुख्यमंत्र्यांच्याही हातामध्ये आहे. आज दोघांमध्ये कोणताही भेदभाव नाही. दोघेही एका दिलाने गळ्यातगळा घालून काम करीत आहेत. दोघांमध्ये कोणताही गैरसमज नाही. स्वत: माननीय उप मुख्यमंत्री माननीय मुख्यमंत्र्यांना मानतात की, असा मुख्यमंत्री आतापर्यंत मिळालाच नाही. त्यांच्यामध्ये कोणताही गैरसमज नाही. उगाच तुम्ही गैरसमज करुन दिलेला आहे.

सभापती महोदय, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे मुंबईतील अरबी समुद्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे राहावे यासाठी राज्य शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. काल जो तांराकित प्रश्न चर्चेला आला त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात आपली भूमिका समजावून सांगितलेली आहे. मुंबई शहराचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समितीही गठीत करण्यात आलेली आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांची मान्यता घेण्यासाठी जी कागदपत्रे सर्वेक्षणासाठी लागतात तो स्मारकाचा आराखडा, संकल्पचित्र, महाराष्ट्र सागर तटीय विनियम प्राधिकरण (महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट) यांच्याकडे पाठविण्याचा, केंद्र शासनाकडे पाठविण्याचा राज्य शासनाने प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी एक समिती गठीत केलेली आहे. मुंबई शहराचे पालकमंत्री त्या समितीचे अध्यक्ष आहेत. लवकरच याचा निर्णय लागेल.

सभापती महोदय, कोल्हापूरच्या शाहू मिलच्या आवारात राजर्षी शाहू महाराज यांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. राज्यावर गेले वर्षभर दुष्काळाचे सावट

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

आहे. या सावटातून बाहेर पडण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. नेहमीच सर्वकाही सरकारनेच करावे, विरोधकांनी मात्र टीका करावी असे नाही. विरोधी पक्षाची टीका ही सरकारच्या पाचवीलाच पूजलेली असते. आज तुम्ही, आम्ही सर्वांनी मिळून या अस्मानी सुलतानी संकटाला सामोरे जाण्याची गरज आहे. लोकशाहीत विरोधी पक्षाची भूमिका केवळ टीका करण्याची असून भागत नाही तर त्यांनी संकटाच्या वेळी आपणहून पुढे आले पाहिजे. जनतेच्या सहभागातून काही योजना आखल्या पाहिजेत. सरकारसोबत सहकार्याची भूमिका घेऊन वागले पाहिजे.

सभापती महोदय, मी या निमित्ताने सभागृहाला आठवण करुन देतो. गुजरातमध्ये भीषण भूकंप झाला होता. अनेक राज्यांमध्ये दुष्काळ पडतो तेव्हा काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीच्या सरकारने त्या त्या वेळी सर्वार्थाने एकमेकांना सहकार्य केलेले आहे. आमच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी लोकसभेच्या विरोधी पक्ष नेत्या असताना गुजरातमधील भूकंपाच्या वेळी त्यांनी सहकार्याची भूमिका घेतली. गुजरातमध्ये आमचे राज्य नव्हते. आम्ही विरोधी पक्षात होतो. त्यावेळी आम्ही तन,मन,धनाने काम केलेले आहे. माननीय श्री. शरद पवार यांनी आपत्ती निवारण्याच्या कामाचे केवळ पदच घेतले नाही तर काम करुन तसा रिझल्टही दिलेला आहे. आता आमचे दोन्ही नेते माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री दुष्काळ निवारणाचे काम जोरदारपणे करीत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ निवारणासाठी फिरत आहेत.

आपल्याला आठवत असेल की, केंद्रामध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार असताना श्री. अटलबिहारी वायपेयी पंतप्रधान होते. त्यावेळी महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळच्या केंद्र सरकारने राज्याला धान्य देताना कुरकुर केली होती. पंढरपूरला त्यांच्या पक्षांच्या आघाडीची सभा होती. त्यावेळी त्यांनी काहीही दिले नाही. स्वत: शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीर मागणी केली होती.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

केंद्रामध्ये श्री.अटलबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान होते आणि महाराष्ट्रात आघाडीचे सरकार होते. त्यावेळी मा.श्री.सुशीलकुमार शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री होते. राज्यात गुरांना चारा नव्हता, पिण्याच्या पाण्यासाठी हजारो टँकर्स सुरु होते. जनावरांसाठी चारा छावण्या उघडल्या होत्या. त्यावेळी माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे हे राज्यातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय नेत्यांना माननीय श्री.वाजपेयी यांच्याकडे घेऊन गेले होते. परंतु त्या नेत्यांना हातातील कटोरी रिकामी घेऊन हात हलवत यावे लागले होते. आता केंद्रामध्ये आमचे सरकार आहे आणि त्या सरकारमध्ये राज्यातील तीन माजी मुख्यमंत्री आहेत. त्यापैकी श्री.विलासराव देशमुख हे आता हयात नाहीत. आताचे सरकार वगळता ज्या वेळेपासून आमच्या पक्षाची सत्ता आलेली आहे तेव्हापासून केंद्र सरकारकडून राज्यासाठी हजारो कोटी रुपयांची मदत मिळालेली आहे. विद्यमान माननीय मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान कार्यालयात काम केलेले आहे. त्यांचा दिल्लीत सतत संपर्क असतो. दिल्लीमध्ये त्यांची पत आहे. ही वस्तुस्थिती असल्यामुळे केंद्र सरकारकडून राज्यासाठी किती मदत मिळाली आहे त्याचीही बेरीज करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शासनाने आजतागायत दुष्काळ निवारणासाठी 778 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. शासनाने केंद्र सरकारकडे सुमारे 2270 कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यासंबंधी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली होती. त्या बैठकीला माननीय केंद्रीय गृह मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदेही उपस्थित होते. त्यांनी 1207 कोटींची मदत जाहीर केलेली आहे. हा दुष्काळग्रस्तांना पहिला दिलासा आहे. कालच माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे की, दुष्काळ निवारणासाठी शासन पैसा कमी पडू देणार नाही, लागेल तेवढा निधी खर्च केला जाईल. माननीय उप मुख्यमंत्री व वित्त मंत्री यांनी असे जाहीर केले आहे की, राज्याच्या बजेटपैकी 25 टक्के निधी दुष्काळासाठी राखून ठेवलेला आहे. तेवढी रक्कम खर्च केली जाणार आहे. काल जाहीर केलेले 400 कोटी रुपये हे रब्बी पिकासाठी अनुदान म्हणून जाहीर केलेले आहे. फळबागांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी 400 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. 2 हेक्टरवर फलोद्यान करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रत्येकी 60 हजार रुपये देण्यात आलेले आहेत. हा पहिला हप्ता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/ D/ KTG/

श्री.सुभाष चव्हाण....

सभापती महोदय, सद्य:स्थितीमध्ये राज्य शासनासमोर असलेल्या अडचणी, विकास आणि धोरण कशा प्रकारे राबवित आहे यासंबंधीची संपूर्ण कारणमीमांसा समजावून देणारे व त्यावर प्रकाश टाकणारे राज्यपालांचे हे भाषण आहे. या भाषणात त्यांनी अनेक महत्वाच्या मुद्यांना स्पर्श केलेला आहे. या सभागृहात या अभिभाषणावर अनेक सन्माननीय सदस्य आपले विचार मांडतील. त्यातून शासनाला महत्वपूर्ण अशा विधायक सूचनाही केल्या जातील. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सरकारवर केवळ टीका करण्यापेक्षा सकारात्मक भूमिकेतून या दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी शासनाला सहकार्य, दुष्काळग्रस्तांना सहकार्य व या सहकार्यातून एखादा नवा प्रकल्प उभारावा, त्या प्रकल्पामुळे महाराष्ट्रावर सातत्याने येणारा दुष्काळ कायमचा दूर होईल.

महाराष्ट्र हे अतिशय संवेदनधील राज्य आहे आणि त्यापेक्षाही संवेदनशीलता माननीय मुख्यमंत्र्यांमध्ये आहे. 1972 साली राज्याची परिस्थिती वेगळी होती. त्यावेळी दळणवळणाची सोय नव्हती. मोबाईल नव्हते. पंरतु सध्याचे माननीय मुख्यमंत्री हे प्रत्येक दिवशी थेट जिल्हाधिकाऱ्यांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिगद्वारे संपर्क साधत असतात. तेथील प्रश्नांची तीव्र गतीने सोडवणूक करीत असतात.

सभापती महोदय, 1972 च्या भीषण दुष्काळामध्ये राज्यामध्ये ऐतिहासिक रोजगार हमी योजनेचा जन्म झाला. कै.वि.स.पागे यांनी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयातील ही योजना मांडली व त्यानंतर या योजनेचा जन्म झाला आहे. राज्यपालांच्या अभिभाषणात सन 2013-13 या वर्षामध्ये आतापर्यंत 700 लक्ष मनुष्य दिवस रोजगार निर्माण होऊन त्यावर 1700 कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च झालेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ MMP/ D/ पूर्वी श्री. खंदारे 16:00

श्री. सुभाष चव्हाण...

शासनाच्या अविरत प्रयत्नामुळे केन्द्र सरकारने राज्यातील 123 दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील प्रति कुटुंबास 100 दिवसांऐवजी 150 दिवसापर्यंतच्या रोजगाराचा खर्च दिलेला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत विहिरींच्या खर्चात 2 लाख रुपयावरुन 3 लाख रुपये इतकी भरीव वाढ केलेली आहे. फेब्रुवारी 2013 अखेरपर्यंत राज्यामध्ये 2136 टँकर चालू आहेत. मागील वर्षी फक्त 230 टँकर चालू होते. म्हणजे या वर्षीचा दुष्काळ हा दहापटीने वाढलेला आहे. राज्य शासन दुष्काळावर मात करण्याचा प्रयत्न करीत आहे. आता पर्यंत राज्य शासनाने 414 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. जनावराच्या छावण्यांची संख्या वाढविण्यात आलेली आहे. 564 छावण्यांमध्ये साडेचार लाखापेक्षा अधिक जनावरे आहेत. 749 कोटी रुपये चा-यावर खर्च झालेले आहेत. दुष्काळ निवारणाच्या कामावर 2 लाखा पेक्षा अधिक मजूर काम करीत आहेत. त्याबाबतीत राज्य शासनाने विविध उपाययोजना केलेल्या आहेत.

राज्य शासनाने 95 कोटी रुपये खर्च करुन चारा विकास कार्यक्रम हाती घेतलेला आहे. दुष्काळग्रस्त भागातील जनावरांसाठी 60 लाख टन इतक्या हिरव्या चा-याची निर्मिती राज्य शासनाने केलेली आहे. 50 पेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावात पीक कर्ज थकित होण्यापूर्वी शासनाने या कर्जाचे पुनर्गठन करण्याचे ठरविले आहे. शेतक-यांना 1 लाख रुपयापर्यंतचे पीक कर्ज बिनव्याजी आणि 3 लाख रुपयापर्यंतचे पीक कर्ज प्रतिवर्षी 2 टक्के इतक्या दराने देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. या सर्व उपाययोजना करीत असताना शासन ढोल वाजवित बसले नाही. हे दुष्काळाचे संकट फार भयानक आहे. हे संकट एकटया दुकटयाने संपणारे नाही. आपण सर्वांनी मिळून या संटाचा मुकाबला केला तरच येणा-या दोन महिन्यामध्ये आपण दुष्काळग्रस्तांना दिलासा देऊ शकू. विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांना अनेक सोयीसवलती दिलेल्या आहेत. दुष्काळग्रस्त भागातील विद्यापीठांचे कुलगुरु त्या त्या भागामध्ये जाऊन विद्यार्थ्यांना सोईसवलती देत आहेत. आजतागायत विजेची 96 टक्के कामे ऊर्जा मंत्र्यांनी पूर्ण केलेली आहेत. गेल्या वर्षीच्या डिसेंबर महिन्यापर्यंत 82टक्के भारनियमन कमी झालेले आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये कोकणातील सदस्यांचे संख्याबळ जास्त आहे. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचा दोनदा उल्लेख केलेला आहे. माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणात असे म्हटलेले आहे की, सिंधुदुर्ग जिल्हा हा राज्यात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

ई ऑफिस झालेला पहिला जिल्हा आहे. ई-ऑफिस प्रणाली ही नावीन्यपूर्ण संकल्पना सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. विरेंद्र सिंग यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात राबवून राज्यासह संपूर्ण् देशाला आदर्श घालून दिल्याबद्दल सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांचा राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी गौरव केला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये संयुक्त राष्ट्रीय विकास कार्यक्रम पुरस्कृत प्रकल्प मंजूर करण्यात आला असून त्यामुळे समुद्रतटीय वनस्पती व प्राणी यांच्या जैवविविधतेचे संवर्धन तसेच पर्यटन आणि मत्स्य व्यवसायास मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. कोकणाचा कॅलिफोर्नीया करण्याचा शासनाचा विचार आहे. मौजे तोंडवली, तालुका मालवण येथे देशतील पहिला जागतिक सीवर्ल्ड प्रकल्प उभा राहाणार आहे. त्यासाठी बजेटमध्ये तरतूद देखील केलेली असेल. या प्रकल्पाच्या ठिकाणी रिसॉर्ट, हॉटेल, थीमपार्क, रेस्टॉरन्स, सात महासागराची प्रतिकृती उभारण्यात येणार आहे. सिंगापूर आणि लंडन येथे जो प्रकल्प आहे तसा प्रकल्प मालवण येथे उभा राहाणार आहे.

कोकणामध्ये प्रचंड पाऊस पडतो. हे पाणी अडविण्यासाठी नियोजन नाही. माझ्या गावात देशातील सगळयात सुंदर असा धामापूर हा शिवकालीन तलाव आहे. त्या तलावाचे पाणी आजूबाजूच्या शंभर गावांना पुरविले जाते. पूर्वी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये शिवकालीन कालवे होते. ते कालवे पुनर्जीवित करण्यासाठी श्री. अजितदादा पवार हे जलसंपदा खात्याचे मंत्री असताना त्यांनी 15 कोटी रु. दिले.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

15 कोटी रुपयांच्या कालव्यांची कामे पूर्ण होत आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने 92 कोटी रुपयांचा प्रकल्प भारत सरकारकडे पाठविलेला आहे. मी त्या प्रकल्पाचा प्रामुख्याने पाठपुरावा करीत आहे. तो प्रकल्प शासनाने केंद्र सरकारकडून लवकरात लवकर मंजूर करुन घ्यावा अशी माझी शासनास विनंती आहे. या प्रकल्पामुळे बाजुबाजुची गावे हिरवीगार आणि शेतीमय होणार आहे.

सभापती महोदय, रोजगार निर्मिती, राज्यात होणारी गुंतवणूक व विकास, बेरोजगार व दारिद्रय याचा विचार करुन या सगळया कामासाठी समतोल विकासाला चालना दिलेली आहे. ही चालना देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने नवीन औद्योगिक धोरण जाहीर केलेले आहे. जातीयता व विषमता नष्ट करण्यासाठी औद्योगिक क्रांती झाली पाहिजे. औद्योगिक क्रांतीमध्ये शासनाने जे जे दिले, जो पर्यंत आम्ही लोक मोठे होत नाहीत, श्रीमंत होत नाही, जातीय विषमता नष्ट होत नाही, परंतु या सर्व गोष्टी औद्योगिक वर्गीकरणामुळे होतील. मागासवर्गीय घटकातील दुर्बल घटक यांचे दरडोई उत्पन्न यामध्ये वाढ होणार आहे.

सभापती महोदय, शासनाने नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले आहे. राज्यात या धोरणा अंतर्गत 312 प्रकल्प मंजूर केले आहेत. या प्रकल्पात एकूण गुंतवणूक 2700 कोटी इतकी अपेक्षित असून 2100 इतक्या नवीन रोजगार संधी उपलब्ध होणार आहे. 2500 लोकांना रोजगार मिळणार आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मागावर्गीयांना जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देणारे संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. या विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा महत्वाचा प्रश्न राज्य शासनाने सोडविला असून 2012 व 2013 या वर्षात ई-पेमेंट प्रणालीच्या माध्यमातून एकूण 1581 कोटी रुपये इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे. सर्वांना त्यांच्या खात्यावर उपलब्ध करुन देण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. राज्य शासन अशा योजनांच्या अंमलबजावणीत अग्रभागी आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात महिलांना त्यांच्या हक्काचे संरक्षण, त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक यासंबंधी व्यासपीठ निर्माण करीत आहे. राज्यात विभागीय, जिल्हा, तालुका स्तरावर महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, अल्पसंख्यांक समाजासाठी हे सरकार वचनबध्द आहे. रुपये 250 कोटी पर्यंतचे भाग भांडवल "मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला" दिले आहेत.

सभापती महोदय, नागपूर येथे नुकतेच हज हाऊसची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. औरंगाबाद येथे नवीन "हज हाऊस" बांधले जाणार आहे.

सभापती महोदय, राज्यात काही भागात खंडकरी शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. या खंडकऱ्यांना जमीन मालकी हक्काने देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, त्या निर्णयाचे मी मन:पूर्वक स्वागत करतो.

सभापती महोदय, गेल्या महिन्यात माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली "ॲडव्हांटेज विदर्भ" या गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्याला भरीव प्रतिसाद मिळाला. विदर्भासाठी वरदान ठरणारी ही योजना आहे. सुमारे 18500 कोटी रुपयांचे सांमजस्य करार झाले आहेत. त्यामुळे येथे मोठया प्रमाणात गुंतवणूक अपेक्षित आहे.

सभापती महोदय, विदर्भाचा विकास, मागासवर्गीयांचा विकास हे सरकारचे ब्रिद वाक्य आहे. समतोल विकासासाठी वैधानिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

सभापती महोदय, कोकणचे नंदनवन झाले पाहिजे. कोकणाचा विकास झाला पाहिजे. कोकणात औद्योगिक क्रांती झाली पाहिजे, एवढेच नव्हे तर नव्या योजना विदर्भात, कोकणात, मराठवाडयात व सर्व मागास भागात करण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी काही सूचना करतो. राज्यामध्ये जिल्हा पातळीवरील जिल्हा रुग्णालयांमध्ये प्रत्येक ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात यावीत.

राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या 100 ते 150 योजनंकरिता नियमित निधी येतो. त्यांचा विकास करण्याकरिता एनजीओ चा फार मोठा सहभाग असतो. तथापि निधी देताना मोठया प्रमाणात गैरव्यवहार होतो. शासनाचा निधी आदिवासींपर्यंत पोचत नाही. तरी आदिवासी अनुदान आदिवासींच्या एनजीओच्या थेट खात्यात जमा झाले तर त्याचा त्यांना लाभ होईल.

सभापती महोदय, हे वर्ष वसंतराव नाईक शताब्दी महोत्सव म्हणून साजरे करीत आहोत. आजतागायत या महोत्सवाचा एकही कार्यक्रम झालेला नाही. त्यासंबंधी त्वरित कार्यक्रमाची योजना आखण्यात यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या धर्तीवर वसंतराव नाईक प्रतिष्ठान अजून उभारण्यात आलेले नाही ते प्रतिष्ठान लवकरात लवकर उभारण्यात यावे.

सभापती महोदय, वसंतराव नाईक यांच्या निमित्ताने तांडा विकास योजनेसाठी भरपूर मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. सामाजिक न्याय विभागाच्या मार्फत समाजमंदीरे बांधतो, तशी समाजमंदिरे या सर्व निवडक तांडयांमध्ये बांधण्यात याव्यात. त्याचप्रमाणे जिल्हा सामाजिक न्यायभवनाच्या धर्तीवर "वसंत भवने" बांधण्यात यावीत. या वसंत भवनामध्ये लग्न समारंभ, सभा, सांस्कृतिक कार्यक्रम, अभ्यासवर्ग, संगणक रुम इत्यादीची निर्मिती आपल्याला करता येईल.

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण.....

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणाला सामाजिक न्यायाचा आधार देण्यात आलेला आहे. कारण आघाडी सरकारची भूमिका सामाजिक न्यायाची आहे. राज्यात अडचणीची परिस्थिती निर्माण झाली असताना राज्याचे मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांनी सर्वसामान्य जनतेला दिलासा दिलेला आहे. राज्याच्या विकासाचे धोरण खंबीरपणे राबविण्याची आमची भूमिका आहे. राज्यपालांच्या अभिभाषणात शेती, दुष्काळ, शेतकऱ्यांचे प्रश्न अशा अनेक बाबींकडे बारकाईने लक्ष देण्यात आले आहे. राज्यपालांचे अभिभाषण हे सर्व दृष्टीने अतिशय उत्कृष्ट आहे. राज्याला दिशा देणारे, सर्वांना बरोबर घेऊन जाणारे, समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे आहे एवढे बोलतो आणि शेवटी दोन पंक्ती बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

देव पंचावन्न कोटी, देव दगडांचे किती,

माणसातील देव जेथे त्या घरी आपण राहू चला.

धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव माझे सहकारी माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी मांडला आहे, त्याला अनुमोदन देण्यासाठी मी आपल्यासमोर उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये छापील स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आले आहे. प्रत्यक्ष भाषण ऐकताना माननीय राज्यपाल इंग्रजी भाषेत बोलत असले तरी त्या भाषणाचे मराठी रुपांतर आमच्या कानामध्ये ऐकू येईल इतकी चांगली व्यवस्था करण्यात आली होती. भाषण ऐकताना हे मराठी राज्य, मराठी भाषेचा अभिमान या गोष्टी आमच्या मनात फिरत असताना मी विचार करीत होतो की, राज्यपालांनी केले ते भाषणच होते, मग त्याला अभिभाषण का म्हणायचे? भाषणापेक्षा अभिभाषण याला काहीतरी वेगळा अर्थ असला पाहिजे. या दृष्टीने मी शोधकार्य सुरु केले.

सभापती महोदय, मराठी शब्दकोषात मला याचे उत्तर सापडले. 'फॉर्मल स्पीच' म्हणजे अभिभाषण. या राज्याबद्दलचे आहे म्हणून त्याला अभिभाषण असे मानण्यात आले आहे. इतिहासात डोकावू नये या मताचा मी आहे. सहज म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासात डोकावताना एका प्रसिध्द साहित्यिकाने एक वाक्य म्हटल्याचे वाचनात आले. "राज्य किंवा देश प्रगतीपथावर घोडदौड करु शकत नाही, जर तो इतिहासात जास्त अडकला आणि त्याने भूगोलाकडे दुर्लक्ष केले तर प्रगती होणे कठीण असते." असे ते वाक्य होते. मला हा सिध्दांत मनापासून पटला. म्हणून मी थोडासा मागोवा घेत राज्याची स्थापना झाल्यानंतर तत्कालीन राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचे कागद मिळतात का हे पाहिले. आपण ज्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा वारंवार उल्लेख करतो ते स्व.यशवंतराव चव्हाण, या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांनी काही गोष्टींचा त्यात खुलासा केला होता. मला तो आजही उद्बोधक वाटतो.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.हेमंत टकले .....

माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर तपशीलवार चर्चा करण्याचे हे व्यासपीठ असून त्यासंदर्भातील चर्चा उद्बोधकही होणे आवश्यक असते. ही चर्चा जशी सभागृहाला उपकारक ठरेल तशीच ती शासनाला सुध्दा उपकारक ठरेल अशी आशा त्यांनी व्यक्त केलेली आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणावरील चर्चा म्हणजे आपापला दृष्टिकोन मांडण्याची एक चांगली संधी आहे असेही त्यांनी त्यामध्ये म्हटले आहे. त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये साधारणत: सरकारची पुढची दिशा दाखविण्याचा प्रयत्न असतो. या धोरणाला अनुसरुन सरकार निश्चितपणे कोणत्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करणार आहे याबाबतीत काही गोष्टींचा उल्लेख असतो काही गोष्टींचा उल्लेख अर्थमंत्र्यांच्या भाषणात असतो. सरकारची कार्य करण्याची दिशा कोणती राहील हे सांगत असतांना गतवर्षी केलेल्या महत्वाच्या गोष्टींचा अहवाल त्यात मांडण्याची प्रथा असते. त्या दृष्टिकोनातून माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर टीकाही व्हावयास पाहिजे असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर टीका नाही तर खेद व्यक्त होणे असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी करणे आवश्यक आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी जे कोट केलेले आहे तेच मी वाचून दाखवले आहे. हे सांगण्याचा माझा दृष्टिकोन असा आहे की, 1960 सालापासून अधिवेशनाला सुरुवात झाली आणि जेव्हापासून माननीय राज्यपाल महोदय भाषण करतात तो एक इतिहास आहे. त्यामुळे या ऐतिहासिक दस्तऐवजाला फार मोठे महत्व आहे.

सभापती महोदय, माझ्या अगोदर छापील भाषणातले आणि ऐकलेल्या भाषणातले अनेक मुद्दे या ठिकाणी सांगितलेले गेले आहे. मला या ठिकाणी असे सांगावेसे वाटते की, एखादा सत्ताधारी पक्ष राज्य चालविण्याचे काम करीत असतो व त्याबरोबर विरोधी पक्षाचे लोकही राज्यात असतात व त्यांचेही प्रतिनिधी सभागृहात असतात. राज्य म्हणजे एक विस्तारलेले एकत्र कुटुंब आहे आणि या कुटुंबाचे कर्ते करविते राज्याचे मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री जरी असले तरी याच एकत्र कुटुंबामध्ये आपण सर्व एकत्र नांदत असतो व राज्यातील जनतेचे भले होण्यासाठी जे जे करणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.हेमंत टकले .....

आवश्यक आहे ते जर करावयाचे असेल तर तुमच्या, आमच्या सगळयांसकट त्यांना हे करावे लागेल. माननीय राज्यपाल हे एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये सर्वात आदरणीय ज्येष्ठ असतात व त्याचे म्हणणे सर्वांनी ऐकावयाचे असते व कारभार करावयाचा असतो व ही त्या मागची भावना असते.

सभापती महोदय,आपण एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये पिढयानपिढया ज्येष्ठांचा आदर करीत आलेलो आहे तसाच माननीय राज्यपालांचा अधिकार राज्याच्या कारभारात असतो हे मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, काल या सभागृहात आपण दुष्काळाच्या प्रश्नावर अतिशय गंभीरपणे चर्चा केली असून या चर्चेला विधानसभेत माननीय मुख्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिले असून या सभागृहात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. त्यांनी दुष्काळाच्या विषयाच्या संदर्भातील सर्व बाजू मांडलेली आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणामध्ये आलेल्या मुद्यांचा पुन्हा उल्लेख करावा असे मला वाटत नाही. परंतु घरातील एकटा माणूस किती कमावणार आहे आणि घरात खाणारी तोंडे किती आहे, शिकणारे किती आहेत,

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

वृद्ध लोक किती आहेत, निराधार लोक किती आहेत, या प्रत्येकाची सोय करताना हाती आलेल्या रूपयातून काही तरी बचत करून त्यामध्ये डावे उजवे होऊ न देता सगळ्यांनाच समाधान मिळेल अशा प्रकारचा प्रयत्न या अभिभाषणातून झालेला निश्चितपणाने जाणवतो.

आपल्यावर अनेक संकटे आलेली आहेत. 1972, 2003, मध्ये राज्यात दुष्काळ पडला होता आणि आता 2013 मध्ये दुष्काळ पडला आहे. ही संकटे येतच असतात. घरातील माणूस आजारी पडल्यानंतर त्या माणसाच्या आजाराची छाया संपूर्ण कुटुंबावर पसरलेली असते. त्याला रूग्णालयामध्ये नेऊन त्याची देखभाल करावी लागते. असे जरी असले तरी घरातील माणसांचा जो काही उद्योग असेल किंवा जी काही दैनंदिन कामे आहेत त्यात आपल्याला हेळसांड करून चालत नाही. एकीकडे जी काही समस्या आली आहे त्यावर मातही करायची आहे. दुसरीकडे सर्वांना अपेक्षित असलेला विकासाचा दरही गाठावयाचा आहे. शेतीमध्ये सुधारणा करावयाची आहे. पाण्याचे नियोजन करावयाचे आहे. पाण्याचा वापर अधिक चांगल्या पद्धतीने करावयाचा आहे.

आज शिक्षणाचा विस्तार होत आहे. नवीन कायदे अंमलात येत आहेत. नवीन कायद्यामुळे शिक्षणाचा हक्क सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणार आहे. या कायद्यान्वये आता शिक्षणासाठी लागणारे वातावरण व सुखसोयी पुरवाव्या लागतील. राज्यात किती शाळा असणे आवश्यक आहेत, किती प्रशिक्षित शिक्षक लागतील याची शाळावार यंत्रणा उभी करावी लागेल. त्यांचा अभ्यासक्रम कसा असेल, त्यांच्या परीक्षा कशा होतील, त्यांची प्रगती कशी होईल हे सर्व पहावे लागेल. त्याच बरोबर खेळांवर कसे लक्ष राहील, त्यामध्ये नैपुण्य कसे मिळविता येईल अशा छोट्या छोट्या गोष्टींकडे लक्ष द्यावे लागेल. राज्यकर्ते म्हणून शिक्षण, आरोग्य, दळणवळण या महत्त्वाची बाबी आहेत. नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाणे हा ही त्यातील एक भाग येऊ शकतो. या सगळ्या पार्श्वभूमीवर ही यंत्रणा अधिक गतीमान करावयाची असेल, लोकांपर्यंत पोचवायची असेल तर त्या दृष्टीने या सरकारने निश्चितपणे अजून काही तरी केले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

आज नेहमी म्हटले जाते की, अनेक राज्ये आपल्या पुढे जात आहेत. पण आपल्या राज्याने ई-गव्हर्नन्स, निर्मल ग्राम योजना, पर्यावरण संतुलित ग्रामविकास इत्यादीमध्ये अधिकचे लक्ष दिलेले आहे, अधिकची कामगिरी केलेली आहे. ती केंद्र शासनाच्या पातळीवर गौरविली गेली आहे.

आपल्या राज्यातील शहरांचे प्रश्न हा वेगळा भाग आहे. इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्र हे निश्चितच वेगळे आहे. या महाराष्ट्रामध्ये मुंबई सारखे महाकाय महानगर आहे. या शहराचे प्रश्न वेगळे आहेत. या शहरानंतर अफाट वेगाने वाढणारी ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागरपूर अशी शहरे आहेत. या सगळ्या माध्यमातून एक मोठा सामाजिक प्रश्न निर्माण होत आहे. हा प्रश्न निर्माण होत असताना रोजगाराच्या संधी कशा निर्माण होतील, ग्रामीण व शहरी भागामध्ये पाण्याचे नियोजन कसे होईल हे पहावे लागेल. यासाठी उपाययोजना कशा कराव्या लागतील हे सर्व पहावे लागेल. हे सर्व करीत असताना निसर्गाचा समतोल बिघडणार नाही याची सुद्धा आपल्याला काळजी घ्यावी लागेल. मी प्रसिद्ध कवी गुलझार यांचे देवडी पुस्तक वाचतो आहे. मुंबईत जेव्हा पूर आला होता तेव्हा त्याचे वर्णन त्यात केले आहे. या मुंबईकरांच्या अवस्थेचे वर्णन करताना ते म्हणतात की, "है सिर पानी में और पांव जमीन पर, यह नगरी मुंबई की है"
आज राज्यातील काही ठिकाणी पाणी प्यायला देखील मिळत नाही. पण या शहरात अशी वेळ येते की, डोक्या पर्यंत पाणी येते. जमीनच कुठे दिसत नाही. एवढी विरोधाभासाची पार्श्वभूमी असताना हे राज्य चालविणे प्रचंड मोठी आव्हानात्मक गोष्ट आहे.

सभागृहात कायदा व सुव्यवस्थेवर अनेक वेळा चर्चा होते. आपल्या राज्यात नक्षलग्रस्त भाग आहे. त्यादृष्टीने सुसज्ज यंत्रणा निर्माण करण्यासाठी पुरेसे प्रशिक्षित मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. त्यासाठी नियोजन होते आहे किंवा नाही याकडे देखील शासन चांगल्या प्रकारे लक्ष देत आहे.

पर्यावरणा संबंधी जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मागच्या वेळी चंद्रपूर जिल्ह्याला एक विशेष बाब म्हणून 200 ते 250 कोटी रूपये निधी तेथील पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी दिला होता.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

अशाप्रकारचे पर्यावरण प्रत्येक जिल्ह्यामध्ये टिकविण्याची गरज आहे अशा समस्यांना या ठिकाणी हात घातलेला आहे.

सभापती महोदय, मला एक गोष्ट राहून राहून वाटते की, राज्य पातळीवर व विभागीय पातळीवर कोट्यवधी रुपयांच्या योजना घेतल्या जातात. मग यामध्ये यासाठी योजना, त्यासाठी योजना असे प्रकार चालू असतात. परंतु माझे म्हणणे आहे की, आपण मायक्रो प्लानिंग केले पाहिजे म्हणजे सूक्ष्मात जाऊन अभ्यास केला पाहिजे. आपणास उदाहरण सांगावयाचे झाले तर आपण फक्त आरोग्य सेवेचा विचार केला तर नुकतेच माझ्या असे वाचनात आले आहे की, या आरोग्य सेवेमध्ये गेल्या काही वर्षापासून सातत्याने वाढत असलेला ॲन्टीबायोटिक्सचा उपयोग आणि ती ॲन्टीबायोटिक्स निकामी होत चालल्याचा निष्कर्ष आलेला आहे. यामुळे आरोग्याची एक गंभीर स्थिती निर्माण होण्याची भीती आहे की, जी ॲन्टीबायोटिक्स लोकांना दिली जात होती, ज्याचा सर्रास वापर होत होता ती निष्कामी ठरणार आहे. तेव्हा त्यादृष्टीने संशोधनाचे कार्य होणे आवश्यक आहे. आपल्या शासनाने वैद्यकीय, औषध विज्ञान, शिक्षण क्षेत्रातील गोष्टीसाठी संशोधन करण्यासाठी अधिक लक्ष दिले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात वाचन संस्कृती व मराठी भाषेच्या संदर्भात उल्लेख आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक असो वा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबडेकरांचे स्मारक असो या स्मारकांसाठी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री या स्मारकांसाठी निधी कमी पडू देणार नाही असे सांगितले आहे याचा मला आनंद वाटतो. कारण हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. सर्व नागरिकांमध्ये एकजुटीची भावना, आपल्या राज्यावर प्रेम करण्याची भावना निर्माण करायची असते तेव्हा अशी स्फूर्तिदायी स्मारके आपल्या राज्यात असण्याची नितांत आवश्यकता आहे...आम्ही तात्यासाहेबांचे स्मारक फार कमी वेळेत पूर्ण केले आहे आणि त्यावेळी पाच कोटी रुपये खर्च आला.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या दृष्टीने एक अतिशय चांगला उपक्रम केलेला आहे त्याची माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नोंद आलेली आहे. संत रामदास रचित दासबोध ग्रंथ,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

यशवंतराव चव्हाण यांचे कृष्णाकाठ हे आत्मचरित्र, कुसुमाग्रजांचे प्रवासी पक्षी आणि रसयात्रा हे कविता संग्रह आणि विंदा करंदीकर यांचे संहिता आणि आदिमाया हे कविता संग्रह आपण दृकश्राव्य पुस्तकामध्ये आणलेले आहे. शासनाने अभिनंदनीय पाऊल उचलले आहे. तसेच "गाव तेथे वाचनालय" याचा उपयोग मराठी अस्मितेचे संवर्धन करण्यासाठी नक्की केला जाईल.

सभापती महोदय, मी मागील पाच वर्षापासून माननीय राज्यपालांचे अभिभाषण ऐकत आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दीर्घकाल प्रलंबित असा शब्द आला की आपण आता जागेवर उभे राहायला हरकत नाही अशाप्रकारची भावना मनामध्ये तयार होते. माननीय राज्यालांच्या अभिभाषणामध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचा उल्लेख शेवटून दुसरा असतो. आपण याचा क्रम थोडा बदलावा असे मला वाटते.

सभापती महोदय, माझे मित्र आणि कोकणातील ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांचेशी बोलताना आणि त्यांचे एक पुस्तक वाचताना माझ्या असे लक्षात आले की, ते ज्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयात "प्रसिध्दी अधिकारी" म्हणून काम करीत होते त्यावेळेला त्यांनी बेळगावच्या लोकांना काही कळू न देता "आम्हाला एक डॉक्युमेन्टरी बनवावयाची आहे" या नावाखाली बेळगावमध्ये जाऊन त्या भागातील शुटींग केले होते. 100 वर्षापूर्वी बेळगावमध्ये सर्वात जुना पूल होता त्या पुलाची कोनशिला मराठी भाषेत आहे याचे त्यांनी फिल्मिंग करुन आणले होते. कोणते लवाद नेमा, कोणतेही अहवाल मागवा, त्यापेक्षा आपण ही ज्या गावातील पाट्या ज्या भाषेत आहेत ती गावे त्या राज्यात अशाप्रकारचा एक साधा फॉर्म्युला निर्माण होऊ शकतो. हा प्रश्न खूप वर्षापासून प्रलंबित आहे. परंतु दुर्दैवाने त्यांनी त्यांच्या पुस्तकात लिहिले आहे की, आज ती फिल्म सरकारकडे उपलब्ध आहे किंवा नाही माहीत नाही. कारण ती फिल्म महाजन आयोगापुढे सादर करण्यासाठी तयार केली होती. या राज्याच्या सीमा भागात चाललेल्या लढ्या संबंधीचे ते एक डॉक्युमेन्टेशन आहे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बोर्डे..

श्री.हेमंत पटले....

त्यांचे सुध्दा जतन करणे आवश्यक आहे.

हे सर्व करीत असताना, सामान्य माणसांची काळजी घेत असताना, त्यांचा आर्थिक स्तर उंचविण्यासाठी तीन-चार गोष्टी करणे अतिशय महत्त्वाच्या असतात. राज्यकर्त्यांना त्यांच्याबद्दल आस्था आणि जिव्हाळा दाखवावा लागतो. रुग्ण, वृध्द, महिला, बालके यांच्यावर अन्याय-अत्याचार करणाऱ्या घटना घडल्याचे आपल्यासमोर येते. मुळात ही बाब राज्याच्या प्रतिमेला शोभणारी नाही. या सर्व परिस्थितीमध्ये ताबडतोब दुरुस्ती होणे गरजेचे आहे. आज राज्यात स्त्री भ्रूण हत्या होत आहेत. यावर प्रतिबंध आणण्यासाठी लोकांमध्ये जनजागरण करुन, त्यांच्यात जागृती करण्याचा व्यापक कार्यक्रम हाती घ्यावा लागेल.

महोदय,शासनाने गेल्या वर्षी काय केले आणि येणाऱ्या वर्षात काय करणार आहे याचा लेखाजोखा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून मांडला जातो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून आपल्याला प्रामुख्याने डेडीकेशन, डिव्होशन, डायरेक्शन आणि डिलीव्हरी ही चार सूत्रे प्रतीत होत असल्याचे दिसून येतात. समर्पित भावनेने, श्रेष्ठतेने, निश्चित प्रगतीच्या दिशेने नेणे आणि दिलेला शब्द खरा करुन दाखविणे ही या शासनाची कुवत वा हिंमत आहे हा शब्द माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून राज्यातील जनतेला देण्यात आलेला आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या ठरावाचे मी समर्थन करतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेते) : अध्यक्ष महोदय, राज्याच्या ॲडव्होकेट जनरलने जे प्रतिज्ञापत्र सादर केले त्याच्याशी आपले राज्य सरकार असहमत आहे असे समजून माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केले आहे ते खरोखरच सरकारचे आहे, किंबहुना माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाला हे राज्य सरकार बांधिल आहे असे राज्य सरकारच्या वतीने सांगितले तरच आम्ही माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मांडण्यात आलेल्या आभार प्रदर्शनाच्या ठरावावर आमचे विचार व्यक्त करु.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा ठराव मांडल्याबद्दल मी त्यांना शुभेच्छा देतो. यापूर्वी सन्माननीय माजी सदस्य श्री.उल्हास पवार यांनी अशाच प्रकारचा प्रस्ताव मांडला होता, त्यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांनी सुध्दा असाच प्रस्ताव मांडला होता. परंतु ते पुन्हा या सभागृहात आले नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांची टर्म दि.12 मार्च, 2014 रोजी संपणार आहे. सभागृहाचे नेते त्यांची काळजी घेतील. त्यांची टर्म लवकरच संपणार असल्यामुळे त्यांना नक्की शुभेच्छा दिल्या पाहिजेत. असो.

महोदय, सर्वप्रथम मला माननीय राष्ट्रपती श्री.प्रणव मुखर्जी यांचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी राष्ट्रपती, राज्यपाल यांच्या पदनामापूर्वी लावण्यात येणारी 'महामहिम' ही इंग्रजांची झूल एका आदेशात काढून टाकली. त्यांनी सांगितले की, आता 'महामहिम' संबोधण्याची गरज नाही. 'माननीय' हा शब्दप्रयोग पुरेसा आहे. महोदय, इंग्रजांचा हँगओव्हर छोटासा परंतु महत्त्वपूर्ण असतो.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, त्या दिवशी माननीय राज्यपालांचे भाषण ऐकले आणि त्यानंतर मी त्यांचे पुस्तिकेतील पूर्ण भाषण वाचले. मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात कौल आणि शकधर यांच्या प्रॅक्टीस अँड प्रोसीजर ऑफ पार्लमेंट या पुस्तकात मानयीय राष्ट्रपती आणि माननीय राज्यपाल यांच्या अभिभाषणाबाबत नेमके काय म्हटले आहे ते मी पाहिले. त्यामध्ये असे म्हटले आहे की,

> "The Governor's Address is a public declaration of policy that the Government wants to follow in the coming year. The Address is supposed to look to the future and to the present."

म्हणजे प्रेझेंटच्या आधारे फ्युचर पाहणे या अर्थाने माननीय राज्यपालांचे अभिभाषण असते. त्यांचे अभिभाषण या ठिकाणी ऐकल्यानंतर आणि पुन्हा त्यांचे पूर्ण भाषण वाचल्यानंतर माझे असे मत झाले की, फ्युचर वगैरे काही नाही तर रोजंदारी कामगारांचे जसे असते त्या पध्दतीने रोजंदारी सरकारचे धोरण त्यांनी मांडलेले आहे. पुढे भव्य काही तरी पाहात आहोत.

सभापती महोदय, काल माननीय मुख्यमंत्री आणि मी एका चॅनेलवरील चर्चेमध्ये सहभागी झालो होतो. मध्यप्रदेशमध्ये, पंजाबमध्ये 70 टक्के शेती ओलिताखाली येण्याची शक्यता आहे. कारण निसर्गाने त्यांच्याकडे तसे दिले आहे. पण आपल्याकडे तसे नाही. आपली इरिगेशनची क्षमता जास्तीत जास्त 35 टक्केपर्यंत जाऊ शकते. परंतु निसर्गाकडून जे काही आपल्याला मिळाले आहे किंवा आपल्याकडे जे काही आहे त्याच्या आधारे कोठे तरी राज्याची योजना होत आहे का, त्याच्या आधारे राज्याच्या उपक्रमांची चर्चा होत आहे का, त्या दिशेने काही पावले टाकावी, त्या दिशेने राज्याला न्यावे, असे यात काहीही दिसत नाही. त्यामुळे आजचे आपले गव्हर्नमेंट हे ठिगळ लावणारे ठिगळबाज टेलर गव्हर्नमेंट किंवा रोजंदारी गव्हर्नमेंट असेच वर्णन करता येईल.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल हे आपल्या राज्याचे घटनात्मक प्रमुख आहेत आणि त्यांच्या भाषणाला एक वेगळे महत्व आहे. आताचे माननीय राज्यपाल श्री. के. शकरनारायणन् यांनी केरळमध्ये जी खाती सांभाळली त्या खात्यांमध्ये त्यांनी वेगवेगळे नवीन नवीन परफॉर्मन्स करुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

दाखविले अशा कर्तृत्ववान व्यक्तीला हे ठिगळ लावण्याचे काम सांगणे राज्यात चालू आहे ते पाहता खरोखरच क्षमतावान कर्तृत्ववान व्यक्तीला असे काही तरी मांडायला लागणे म्हणजे अभिभाषण वाचताना त्यांना काय वाटत असेल याची कल्पना केली तरी लक्षात येते. निवडणुकीच्या वेळी केलेल्या घोषणा आपण अंमलात आणत नाही. पण माननीय राज्यपालांचे भाषण जे आपण तयार करुन दिलेले आहे त्याचीही अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यामुळे गेल्या वर्षीच्या माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये..

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांना अडविण्याचा माझा उद्देश नाही परंतु माननीय राज्यपालांना मांडायला लावणे हा शब्दप्रयोग आपल्या दृष्टीने तितकासा योग्य नाही. कारण माननीय राज्यपाल स्वत: राज्याची पुढच्या एक वर्षाची दिशा मांडत असतात. त्यांना मांडावयास लावणे असा जो शब्द आहे तो कामकाजातून काढला पाहिजे.

उप सभापती : ठीक आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला असे वाटते की, ज्या पध्दतीने कॅबिनेटकडून भाषण जाते ते भाषण माननीय राज्यपाल मांडतात. मला असे वाटते की, मागच्या भाषणात ज्या घोषणा केल्या त्यातील काही घोषणा सांगतो. समतोल प्रादेशिक विकास साधणाऱ्या डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालातून मागास भागाच्या विकासाला नवीन रुपरेषा मिळेल असे म्हटले होते त्याचे काय झाले ? त्या संदर्भात यावेळच्या भाषणामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. प्रतिकुल हवामानामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी हवामानावर आधारित पीक विमा योजना सुरु केली आहे असे म्हटले होते. एकाही शेतकऱ्याला विम्याची मदत मिळालेली नाही.

आपले पत्र आहे. दादा, मी सर्व आपल्याला दाखवतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

डिसेंबर, 2012 अखेर राज्य भारनियमन करु असे आपण सांगितले होते. परंतु 2012 चे बारा वाजले आहेत. ई-मोजणी प्रकल्प राबविण्यात येईल असे जाहीर केले होते. जमीन मोजण्यासाठी आणलेली मशिन बंद आहे. नवीन अन्न चाचणी प्रयोगशाळा स्थापन करण्यात येत आहेत. परंतु एकही प्रयोगशाळा स्थापन झालेली नाही. मागील वर्षी ज्या घोषणा केल्या त्याचे काय झाले ? गेल्या वेळी वस्त्रोद्योग धोरणामुळे राज्यात नवीन 11 लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील असे जाहीर केले होते. यावेळी 21 हजार रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील असे सांगितले आहे. म्हणजे 11 लाखावरुन एकदम 21 हजारावर ही संख्या आली आहे.

2012 हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे करण्यासाठी अनेक योजना व उपक्रम हाती घेण्यात येतील असे नमूद केले होते. त्यासाठी परिसंवाद झाले, कार्यक्रम झाले. परंतु नवीन योजना व उपक्रम आंतरराष्ट्रीय सहकार वर्षामध्ये एकही घेण्यात आला नाही. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्म शताब्दी निमित्ताने सन 2012-13 या वर्षात 100 कोटी रुपये खर्च करण्यात येईल असे सांगण्यात आले. परंतु त्यातील काहीच रक्कम खर्च केलेली नाही. आता 1 मार्च रोजी काही रक्कम घाईघाईने खर्च केलेली आहे. त्यामुळे माननीय राज्यपालांच्या भाषणातून जे येते त्यापेक्षा प्रत्यक्षात चित्र वेगळे दिसते. त्यामुळे हे अभिभाषण सरकारच्या दृष्टीने महत्वाचे असते का की सोपस्कार, एक कर्मकांड किंवा रिचुअल उरकण्याचा प्रकार आहे ?

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी असा उल्लेख केला की, राज्यपालांच्या भाषणामध्ये दुष्काळ असा शब्द आलेला आहे. केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्ताव पाठवावा लागतो म्हणून त्या शब्दाचा समावेश केला जातो. कारण यापूर्वी शासनाने दुष्काळासंबंधी जी.आर.काढला होता तो रद्द करुन त्या जी.आर.मध्ये टंचाई असा शब्द समाविष्ट केला होता. राज्यपालांना भाषण करावयाचे होते. दि.22.8.2008 रोजी शासनाने जी.आर.काढला होता. त्यावेळी 123 तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केले होते. त्यामध्ये मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम यांचा पलूस कडेगांव, उप मुख्यमंत्री महोदय यांचा बारामती आणि मंत्री महोदय श्री.बाळासाहेब थोरात यांचा संगमनेर या तालुक्यांचा समावेश होता. परंतु त्यावेळी दुष्काळाचा जी.आर.रद्द करुन टंचाई असा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.विनोद तावडे....

शब्द घातला असेल तर राज्यपालांच्या अभिभाषणात तो शब्द येणे आवश्यक आहे की नाही ? त्यांचे अभिभाषण सरकारचे अधिकृत भाषण आहे की नाही ? राज्यपाल म्हणतात ते खरे की जी.आर.खरा आहे की ॲडव्होकेट जनरल म्हणतात ते खरे आहे असा प्रश्न आमच्यासमोर स्वाभाविकपणे निर्माण होतो. दिनांक 9.1.2013 रोजी नवीन जी.आर.आला त्यामध्ये 22.8.2008 रोजीच्या जी.आर.मधील दुष्काळ शब्द रद्द केलेला आहे. परंतु टंचाई जाहीर केलेली असताना त्यात 60 लक्ष मे.टन चाऱ्याची लागवड करु असे म्हटलेले आहे. दुष्काळ निवारणासाठी 3 लक्ष हेक्टर जमिनीवर चारा लागवडीचा कार्यक्रम घेणार असून त्याद्वारे 60 लक्ष मे.टनाचे उद्दिष्ट गाठू असे म्हटलेले आहे. सन 2012-13 मधील खरिपाच्या हंगामात गतिमान वैरण कार्यक्रमा अंतर्गत 111 प्रकल्प राबविले व रब्बीच्या हंगामात 259 प्रकल्प राबविले. त्यामुळे खरिपामध्ये 16.04 लक्ष मे.टन व रब्बीमध्ये 15.66 लक्ष मे.टन एवढे उत्पन्न केले म्हणजे 31.70 केले आहे. आता उन्हाळ्यामध्ये 8575 हेक्टर वर उरलेले 29.30 लक्ष मे.टनाचे उद्दिष्ट गाठू शकणार आहोत का ? खरीप आणि रब्बीचा आकडा हातामध्ये आला होता त्यावेळी असे जाहीर झाले की, उन्हाळ्यामध्ये लक्ष्य गाठता येणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

अभिभाषणामध्ये 60 लक्ष मे.टन चा-याचा उल्लेख केलेला आहे. हा चारा आपण निर्माण करणार नसाल तर माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे वास्तवाला धरुन आहे का असा प्रन आमच्या मनामध्ये निर्माण होतो. दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून मोफत हिराव्या चा-याचा उपक्रम राबवित आहात.

पुण्याजवळच्या एका कार्यक्रमाला श्री. माणिकराव ठाकरे गेले होते. तत्कालीन कृषी मंत्री श्री. बाळासाहेब थोरात हे देखील त्या कार्यक्रमाला आले होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी मोठी होर्डिंग्ज लावलेली होती. टी.व्ही.वरुन त्या कार्यक्रमाची जाहिरात दिली होती. माझे म्हणणे असे आहे की होर्डिंग्ज आणि टी.व्ही.वरील जाहिरातींसाठी जो पैसा खर्च केला जातो तो पैसा दुष्काळ निवारण्यासाठी खर्च करा.

सभापती महोदय, राज्यामध्ये ज्या मराठवाड्यात भीषण दुष्काळ आहे त्या मराठवाड्याचा उल्लेख अभिभाषणामध्ये नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मराठवाड्याच्या संदर्भात काही तरी उल्लेख असावा अशी सहाजिकच मराठवाड्यातील जनतेच्या अपेक्षा होत्या. परंतु एक चकार शब्दही अभिभाषणामध्ये आलेला नाही.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्याच्या योजनांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी 25 कोटी रु.ची तरतूद केली होती. या तरतुदी पैकी एक रुपया देखील खर्च करण्यात आला नाही. विंधण विहिरी घेण्यासाठी प्राप्त झालेल्या 155 कोटी रु. पैकी 96 कोटी रुपये अखर्चित आहेत. दुष्काळ असताना देखील पाणी पुरवठा योजनांसाठी दिलेला निधी अखर्चित आहे. पाणी पुरवठा खात्याला दिलेल्या 737 कोटी रु. पैकी 303 कोटी रुपये आजपर्यन्त खर्च झालेले नाहीत असे त्या खात्याचे मला पत्र आलेले आहे. हा निधी खर्च होत नाही याचा अर्थ आपल्या राज्यामध्ये दुष्काळ नाही. पाणी पुरवठा खात्याने निधी खर्च केला नाही. अशा पध्दतीने मंत्री महोदय त्यांच्या खात्याचा कारभार करीत असतील तर लोकांना पाणी कसे मिळेल ? या दुष्काळावर मात करण्यासाठी आपण सर्वजण कंबर कसून कामाला लागलो आहोत. परंतु ज्यांच्याकडे पैसे दिलेले आहेत त्यांच्याकडून ते खर्च होत नाहीत. या प्रकारे मंत्री महोदय काम करीत असतील तर राज्याचे पुढे काय होईल हा देखील प्रश्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, राज्यात महिलांवरील वाढत असलेले अत्याचार ही अत्यंत चिंतेची बाब आहे. भंडा-याचे प्रकरण गाजत आहे. त्या प्रकरणी वेगवेगळे अँगल्स आहेत, काही भावनिक आहेत तर काही क्रिमिनल आहेत. या सर्व गोष्टी जरी असल्या तरी एक महिना झाला तरी आरोपी सापडू शकत नाहीत हे पटू शकते काय ? एका फॉरेन्सिक लॅबचा रिपोर्ट एक आहे आणि दुस-या फॉरेन्सिक लॅबचा रिपोर्ट वेगळा आहे. यामुळे आपल्या राज्यातील जी व्यवस्था आहे तिच्या बद्दल अविश्वास निर्माण होतो. श्रीरामपूरची घटना असेल किंवा राज्यातील इतरही अन्य घटना असतील या घटना पाहिल्यानंतर फार काळजी वाटते.

आझाद मैदानामध्ये आलेल्या मोर्चाच्या वेळी महिला पोलिसांच्या झालेल्या विनयभंगाची दखल महिला आयोगामार्फत घेतली जाईल असे वाटले होते. परंतु महिला आयोगाला अध्यक्षच नाहीत.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

महोदय, महिला आयोगाचे अध्यक्षपद तातडीने भरले जाईल असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी नागपूर येथे अतिशय जोरात सांगितले होते. माननीय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी या विषयाच्या संदर्भा एकत्र बसावे आणि निर्णय घ्यावा. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी माझ्यामुळे अडले नाही असे परवा दूरदर्शनवर स्पष्टपणे सांगून टाकले. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांचे भाषण झाल्याबरोबर श्री.माणिकराव ठाकरे यांचा भ्रमणध्वनी वाजला. त्यांना सांगण्यात आले की, या बाबतीत प्रथम ठरु द्यावे. महाराष्ट्रात महिला विषयी अशा घटना घडत असताना महाराष्ट्रातील दोन प्रमुख नेत्यांना महिला आयोगासाठी अध्यक्ष चार वर्षापासून ठरविता येत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. असे असताना सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण आपण गप्प बसता हे बरोबर नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : या विषयाच्या बाबतीत मी रोज त्यांच्या मागे लागते. परंतु ते माझे म्हणणे ऐकत नाहीत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांना इतक्या हतबल झालेल्या मी माझ्या आयुष्यात कधीही पाहिलेले नाही. फायर ब्रॅंड चळवळीतल्या त्या कार्यकत्या आहेत. त्यांनी हातात विषय घेतला की, तो विषय त्या तडीस नेतात. राजीव गांधी सी-लींक रोडचे काम त्यांनी थांबविले.

उप सभापती : आपण सन्माननीय सदस्यां श्रीमती विद्याताई चव्हाण यांना आपण तडीपार करु नका.

श्री.विनोद तावडे : या विषयाच्या बाबतीत आज त्या अतिशय हतबल दिसून येत आहेत. त्यांना महिलांच्या विषयात इतके हतबल बघून मला आश्चर्य वाटते. माननीय मंत्री श्रीमती वर्षा गायकवाड यांच्याकडे जाऊन जेवण घेऊन काय उपयोग आहे. त्यांना महिला आयोगाचे अध्यक्ष नेमता येत नाही. मला वाटले की, तुम्ही महिला आमदारांनी त्यांच्या जेवणावर बहिष्कार घातला असेल. मला असे वाटते की, हे अधिवेशन संपण्याच्या आत महिला आयोगाच्या अध्यक्षपदी कोणाला तरी नेमा अशी माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

महोदय, पहिली महिला राष्ट्रपती महाराष्ट्राने दिली. पहिली महिला डॉक्टर महाराष्ट्रातील आहे असे असतानाही हे शासन चार वर्षे महिला आयोगावर अध्यक्ष नेमू शकत नाही ही खेदाची बाब आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे यांना विनंती आहे की, त्यांनी या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे.

महोदय, महिला व बालविकास विभागासाठी अर्थसंकल्पात किती निधी उपलब्ध करुन देतो. 2010-2011 या वर्षात या विभागाचा प्रत्यक्ष खर्च एकूण बजेटच्या 1.25 टक्के एवढा आहे. 2011-12 मध्ये 1.59 टक्के, 2012-13 मध्ये 1.61 टक्के एवढा खर्च आहे. या विभागास मिळणारा निधी पाहता फक्त महिला दिनाची घोषणा करुन भागणार नाही. शासनाचे सर्व उपक्रम होत असताना महिलांसाठी महिला दिनाची घोषणा करावयाची. महिलांचे प्रश्न सोडविण्या ऐवजी अशा प्रकारच्या घोषणा कार्यक्रमापुरत्या ठीक आहेत.

महोदय,स्त्रीभ्रूण हत्या रोखण्याच्या संदर्भात आरोग्य विभागाने ज्या गोष्टी केल्या पाहिजेत, त्या केल्या जात नाहीत असे माझे स्पष्ट मत आहे. स्त्रीभ्रूण हत्येसंदर्भात एवढया लोकांना अटक केली आहे. या अनुषंगाने मोठया प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे असे शासनाकडून सांगितले जाते. तपासणी केंद्राच्या बाबतीत ज्याला कोल्हापूर पॅटर्न मानला जातो त्यामध्ये मशिनमध्ये सायलेंट ऑब्झर्व्हर किंवा ॲक्टीव्ह ट्रॅकर नावाची संगणक प्रणाली बसविली पाहिजे आणि आपण सायलेंट ऑब्झर्व्हर बसविण्याचा निर्णय घेतला असताना त्याची अंमलबजावणी का झाली नाही, ती अंमलबजावणी होऊ नये म्हणून यामध्ये कोणती लॉबी सक्रीय आहे याचा खरोखरच शोध घेतला पाहिजे. ? ज्या जिल्ह्यामध्ये हे काम परिणामकारकपणे झाले आहे असे सर्व मान्यता देतात मग हे राज्यभर करण्यासाठी कोणती तरी विशिष्ट लॉबी हे होऊ नये यासाठी काम करते. हे पाहण्याची गरज आहे.

यानंतर श्री.भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, काल दुष्काळासंबंधी झालेली चर्चा आणि महाराष्ट्रातील वास्तव पाहिल्यानंतर एका बाजूला 45 ते 48 टक्के शहरीकरण होत असताना शहरातील जो गरीब वर्ग आहे त्याचा विचार खऱ्या अर्थाने समतोल आर्थिक विकास करण्यासाठी केळकर समिती नेमण्यात आली होती. त्या केळकर समितीच्या अहवालाचा मी शोध घेतला. अभिभाषणामध्ये प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी केळकर समितीचा उल्लेख केलेला आहे. केळकर समितीच्या अहवालाचा अभ्यास करण्यासाठी वेगळी समिती नेमण्यात आली आहे. अद्याप अहवाल आलेला नाही.

सभापती महोदय, मानव विकास मिशनचा उल्लेख अभिभाषणामध्ये केलेला होता. जागतिक बँकेकडून मिळणारी मदत असेल, केंद्र शासनाच्या वतीने देण्यात येणारी मदत असेल या सगळ्यांबाबत ह्युमन डेव्हलपमेंट इण्डेक्सचा आधार असतो. 2002 मध्ये प्रत्येक जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक अहवाल प्रकाशित झाल्यानंतर अद्यापर्यंत नवीन अहवाल प्रकाशित झालेला नाही. मानव विकास मिशनची घोषणा सर्वप्रथम 2006 मध्ये करण्यात आली. एप्रिल, 2011 मध्ये समिती स्थापन झाली, परंतु अद्याप त्या समितीचा अहवाल आलेला नाही. हा अहवाल न आल्यामुळे आपल्याला विकास करताना पुढे कोणत्या गोष्टींचा अडथळा उत्पन्न होतो आणि होणार आहे याचा विचार करता येत नाही. शासनाने स्वतंत्र मानव विकास मिशन अहवाल सहा महिन्यात सादर करणे अपेक्षित आहे. मागील बजेटच्या वेळी अहवाल येणे अपेक्षित होते. अद्याप तो अहवाल आलेला नाही. म्हणून अपेक्षा अशी आहे की, या मागास भागातील घटकांचा सर्वांगीण विकास करणे, 12 मागास जिल्हयातील 25 तालुक्यांची त्यासाठी निवड करण्यात आली. 2010-11 मध्ये राज्य शासनाने महाराष्ट्र मानव विकास मिशनसाठी 500 कोटी रुपयांची तरतूद केली. फक्त 25 तालुक्यांऐवजी सर्व जिल्हयातील 172 तालुक्यांचा समावेश यामध्ये करण्यात आला. त्यात तालुके घुसवले गेले. 500 कोटी रुपयांचा निधी मिळतो हे बघून मागास जिल्हयांबरोबर प्रगत जिल्हयांचा समावेश करण्यात आला. ही मागणी जोर धरु लागली. आपापला तालुका घुसवून टाकायचा प्रयत्न सुरु झाला. त्यामुळे तालुका हा घटक मानून मानव विकास निर्देशांकाचा विचार केला तर निश्चितपणे यश मिळू शकेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, मघाशी मराठवाडा आणि कोकणाचा उल्लेख झाला. कोकणासाठी आम्ही स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची आग्रही मागणी करीत आहोत. कोकणातील सिंचनाखालील जमिनीचे क्षेत्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील सिंचनाखालील जमिनीचे क्षेत्र यात प्रचंड तफावत आहे. एका बाजूला पुण्यामध्ये 6.91 लाख, सातारा 4.11 लाख, सोलापूर 6.40 लाख, कोल्हापूर 9.36 लाख, अहमदनगर 6.54 लाख, नाशिक 3.34 लाख आणि दुसऱ्या बाजूला ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या चारही जिल्हयांची आकडेवारी 3.06 लाख आहे. म्हणून कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करणे गरजेचे आहे. त्यासाठी अनेक दाखले देता येतील. कृषी पंप त्या भागात किती आहेत आणि कोकणात किती आहेत याची संख्या देता येईल. कोकणामध्ये एकूण कृषी पंपांची संख्या 78,945 असून पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हयांमध्ये 16.47 लाख आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती-जमातीच्या विकासाचा विचार झाला पाहिजे. बहुधा विरोधी पक्षाकडून या विषयाचा स्वतंत्र प्रस्ताव पुढील आठवड्यात चर्चेला येईल.

नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

सभापती महोदय,अनुसूचित जाती जमातीच्या विकासासाठी बजेटमध्ये जे पैसे दिले जातात त्याला वर्षाच्या शेवटी कसा कट लावला जातो याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. बजेटच्या वेळेस सामाजिक न्याय देणारे बजेट अशी घोषणा केली जाते परंतु वर्ष संपायला आले की, पहिला कट त्याच खात्याला लावला जातो.

सभापती महोदय, सन 2012-13 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय संशोधन केंद्र नागपूर यासाठी 1 कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते परंतु त्यासाठी तरतूद काहीच करण्यात आली नाही. अशा बऱ्याच गोष्टी माझ्या जवळ आहेत.

सभापती महोदय, मानव विकास निर्देशांकाच्या संदर्भात सन 2012-13 मध्ये अनुसूचित जाती जमातीच्या उपाययोजनाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या 5 कोटी रुपयांपैकी केवळ 74 लाख रुपयेच खर्च झाले. गेल्या 5 वर्षात 1650 कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिलेला आहे. खऱ्या अर्थाने आपण शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन या समाजाकडे जाता, त्यांची मते घेता व बजेटमध्ये शेवटी त्यांनाच कट लावता ? जर 1650 कोटी रुपये अखर्चित राहिले असतील तर आपण खरोखर या समाजासाठी काही करतो काय हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय,आदिवासींच्या विषयासंदर्भात वृक्ष तोड आणि विक्रीच्या संदर्भात नवीन नवीन सिस्टीम आणली गेली आहे. यामध्ये भ्रष्टाचाराची फार प्रकरणे आहेत. वृक्षांचे मूल्यांकन थेट आदिवासींना मिळाले पाहिजे यासाठी चेकने दिले जाते. परंतु सरकारी अधिकारी वृक्षांचे मूल्यांकन करीत असतांना ठेकेदारांना झुकते माप देतात व झाडांचे कमी मूल्यांकन करतात त्यामुळे यासंदर्भात आपण नवीन पध्दत आणली. आदिवासी आपला माल सरकारी डेपोवर नेतो तेव्हा त्याला योग्य किमत मिळाली तरच तो आपल्या मालाची विक्री करु शकतो. परंतु यामध्ये अधिकारी आणि ठेकेदारांनी मिळून पळवाटा काढल्या. जव्हार वन विभागाच्या उप वन संरक्षक कार्यालयाच्या पाठीमागे आदिवासी खातेदारांची सुमारे 44 पास बुके सापडली होती. ज्या आदिवासींची पासबुके सापडली ते आदिवासी तेथील नव्हते. वाडयाच्या आदिवासींची ती पासबुके होती. ज्यावेळेस खाते उघडावयाचे असते त्यावेळेस कोणाची तरी ओळख लागते त्यामुळे आदिवासी जर वाडयाचा असेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

तर वाडयाची कोणाची तरी ओळख लागेल. ज्या दिवशी आदिवासींचे बँकेत खाते उघडले जाते त्याच दिवशी म्हणजे दिवस संपण्याच्या आतच 2/3 रक्कम काढली गेल्याचे आढळून आले आहे.

सभापती महोदय, गडचिरोली येथील तरुणांना रोजगार मिळावा तेथील लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी तेथे पोलीस बटालियन स्थापण्याचा निर्णय घेतला. या बटालियनची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरु होईल तेव्हा ही बटालियन कोल्हापूर मध्ये आणली गेली. गडचिरोली येथे इंजिनिअरिंग महाविद्यालय तसेच वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतला होता परंतु ते सुध्दा गडचिरोलीच्या बाहेर गेले. गडचिरोलीमध्ये नवीन जे काही सुरु करावयाचे होते ते सर्व गडचिरोलीच्या बाहेरच गेले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)

श्री.विनोद तावडे...

मागास भागाची आपण कशी वाट लावत आहात त्याचे हे उत्तम चित्र आहे.

सभापती महोदय, मुंबई, पुणे, औरंगाबाद, ठाणे या शहरांसंबंधातील घोषणा आम्ही अभिभाषणामध्ये ऐकल्या आहेत. धारावीच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीब लोकांना घर देण्याचा विषय आम्ही ऐकला. गेल्या वर्षी चेंबूर ते गाडगे महाराज चौक मोनो रेल्वे आगामी वित्त वर्षात सुरू होईल अशी माननीय राज्यपालांनी घोषणा केली होती. वर्सोवा-घाटकोपर मेट्रो रेल्वेचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून जनतेकरिता खुला होत आहे. अशी घोषणा गेल्या वर्षी माननीय राज्यपालांच्या भाषणात आली होती. कुलाबा-वांद्रे,सिप्झ अशा भुयारी रेल्वे मार्गास लवकरच सुरूवात होणार आहे. बहुधा हा प्रकल्प शासन मागे घेण्याच्या तयारीत आहे असे दिसते. शहरातील सामान्य माणसाला वाहतुकीसाठी ज्या सुविधांची आवश्यकता आहे त्यातील किती सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत याचे प्रामाणिकपणे परीक्षण करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, धारावी पुनर्विकासाचा उल्लेख गेल्या वेळी होता. पण यंदाच्या भाषणात तो टाळलेला आहे. एसआरए चा उल्लेख होता तो देखील टाळलेला आहे. आपण दुष्काळावर चर्चा केली. मागासभागावर चर्चा केली. आदिवासी-महिलांवर आपण चर्चा केली. हवामान आधारित पीक विमा योजना यावर चर्चा केली. या योजने नुसार शेतकऱ्यांना मदत केली असे माननीय मंत्री श्री.गावित साहेब बोलून गेले. परंतु, विमा कंपन्यांनी संत्री, मोसंबी, डाळींबी, केळी या पिकांचे झालेले नुकसान पाहून हात वर केले. या वर्षीच्या अभिभाषणामध्ये हवामन आधारित पीक विमा योजनेचा उल्लेखच नाही. आपण केवळ घोषणाबाजी करीत आहात.

गेल्या वर्षी एक लाखा पर्यंतचे कर्ज शून्य व्याजाने देण्यात येईल असे सांगितले होते. तीन लाखा पर्यंतचे कर्ज 1 टक्के व्याजाने देण्यात येईल असे सांगितले. मला वाटले की, आता दोन लाखापर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याजाने दिले जाईल. मला असेही वाटले होते की, तीन लाखा पर्यंतचे कर्ज अर्ध्या टक्के व्याज दराने देण्यात येईल. पण एक टक्क्या ऐवजी आपण दोन टक्क्याने व्याज देण्याचे ठरविले आहे. यात प्रगती आहे. यातून काही तरी प्रोग्रेसिव्ह मिळायला पाहिजे ते मिळत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

कोरडवाहू शेती अभियानाची घोषणा आपण डिसेंबर 2011 मध्ये केली. माननीय मुख्यमंत्र्यांनी तीन महिन्यामध्ये ही योजना सुरू करू अशी घोषणा केली. डिसेंबरचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी आपण 4 तारखेला पहिले पैसे निर्गमित केले. कोरडवाहू शेती अभियान अंतर्गत आपण दहा हजार कोटी रूपयांचा निधी खर्च करणार आहात. सन 2012-13 मध्ये 200 कोटी खर्च करणार आहात. त्यापैकी 50 कोटी रूपयांचा कार्यक्रम आपण 4 डिसेंबर 2012 रोजी जाहीर केला. घोषणेप्रमाणे या वर्षासाठी 2000 कोटी रूपये येणे आवश्यक होते. दुदैर्वाने तो निधी आलेला नाही. त्यामुळे कोरडवाहू शेतीसाठी काही तरी आपण करणार आहात काय ? असा प्रश्न उभा राहतो.

आपण स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे केले. गेल्या वर्षीच्या अभिभाषणामध्ये नमूद केले होते की, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व.श्री.यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने या वर्षामध्ये माझे शासन चर्चा सत्र, व्याख्यान माला, प्रदर्शन आयोजित करून माननीय यशवंतराव चव्हाणांचे विचार सर्वत्र कळविण्यासाठी कार्यक्रम, उपक्रम आयोजित करेल. यासाठी लगेच राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये 100 कोटी रूपयांची तरतूद देखील केली.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

ही रक्कम 100 कोटी रुपयांऐवजी 200 कोटी करावी असे आम्ही म्हटले होते. परंतु आपण 100 कोटी रुपयांची घोषणा केली. आपण ही तरतूद केल्यानंतर कोणते उपक्रम राबविले ?

सभापती महोदय, दिनांक 24 जानेवारी रोजी मी, सामान्य प्रशासन विभागाला पहिले पत्र पाठवून विचारले की, किती रुपये खर्च झालेला आहे. सामान्य प्रशासन विभागाने एकही पैसा खर्च झालेला नाही असे मला कळविले. त्यानंतर दिनांक 2 फेब्रुवारी रोजीच्या पत्रान्वये स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी निमित्त कोणकोणते कार्यक्रम करण्यात आले व कोणते कार्यक्रम घेण्यात येणार आहेत याची मी माहिती मागितली. तसेच त्यासाठी किती निधी खर्च झाला याची देखील माहिती मागितली. त्यानंतर स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर आधारित प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या प्रती मुद्रित करुन त्या खर्चाचे बिल मंजुरीसाठी गेले. परंतु अर्थखात्याने ते बिल मंजूर केले नाही. त्या प्रती कुठे वितरित केल्या हे दाखवा असे सांगितले. पण त्यांना त्या दाखविता आल्या नाहीत. ते पैसे रिलिज झाले नाहीत.

सभापती महोदय, दिनांक 14 फेब्रुवारी रोजी आणखी एक पुस्तक काढले. शेवटी 1 मार्च रोजी पत्रक काढले त्यामध्ये नागपूर-नाशिक-औरंगाबाद-कराड येथे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील मुलींसाठी 200 प्रवेश क्षमतेचे प्रत्येकी एक वसतिगृह बांधण्यासाठी 24 कोटी रुपये दाखविण्यात आले. सातारा येथे जिल्हापरिषदेमार्फत 1200 क्षमतेचे सभागृह बांधण्यासाठी 10 कोटी रुपये, सातारा सैनिक स्कूल येथे एनडीए ब्लॉक बांधण्यासाठी 5 कोटी रुपये, कराड जिल्हा सातारा येथे 2 कोटी रुपये, देवराष्ट्रे कडेगाव येथे 31 कोटी रुपये, राजराम मार्ग कोल्हापूर येथे 5 कोटी रुपये, कराड - जिल्हा सातारा येथे 11 कोटी रुपये दाखविण्यात आले. यशवंतराव चव्हाण जेव्हा दिल्लीला संरक्षण मंत्री म्हणून गेले तेव्हा त्यांचे वर्णन "हिमालयाच्या रक्षणासाठी सहयाद्री गेला" असे करण्यात आले होते. पण सह्याद्रीच्या फक्त चार जिल्ह्यांमध्ये त्यांचे स्मृती कार्य आपण अडकवले.

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांनी राजकीय व्यवस्थेतून समाजातील सर्व क्षेत्रे उभी करता येतात हे त्यांनी आपल्या कार्यशैलीतून सिध्द केले. मग त्यांनी कल्याणी यांना उद्योगामध्ये आणले. सांस्कृतिक खाते प्रथम महाराष्ट्रात सुरु झाले त्यानंतर इतर राज्यांमध्ये सुरु झाले. त्यांनी नवीन पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी अशा गोष्टींची सुरुवात केली. पोलीटिकल सिस्टीम

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

ही समाजाची व्यवस्था उभी करण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावते हे त्यांनी एका बैठकीत मांडले. पण दुर्दैव असे की, त्यांचे राजकीय वारसदार म्हणविणाऱ्यांनी यातील प्रत्यक्षात काहीही केलेले नाही.

सभापती महोदय, आबांना केलेल्या घोषणा अमलात आणण्यासाठी दादांनी काही तरी केले पाहिजे. सन 2010-201 मध्ये महात्मा गांधी तंटामुक्ती योजनेंतर्गत विदर्भातील जिल्ह्यांना 26 कोटी 35 लाख रुपयांचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्या संदर्भात फोटो वगैरे काढण्यात आले. वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर त्यांचे फोटो झळकले. दादा आपले फोटो वर्तमानपत्राच्या आतल्या पानावर येतात. पुरस्काराची घोषणा करुन वर्ष झाले परंतु अजून काही झाले नाही. पुरस्कार मिळाल्याची पाटी गावात लावली जाते. परंतु प्रत्यक्षात त्यांच्या पर्यंत पुरस्कार पोहोचत नाही. आपण त्यांची फसवणूक करीत आहोत काय ? या ठिकाणी आबा उपस्थित झाले आहेत मी त्यांना आपल्यामार्फत विचारु इच्छितो की, महात्मा गांधी तंटामुक्त योजनेतील पैसे मिळाले नाहीत म्हणून जो तंटा झाला त्यासाठी नवीन योजना घोषित केली आहे काय ? की दादा आपणास पैसे देत नाहीत ते सांगा,.. आबांचा परफार्मन्स दिसू नये म्हणून दादांचा हा कट आहे हे बरोबर नाही. ते दे देणादण नवीन बिन पैशाच्या योजना करतात. सर्व वर्तमानपत्रात, सर्व चॅनेल्सवर इतका वेळ दिसणे म्हणजे त्या तुलनेत 26 कोटी रुपये म्हणजे काहीच नाही..

यानंतर श्री.बोर्डे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.विनोद तावडे....

महोदय, कॅश फॉर सबसिडीबाबत, आधार कार्डबाबत काल भरपूर चर्चा झाल्यामुळे मी आता त्यावर काही बोलत नाही.

महोदय, माननीय वन मंत्री डॉ.पतंगराव कदम या ठिकाणी नाहीत. त्यांच्या वन विभागाच्या माध्यमातून चालू पंचवार्षिक योजनेमध्ये 100 कोटी झाडे लावली जाणार आहेत. भौगोलिक क्षेत्राच्या 33 टक्के भाग वनाच्छादित होण्यासाठी त्यांनी हा निर्णय घेतलेला आहे. माननीय वन मंत्र्यांनी केलेल्या घोषणेला अनुसरुन प्रत्यक्षात किती वृक्ष लागवड झाली याची माहिती मी घेतली. महोदय, रायगड जिल्ह्यात 24 जानेवारी पर्यंत दिलेल्या टार्गेटच्या 60 टक्के लागवड झाली होती. परंतु 24 फेब्रुवारीला 60 टक्के असलेली वृक्ष लागवड 129 टक्क्यांवर पोहोचली. याचाच अर्थ एका महिन्यात 69 टक्के वाढ झाली. जालना येथे 24 जानेवारीपर्यंत 20 टक्के वृक्ष लागवड झाली आणि 24 फेब्रुवारीला ती 85 टक्क्यांवर गेली. मला प्रश्न पडतो की, एवढी झाडे लावली जात असताना आपण दुष्काळ असल्याचे चुकीचे सांगता काय ?कारण झाडे जगविण्यासाठी पाण्याची गरज असते.

औरंगाबाद येथे 24 जानेवारीपर्यात 48 टक्के वृक्ष लागवड केली होती, ती 24 फेब्रुवारीला 68 टक्क्यांवर गेली. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात वृक्ष लागवडीचा मुद्दा आल्यानंतर सन्माननीय सदस्यांकडून टाळ्या वाजवून अभिनंदन केले गेले. महोदय, बीड येथे 24 जानेवारी पर्यंत 53.84 टक्के वृक्ष लागवड झाली होती आणि 24 फेब्रुवारीला ती 114 टक्क्यांवर गेली. धाराशीवला 24 जानेवारी पर्यंत 62 टक्के होती आणि 24 फेब्रुवारीला ती 101 टक्क्यांवर गेली. तसेच लातूरला 24 जानेवारी पर्यंत 54 टक्के होती आणि 24 फेब्रुवारीला ती 106 टक्क्यांवर गेली. बुलढाणा येथे 24 जानेवारी पर्यंत 64 टक्के वृक्ष लागवड झाली होती आणि 24 फेब्रुवारीला ती 85 टक्क्यांवर गेली. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या भीतीमुळे त्यांचा विभाग जिकडे तिकडे झाडेच झाडे लावत आहे असे मला वाटते. त्यामुळेच दुष्काळी परिस्थितीत करावयाची कामे बाजूला पडली आहेत.

महोदय, या राज्य सरकारच्या वतीने उद्योग धोरण जाहीर केले गेले. त्यावर आम्ही नंतर चर्चा करु. मला वाटते आमच्या पेक्षा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सदस्य त्यावर जास्त बोलतील. महोदय, राज्यात विशाल प्रकल्प आणण्यात आले आहेत. ते राज्यात आणावेत या बाबत शंका नाही. परंतु ते कोणत्या भागात आणावे आणि त्यांना किती प्रकारचे प्रोत्साहन द्यावे या बाबत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

कोठे तरी बॅलन्स ठेवला पाहिजे. आज पुणे, नाशिक, नागपूरमध्ये टाटा मोटर्स, मर्सिडीज, फॉक्स वॅगन इ. उद्योग आले आहेत. त्या ठिकाणच्या उद्योजकांना सरकारने 3,209 कोटी रुपयांची सबसिडी दिली आहे. उद्योजकांना जर एवढ्या मोठ्या प्रमाणावर सबसिडी दिली जात असेल तर त्यांच्याकडे नीट विकास करण्याचा आग्रह धरावयास पाहिजे नको काय ? मी तर म्हणेन की, यासाठी त्यांना अधिकची 50 कोटी रुपयांची सबसिडी दिली तरी चालेल.

महोदय, नागपूर जिल्ह्यात नॅशनल इन्व्हेस्टमेट अँड मॅन्युफॅक्चरींग झोन आहे. तेथील 23 गावातील खाजगी क्षेत्रातील 5,684 हेक्टर आणि सरकारी क्षेत्रातील 336 हेक्टर जमीन संपादन करण्याचा सुधारित प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यात आला होता. परंतु त्यातून कुही तालुक्यातील अकोली, माळणी अशा गावांत एक हेक्टर जमिनीचे सुध्दा संपादन झालेले नाही.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

माननीय आरोग्य मंत्री श्री. सुरेश शेट्टी साहेब या ठिकाणी उपस्थित आहेत. आरोग्य खात्याच्या बाबतीत मला एक कन्फ्युजन आहे. राजीव गांधी जीवनदायी योजनेची आकडेवारी आपल्या खात्याकडून मिळाली त्यानुसार डिसेंबर अखेरपर्यंत राज्य शासनाने तीन हप्त्यामध्ये 137 कोटी 58 लक्ष रुपये एवढी रक्कम विमा कंपन्यांकडे भरली आहे आणि त्या बदल्यात कंपन्यांनी आता 10 मार्च पर्यंत 76 कोटी 67 लक्ष रुपयांची रुग्णालयाची प्रतिपूर्ती केलेली आहे. आपण 137 कोटी रुपये भरले आणि त्यांनी आपल्याला 76 कोटी रुपये दिले. म्हणजे 61 कोटी रुपये इतका अतिरिक्त खर्च राज्य शासनाने विमा कंपन्यांवर केल्याचे दिसते. यामध्ये नेमकी काय परिस्थिती आहे. डिसेंबरमध्ये जर पुढचा एक क्वार्टर ॲड केला तर आपला हप्ता पण वाढणार आहे आणि ऑपरेशन्स सुध्दा वाढतील. पण ते जरी वाढले तरी हा जो डेफिसिट दिसतो त्याबाबत सांगितले पाहिजे. नॉर्मली आपण विम्यामध्ये जे पैसे घालतो त्याच्या काहीपट अधिक फायदा त्यातून आला पाहिजे पण प्रत्यक्ष या सर्व योजनेमध्ये तसे दिसत नाही. परवा माननीय राज्यपालांनी त्यांच्या भाषणामध्ये डेफिशियन्सी डिसऑर्डर डिसॲबिलिटी डिसीज या बालस्वास्थ्य कार्यक्रमाची जी घोषणा केली खरेच प्राथमिक स्तरावर हे सर्व कार्यक्रम राबविण्याची आपली तयारी आहे का ?

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी भारतरत्न पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाबद्दल उल्लेख केला आणि बोलता बोलता चुकून आम्ही ॲग्रीमेंट केले असे ते म्हणाले. आपण जे बोललात तसे कोणी तरी अधिकारी बोलले होते. त्यांना दुसरे एक अधिकारी म्हणाले की, जमीन घेतली असे म्हणू नकोस, आता फक्त संमती घेतली एवढेच म्हण. अजून काहीही आपल्या हातामध्ये आलेले नाही. म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणासाठी बनविलेली नोट आपण पुन्हा बदलली की नाही हे सांगावे. 6 डिसेंबरला सर्वांचा दबाव होता, आनंद आंबेडकर, रामदास आठवले आणि इतर सर्वांचा दबाव होता म्हणून ते घाईघाईत केले. पण प्रत्यक्ष त्यानंतर हस्तांतर करुन घेण्यासाठी जे काही करावयास पाहिजे होते ते आपण केले नाही. त्यामुळे मग केवळ माझ्या सरकारने संमती मिळविली हे 6 डिसेंबरचे वाक्यच पुन्हा आपल्याला काल ऐकावयास मिळाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबद्दल काल चर्चा झालेली आहे. हे खरे आहे की, त्या विषयामध्ये माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांनी जागा शोधून आणली. केंद्राकडे जो एमसीझेडएमए आहे त्यांच्याकडे आपला अर्ज गेला आहे एवढेच समोर आले आहे. यातील ज्या गोष्टी आणखी घाईने व्हावयास पाहिजेत ती गती यामध्ये दिसत नाही. हे यातील वास्तव आपण मान्य केले पाहिजे. त्यातील दुसरी गोष्ट मला कळली नाही. नागपूरच्या बैठकीमध्ये एक समिती माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांची आणि दुसरी मराठा आरक्षणाच्या बाबतीत माननीय मंत्री श्री. नारायण राणे साहेबांची समिती या दोन गोष्टी ठरल्या होत्या. तसे सांगितले गेले. त्या बैठकीचे अधिकृत मिनिट्स आले. श्री. राणे साहेबांची कमिटी अजून का गठीत झाली नाही ? मग मराठा आरक्षणाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांचे काही चुकते का ? श्री. जयंत पाटील यांची म्हणजे राष्ट्रवादीच्या कोट्यातील कमिटी लगेच गठीत झाली. आमच्या कोकणातील बिचारे राणे दादा, त्यांची तर घाटावरील दादासारखी वट नाही. माननीय सभापतींच्या बैठकीत मराठा आरक्षणाबाबत ही समिती गठीत करण्याचे ठरले पण ती समिती गठीत होत नाही. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हक्कभंग आणतात. त्यांना दादा झापतात. म्हणजे आपण दम दिला तर चालतो आणि त्यांनी दम दिला तर चालत नाही का ? काल सर्व पक्षाचे आमदार जमले होते. या बाबतीत नेमकी काय परिस्थिती आहे हे सन्माननीय सदस्य विनायक मेटे सभागृहात आता उपस्थित असते तर त्यांनी सांगितले असते. इतके बोलण्याची आपली कोणाची हिंमत तरी आहे का ? आपापसात भांडत बसता म्हणून मराठा आरक्षण होत नाही.

सभापती महोदय, आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचा उल्लेख मी मघाशी केला. जी 97 वी घटनादुरुस्ती व्हावयास पाहिजे ती शेवटी आपल्याला अध्यादेशाच्या माध्यमातून करावी लागली. ही किती नाचक्की आहे ? इतकी वर्षे ते पडले आहे. कोठे तरी चर्चा करता आली असती, वेळ देता आला असता, त्यातून स्पेशल काही तरी करता आले असते पण आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात सुध्दा आपण काही करु शकलेलो नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी विकलांगता निवृत्तीवेतन योजना या सर्व योजना वरिष्ठ नागरिकांसाठी राबविल्या आहेत. आतापर्यंत 19 लाख लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळाला असल्याचे अभिभाषणात नमूद केलेले आहे. परंतु यामध्ये 100 कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याची कागदपत्रे लोक देत आहेत, तोंडी सांगत आहेत. त्याची चौकशी होणार आहे की नाही ?

विभागीय आयुक्तांनी याचा चौकशी अहवाल दिलेला आहे. त्या अहवालात 101 कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नमूद केलेले आहे. 8.9 कोटी रुपये कोकण विभागात, 90 लाख रुपये नाशिक विभागात, 1.47 कोटी रुपये पुणे विभागात, 14 कोटी रुपये नागपूर विभागात, 10 कोटी रुपये अमरावती विभागात आणि 67 कोटी रुपये औरंगाबाद विभागात बोगस लाभार्थ्यांवर खर्च झालेले आहेत. हा अहवाल सादर झालेला असतानाही शासनाकडून कारवाई केली जात नाही. या घोटाळ्यामागे कोण मंत्री आहेत ? जे सत्य आहे ते बाहेर येऊ द्यावे. हा भ्रष्टाचार थांबविला जाणार आहे की शासन केवळ घोषणा करणार आहे ? नवीन योजना फुकटचे पैसे वाटण्यासाठी सुरु होणार आहेत का ? एका बाजूला दुष्काळासाठी पैसे नाहीत म्हणून विकासाच्या कामांना कट लावला जातो. शासनाच्या तिजोरीत पैसा जमा होण्यासाठी बाकीच्या गोष्टींवर कर लावावयाचा. दुसऱ्या बाजूला भ्रष्टाचाराबाबत अहवाल सादर होऊनही कारवाई केली जात नाही. सरकारची प्रतिमा केवळ सरकारच्या प्रमुखावर अवलंबून राहत नाही तर सरकारमधील टीमवरुन सरकारची प्रतिमा ठरत असते. याची काळजी शासनाला घ्यावी लागेल.

मागील दोन वर्षी ई-गर्व्हनन्सच्या घोषणा राज्यपालांच्या अभिभाषणात झाल्या आहेत. रेशनिंग कार्ड धारकांचे संगणगीकरणाचे काम सुरु झाले. हे काम प्रथम स्पॅनकोला दिले, नंतर ते काढून घेण्यात आले. या कंपनीला कोणकोणती कामे दिली जातात ते मला समजत नाही. कधी विजेची कामे दिली जातात, कधी संगणकीकरणाचे काम दिले जाते तर कधी मंत्रालयाचे काम दिले जाते. त्यानंतर पुण्याच्या सायन्स ॲण्ड टेक्नोलॉजी मिशन या कंपनीला दिले. त्यांनीही यातून अंग काढून घेतले. शेवटी सुप्रीम कोर्टाच्या आदेशामुळे संगणकाद्वारे रेशनिंग कार्डधारकांच्या डाटा एन्ट्रीचे काम सुरु केलेले आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सीमा तपासणी नाक्यांचे संगणकीकरण करण्याचे काम केले जाईल असे घोषित केले होते. या कामामध्ये काही लोक जाणीवपूर्वक मुद्दाम उशीर करीत आहेत हे आपल्यालाही माहीत आहे. हे आपण अनुभवत आहात. 7 वर्षांपासून केलेल्या केवळ ह्या घोषणा आहेत. 22 तपासणी नाक्याचे संगणकीकरण करण्याची शासनाची संकल्पना आहे. हे काम केव्हा होणार आहे ? यासंबंधी आपले बोलणे झाले होते त्यावेळी काही लोकांना पैसे खाण्यासाठी मिळणार नाहीत म्हणून लोक विरोध करीत आहेत असे समजलेले आहे. या गोष्टी घाईने करण्याची गरज आहे.

राज्यात ई-मोजणी केली जाणार आहे. ई-मोजणी म्हणजे केवळ प्लॅनेटेबल होत आहे. टोटल स्टेशन मशिनद्वारे जे पाहिजे ते होत नाही. आता शासन ई-मोजणी बाबत बोलत आहे ती त्या पध्दतीने होणार आहे काय ? शासनाने खरेदी केलेल्या टोटल स्टेशन मशिन वापराविना पडून आहेत. त्या मशिन्स मी स्वत: पाहून आलो आहे. त्या मशिन दुरुस्त करुन जलद गतीने मोजण्यासाठी वापरल्यास खऱ्या अर्थाने ई-गर्व्हनन्स सिस्टिम वापरल्यासारखे होईल.

राज्यात गुटखा बंदी आहे. पुण्यातील काँग्रेस पक्षाच्या एका नेत्याने एका पत्रकारांच्या अंगावर ॲसिड फेकले आहे. राज्यात गुटखा बंदी केल्यावरही गुटखे सापडत आहेत. सापडलेल्या गुटख्याची बॅच कोणत्या फॅक्टरीतून आली ? त्याची कोणाला डिलिव्हरी दिली होती, ती कोणाकडून आली होती ? परंतु या विषयाबाबत शासनाकडून असे उत्तर दिले जाते की, रेल्वे खात्याकडून आम्हाला मदत मिळत नाही. रेल्वे पोलीस त्यांच्याशी मिळालेले आहेत. आम्हाला यातील काहीच कळत नाही. पोलीस धाड घालण्यासाठी जातात आणि सापडलेले गुटख्याचे खोके घेऊन येतात. परंतु त्यानंतर कोणती कारवाई केली जाते ? म्हणजे गुटख्याची बॅच ज्या माणसाकडून ज्या ट्रान्सपोर्टकडे दिली होती ती दुसरीकडे गेली. याचा अर्थ तो रॅकेटमध्ये आहे. मूळ मुद्दा असा आहे की, त्या गुटखा कंपनीविरुध्द पोलिसांनी केस दाखल केली आहे का ? अशी कारवाई होत नाही, मालकापासून सर्वांची मिलीभगत आहे. गुटख्याचे परिणाम आपण आपल्या राज्यात पहात आहोत. जोपर्यंत प्रत्यक्ष त्या कंपनीवर केस दाखल करीत नाही तोपर्यंत शासनाला मनापासून गुटखा थांबवावयाचा आहे असे दिसणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धलिपि प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री. विनोद तावडे...

कारण राज्याच्या अधिका-यांनी साडेसहा कोटीचा गुटखा जप्त केला असे वृत्तपत्रातून छापून आले आणि काल पूर्णाला दिनेश चौधरी या वार्ताहराच्या अंगावर ॲसिड फेकण्यात आले. म्हणजे गुटखा माफिया हे किती मुजोर झालेले आहेत हे त्याचे एक उदाहरण आहे. यासंबंधी शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण सुरु असताना आपण संसदेमध्ये बसलो आहोत की काय असे वाटू लागले. कारण या अभिभाषणामध्ये ज्या ज्या योजनांचा उल्लेख करण्यात आलेला आहे त्या सर्व केन्द्राच्याच योजना आहेत. मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ साहेब समोर बसलेले आहेत. त्यांना दिल्लीला पाठविण्याच्या मूडमध्ये माननीय श्री. अजितदादा पवार हे आहेतच. माननीय मुख्यमंत्री हे बरीच वर्षे दिल्लीमध्ये होते त्यामुळे ते दिल्लीतीलच वाटतात. आपण सर्वजण संसदेत बसलो आहोत आणि राज्यपालांऐवजी राष्ट्रपतींचे भाषण आहे असे वाटायला लागले. राष्ट्रीय कृषी विकास योजनेमध्ये काय करणार, राष्ट्रीय कृषी विमा योजनेमध्ये काय करणार, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेमध्ये काय करणार हे अभिभाषणामध्ये सांगितलेले आहे.

या अभिभाषणामध्ये राज्याच्या योजनांचा उल्लेख नाही. केन्द्राच्या योजनांवर किती दिवस जगणार ? आपल्या पायावर आपण उभे राहायला नको का ? अभिभाषणामध्ये नॅशनल मिशन ऑन फूड प्रोसेसिंग राबविणार की नाही याचा उल्लेख नाही. या दशकात सकल राष्ट्रीय उत्पन्नात वस्तूनिर्माण क्षेत्र 25 टक्क्यापर्यन्त वाढविण्या संबंधीचा उल्लेख व्हावयास पाहिजे होता. पण तो उल्लेख झालेला नाही. ज्या गोष्टीमध्ये महाराष्ट्र कॉण्ट्रीब्यूट करील अशा गोष्टींचा राष्ट्रपतींनी त्यांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख केला त्या गोष्टींचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमावर भर देण्याकरिता असलेल्या आयटीआयची संख्या दुप्पट करण्यात येईल असा उल्लेख नाही. नॅशनल ऑप्टीकल फायबर योजनेद्वारे खेडी जोडण्यात येतील असे राष्ट्रपतींनी त्यांच्या अभिभाषणामध्ये सांगितले. त्याबाबतीत राज्याचे टारगेट काय आहे याचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. या पंचवार्षिक योजनेमध्ये 87 लक्ष हेक्टर जमीन ॲआयबीपी अंतर्गत सिंचनाखाली आणायची आहे. परंतु याचा अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख नाही. अडकलेले पैसे लवकर कधी परत येतील याचा अभिभाषणामध्ये उल्लेख नाही. या राज्यपालांच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

संपूर्ण अभिभाषणामध्ये आपले राज्य कुठेतरी पुढच्या 6 महिन्याचा विचार करीत आहे असे वाटत नाही. ज्या प्रमाणे रोजंदारीवरील कामगार काम करतो त्याप्रमाणे रोजंदारीवर काम करणारे हे सरकार असल्याचे या अभिभाषणावरुन पाहावयास मिळाते म्हणून खेद व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे अभिभाषण चाळत असताना मला एक वैशिष्टय दिसून आले की या अभिभाषणामध्ये 88 मुद्दे आहेत. त्यापैकी 63 मुद्दे काँग्रेसच्या खात्याचे आहेत आणि 23 मुद्दे फक्त राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. मला खेद होतो की, माननीय राज्यपाल महोदय हे महाराष्ट्रात फिरले नाहीत म्हणून केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरदजी पवार यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे राज्यपाल महोदयांनी राष्ट्रवादी काँग्रसकडे असलेल्या खात्यांचे मुद्दे कमी केले का अशी शंका येते. या संपूर्ण अभिभाषणामध्ये मला काँग्रेसचाच प्रभाव दिसला. मी केवळ तीन-चार मुद्दे मांडून 5 मिनिटामध्ये मी माझे विचार संपविणार आहे.

सभापती महोदय, दळी भागातील आदिवासींच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्याचा मुद्दा गेली दोन वर्षे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये येत होता. तो मुद्दा मला यावेळच्या अभिभाषणामध्ये कुठे दिसला नाही.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

अजून पर्यंत आदिवासी भागातील दळी जमिनी त्यांच्या नावावर होण्याची प्रक्रिया ज्या गतीने व्हावयास पाहिजे, त्या गतीने होताना दिसून येत नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात खंडकरी शेतकऱ्यांचा उल्लेख आहे. कोल्हापूर जिल्हयातील करवीर तालुक्यात खंडकरी शेतकरी आहेत, त्यांना जमीन देण्याची तयारी राज्य शासनाने दाखविलेली आहे. या ठिकाणच्या खंडकरी शेतकऱ्यांना ज्या जमिनी दिल्या जाणार होत्या, त्या शहरालगतच्या आहेत. त्या जमिनींचा भाव आता दामदुपटीने वाढला आहे. त्या जमिनी न देता महसूल विभाग या खंडकरी शेतकऱ्यांना पर्यायी जमिनी देत आहे. ही गोष्ट अत्यंत चुकीची आहे. जी त्यांच्या हक्काची जमीन होती, ते त्या जमिनी कसत होते, तीच जमीन खंडकरी शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे. परंतु त्या खंडकरी शेतकऱ्यांना कसत असलेल्या जमिनी त्यांना न देता त्यांना दुसऱ्या ठिकाणी पर्यायी जमीन देण्याचा महसूल विभागाचा मानस आहे तो अत्यंत चुकीचा आहे, या गोष्टीचा मला अतिशय खेद होतो आहे.

सभापती महोदय, विना अनुदान तत्वावरील शाळांचा "कायम" शब्द काढण्यात आला आहे. परंतु त्या शाळा अनुदानावर काढण्यासाठी राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दिसून येत नाही, त्या बद्दलही मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी या ठिकाणी माननीय गृहमंत्र्यांचे अभिनंदन करतो. गेल्या अधिवेशनात बैलगाडयांच्या स्पर्धावर बंदी घालण्यात आली होती. मी या सभागृहात सांगितले होते की, रेस कोर्स अनेक मोठे भांडवलदार घोडयांवर पैसे लावून शर्यती खेळतात. त्या शर्यतीवर बंदी नाही. बैलगाडयांच्या स्पर्धा गेल्या 500 वर्षापासून सुरु होत्या, त्या स्पर्धा बंदी आणून खंडीत करण्यात आल्या होत्या. माननीय गृहमंत्र्यांनी बैलगाडयांची स्पर्धेवरील बंदी उठविली, त्याबद्दल मी माननीय गृहमंत्र्यांचे अभिनंदन करतो. या संदर्भात आम्ही सुप्रीम कोर्टात केस दाखल केली होती. त्या केसच्या संदर्भात कोर्टात पूरक आणि सपोर्टींग असे राज्य शासनाने घोरण घेतले. त्यामुळे महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने मी महाराष्ट्र शासनाचे पुन:श्च अभिनंदन करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांनी जिल्हा परिषदा स्थापन करण्याचा निर्णय घेतला. माझा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना ग्रामीण सचिवालय म्हणून त्यांचा उपयोग होईल, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सचिवालयात यावे लागणार नाही अशी ठामपणे घोषणा केली आणि सत्तेचे विकेंद्रीकरण केले. सभापती महोदय, आज काय परिस्थिती आहे. या राज्याच्या जिल्हा परिषदेची 30(54) ची ग्रँट ग्रामीण विकास विभागाने अडवून ठेवली आहे. आज ग्रामीण भागात रस्ते चालण्यासाठी नाहीत. 900 कोटी रुपये ग्रामीण विकास विभागाने अडवून ठेवलेले आहेत. तुम्ही राज्य करा, परंतु आमच्या भागातील खड्ड्यांचे काम तरी करा. खंड्डे भरण्यासाठी जी यंत्रणा आहे, त्याचे पैसे कसे द्यावयाचे. राष्ट्रवादी पक्षाची पंचायत समिती असेल त्यांनाच पैसे देणार ? कॉग्रेस पक्षाची पंचायत समिती असेल तर त्या पंचायत समितीला बाजू ठेवणार. हे यशवंतराव चव्हाणांना अभिप्रेत नव्हते. यशवंतरावांनी सत्तेचे विकेंद्रीकरण केले, त्यांना या गोष्टी मुळीच अभिप्रेत नव्हत्या. परंतु आता विकेंद्रीकरणाचे आता केंद्रीकरण होत आहे. ते थांबविले गेले पाहिजे. माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब, आपण ग्रामविकास मंत्री होते, त्यावेळी ग्रामीण स्वच्छता अभियान, तंटा मुक्ती इत्यादी योजना आपण सुरु केल्या. त्या योजना ग्रामीण अजूनही चांगल्या प्रकारे सुरु आहेत.

सभापती महोदय, आता शेवटच्या आठ दिवसात काय होणार आहे. तुम्हाला जे पूरक असतील अशाच लोकांना निधीचे वाटप केले जाईल. अशा प्रकारची वाटप पध्दती थांबली पाहिजे. परंतु याबाबतचा उल्लेख मला या अभिषाणात कोठेही दिसून येत नाही याचा मला खेद होतो.

सभापती महोदय, कापसाचे उत्पादन वाढविण्यासाठीच्या कार्यक्रमासाठी केंद्र सरकारने खास तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, 75 कोटी रुपये मागील एक वर्षाच्या काळात खर्च करु शकलो. या गतीने अभ्यास करुन 3000 कोटी रुपये खर्च करणार असू तर आलेला निधी परत जाणार आहे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आला आहे की, वर्षभरात शासनाला निधी मिळत नाही. दुसरीकडे आलेला निधी खर्च करण्याचे नियोजन कुठे दिसून येत नाही.

सभापती महोदय, स्मारके उभारण्याची शासनाला घाई झालेली आहे. मोठमोठ्या घोषणा केल्या जात आहेत. प्रत्यक्ष तरतूद केलेली नसते. याबाबत शासनाने लक्ष दिले पाहिजे. रायगड जिल्हयात सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या स्मारकासाठी तरतूद केलेली नाही. जिजामाता यांच्या स्मारकाची घोषणा झाली, परंतु तरतूद केलेली नाही. माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे हे राज्याचे अर्थमंत्री असताना त्यांनी इतक्या घोषणा केल्या होत्या की, रायगड जिल्हयात किमान 5000 कोटी रुपये येतील अशी स्थिती निर्माण झाली होती. परंतु प्रत्यक्षात 5 रुपये देखील प्राप्त झाले नाहीत. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी निधी अडवून ठेवला की काय झाले याबाबत अभिभाषणात कुठेही उल्लेख झालेला नाही.

सभापती महोदय, काल माननीय मुख्यमंत्री यांनी अरबी समुद्रात उभारावयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबद्दल अत्यंत नियोजनबध्द पध्दतीने मांडणी केली आहे. त्यांची मांडणी ऐकून मला व्यक्तिगत समाधान वाटले. यापूर्वी कोणी अशा पध्दतीने मांडणी केलेली नव्हती. शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यास वेळ लागेल, परंतु कालावधी त्यांनी सांगितलेला नाही. ज्या पध्दतीचे नियोजन आहे ते पूर्ण अभ्यासपूर्वक सांगितलेले आहे. प्रथम सर्व प्रकारच्या परवानग्या मिळवाव्यात, आर्थिक तरतूद करावी, नंतर स्मारकाची घोषणा करावी व त्यानंतर भूमीपुजन करावे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आमची अपेक्षा होती की, संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधलेल्या पुणे जिल्हयातील पवनानगर जल वाहिनी विरोधात झालेल्या गोळीबाराच्या घटनेबद्दल उल्लेख त्यात केला जाईल. संपूर्ण महाराष्ट्राचे या सभागृहाकडे लक्ष लागलेले असते. पवनानगरच्या गोळीबाराच्या घटनेबद्दलचा अहवाल 1 ऑगस्टला राज्य शासनाकडे सादर केलेला आहे. प्रत्येक वेळेला दोन्ही सभागृहात मागणी केली जाते की, अशा प्रकारच्या घटनेची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. जेव्हा न्यायालयीन चौकशी जाहीर होते त्या चौकशीचे पुढे काय झाले याची माहिती सभागृहात सादर करण्याची तसदी सरकारला घ्यावीशी वाटत नाही. हा अहवाल सादर होऊन 7 ते 8 महिने होऊनही त्या अहवालातील निष्कर्ष काय आहेत या संदर्भात अभिभाषणात कुठेही उल्लेख नाही म्हणून मी खेद व्यक्त करते.

सभापती महोदय, पुण्यातील जर्मन बेकरीमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटातील आरोपींना अटक व्हावयास पाहिजे होती. आजही आपण पाहतो की, या प्रकरणी अद्याप कोर्टात खटला दाखल झालेला नाही किंवा शासन त्या घटनेच्या मुळाशी जाऊन पोहोचलेले नाही.

नंतर 3W.1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे .....

सभापती महोदय, पुणे येथील जर्मन बेकरी सुरु होण्याच्या संदर्भात राज्य सरकारने लक्ष घातले होते. परंतु अनेक परवानग्यांच्या अभावे जर्मन बेकरी अद्याप सुरु होऊ शकली नाही तसेच यासंदर्भातील आरोपी सुध्दा पकडले गेले नाहीत. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये या विषयाच्या संदर्भात निराशा झाल्यामुळे मी नाराजी व्यक्त करते.

सभापती महोदय, पुणे येथे कै.यशवंतराव चव्हाण यांना आंदरांजली अर्पण करण्यासाठी एक दिवसाचे खास संमेलन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला स्वत: माननीय मुख्यमंत्री तसेच सर्व मंत्रीगण हजर होते. पुणे किंवा जी मोठी शहरे आहेत त्या शहरालगत बेसुमार घर बांधणी सुरु झालेली आहे. अशा ठिकाणी लोक मोठया प्रमाणात घरे घेत आहेत. परंतु घरांच्या संदर्भात कोणतेही नियम पाळले जात नाहीत. या ठिकाणचे बांधकाम अनियमित असल्यामुळे लोकांच्या तक्रारी वाढतात व दुसरीकडे घरबांधणी होत नसल्यामुळे शहराच्या जवळ घर लोक घरे घेत आहेत. परंतु काही वर्षांनंतर याच घरांना अनियमित ठरवले जात आहे. घरांच्या संदर्भातील डीसी रुलची नियमावली आम्ही तयार करु असे माननीय मुख्यमंत्र्यांनी पुण्याच्या कार्यक्रमात सांगितले होते.

सभापती महोदय, मला असे वाटते की, ठाणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद अशा ज्या काही महानगर पालिका आहेत व जेथे मोठ मोठे रस्ते आहेत त्याच्या आसपास म्हणजे ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत घरांच्या योजना मोठया प्रमाणात उभ्या राहत असल्याचे आपण बघतो परंतु नियमांमध्ये समानता नसल्यामुळे ले आऊट शिवाय घरे बांधली जातात व काही वर्षानंतर आपणच आपल्यासाठी नवीन प्रश्न निर्माण करतो. परंतु घरांच्या बाबबतीत धोरण आणि समान नियमावलीच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात काहीही उल्लेख आलेला नाही. इतकेच नव्हे तर अतिक्रमण म्हणून आज जो संघर्ष होत आहे त्यातील अनेक घरे छोटया छोटया जमिनीवर जमीन मालकांनी बांधलेली आहेत. याचे नियमितीकरण करण्याच्या संदर्भात सरकारने जे लक्ष घालावयास पाहिजे होते ते लक्ष घातले नाही तसेच राज्यभर घरांच्या संदर्भात स्टँर्डलायझेशन डीसी रुल करु यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी जे जाहीर केले होते त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नसल्यामुळे मी खेद व्यक्त करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे .....

सभापती महोदय, गेल्या तीन वर्षापासून आम्ही माननीय राज्य पालांच्या अभिभाषणामध्ये फॉरेन्सीक लॅबचा उल्लेख ऐकत आहोत. फॉरेन्सीक लॅबमधून 15 दिवसाच्या आत रिपोर्ट सादर झाल्यानंतर आरोप पत्र दाखल केले जाईल व त्यासाठी गेल्या काही वर्षात आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु राज्यातील या फॉरेन्सीक लॅबमध्ये 3850 प्रकरणे प्रलंबित असून त्यातील 757 प्रकरणे गेल्या 10 महिन्यापासून मुंबईमध्ये प्रलंबित असून नाशिक विभागामध्ये 1465, नागपूर विभागात 806, पुणे विभागात 757, औरंगाबाद विभागात 349 आणि अमरावती विभागात 207 प्रकरणे अहवालासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे मला या विषयाच्या संदर्भात सन्माननीय अर्थमंत्र्यांचे लक्ष वेधावेसे वाटते. सर्व सहाय्यक विज्ञान प्रयोग शाळेमध्ये संचालक आणि शास्त्रीय सहाय्यक स्तराची जी अनेक पदे रिक्त आहेत ती पदे जर आर्थिक तरतुदी अभावी रिक्त असतील तर फॉरेन्सीक लॅबचे रिपोर्ट येणार कसे, रिपोर्ट आले नाही तर चार्जशिट कशा प्रकारे सादर केले जातील ? 3850 प्रकरणे जर वेगवेगळया प्रयोग शाळेत प्रलंबित असतील तर लवकर निकाल लागण्याच्या संदर्भात आपण कशी काय अपेक्षा धरु शकतो.

सभापती महोदय, आपण एका बाजूला फास्ट ट्रॅक कोर्टचा उल्लेख केला आहे परंतु त्यासंदर्भात काहीही कार्यवाही न केल्यामुळे मी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करते.

सभापती महोदय, जॉईंट फॉरेस्ट प्रोग्राममध्ये आदिवासींनी वन हक्क कायद्यांच्या संदर्भात यवतमाळ जिल्हयातील वणी येथे एक कार्यशाळा आयोजित केली होती. मी तेथे गेल्यानंतर त्यांनी माझ्या असे निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्रातील अनेक जिल्हे आहेत त्यातील औरंगाबाद, पुणे या जिल्हयांच्या मध्ये आदिवासी जरी राहत असले तरी सुध्दा सामूहिक वन हक्क दावे मोठया प्रमाणात प्रलंबित आहेत.

यानंतर श्री. भारवि....

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते हे सुमोटो करायला घेतले आहे असे सांगत आहेत. या कामाला महसूल यंत्रणेने ज्याप्रमाणे वेग द्यायला पाहिजे होता तो दिलेला नाही हे उपलब्ध होत असलेल्या आकडेवारी वरून दिसून येत आहे. त्यातल्यात्यात विदर्भातील गडचिरोली, भंडारा येथे पुढाकार घेण्यात आलेला आहे. परंतु, मराठवाडा, पुणे, नाशिक येथील आदिवासींचे वन हक्क दावे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत. त्यासंबंधी देखील मी खेद व्यक्त करते.

सभापती महोदय, महिलांच्या प्रश्नावर बरीच मोठी चर्चा होते. आपण वारंवार फास्ट ट्रॅक कोर्टासंबंधीचा उल्लेख करतो. त्यासाठी आपण वकील नेमण्याचे काम करतो. धुळ्यामध्ये ॲड.सूर्यवंशी यांना नेमण्याची मागणी तेथील स्थानिक संस्थांनी विधी व न्याय विभागाकडे केलेली आहे. त्याकडे कोणीही लक्ष देत नाही. आम्ही परत परत माननीय गृह मंत्र्यांकडे जाऊन मागणी करून त्यातील वास्तविकता निदर्शनास आणून देत आहोत.

नगर येथे एका कर्णबधीर मुलीवर बलात्कार झाल्यानंतर सरकारी वकील नेमण्यासंबंधी दैनिक लोकसत्ताने लक्ष वेधले होते. या प्रकरणात आवश्यकता असताना देखील त्याची नेमणूक केली गेली नाही. गेल्या चार वर्षात ज्या केसेस फास्ट ट्रॅक कोर्टात जाणे अपेक्षित होते त्या का गेल्या नाहीत, व किती केसेसच्या संदर्भात न्याय मिळण्यासाठी आपण उपाययोजना केलेली आहे यासंबंधातील उल्लेख अभिभाषणात असायला हवा होता तो देखील नाही.

आधी पुनर्वसन आणि मग धरण असे शासनाचे धोरण असताना देखील पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा येथील धरणांची कामे पूर्ण होऊन सुद्धा पुनर्वसनाचे काम धिम्या गतीने सुरू आहे. 1985 साली कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा धरण पूर्ण झाले. परंतु, या प्रकल्पग्रस्तांचे अजून पुनर्वसन झालेले नाही. 1996 मध्ये मंजूर झालेल्या 12 प्रकल्पातील, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन रखडलेले आहे. तसेच, सांगली जिल्ह्यातील धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाची आजची स्थिती काय आहे ? सोलापूर जिल्ह्यातील उजनी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न आहेत. पुणे जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांचे छोटे-छोटे प्रश्न आहेत. त्यासाठी त्यांना जिल्हाधिकाऱ्यांकडे जावे लागते. आपण धरणग्रस्तांसाठी जे धोरण आखले आहे त्याची अंमलबजावणी कशी झाली आहे या संदर्भात काहीही उल्लेख नसल्यामुळे मला अभिभाषणा संबंधी खेद व्यक्त करावासा वाटतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, मला राज्य महिला आयोगाच्या प्रश्नाकडे देखील लक्ष वेधावयाचे आहे. त्यासंबंधी येथे वारंवार चर्चा होत आहे. गेल्या पाच वर्षात महिला आयोगातील 3 पदे रिक्त राहिली होती. ही तीन पदे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातील होती. आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर महिला सदस्य असून सुद्धा आधीच्या टेन्युअर मध्ये ती तीन पदे रिक्त राहिली होती. आता अध्यक्षाचे पद रिक्त आहे. त्यासंबंधातील जबाबदारी काँग्रेसची आहे असे आपण म्हणतो. आम्ही जेव्हा साक्ष घेतली तेव्हा सन 2000 साली आयोगाला 2 कोटी रूपयांचे बजेट होते ते गेल्या काही वर्षांमध्ये रूपये 55 लाखा पर्यंत आलेले आहे,असे सांगण्यात आले. आज या आयोगातील सर्व पदे रिक्त आहेत. हा आयोग आपण कशा प्रकारे लोकोपयोगी करणार आहोत, याचा उल्लेख या अभिभाषणात नाही.

माननीय उप मुख्यमंत्री हे आमच्या पुणे जिल्ह्यातून येतात. त्यामुळे जास्तीत जास्त विकासाचे फायदे पुण्यात ओढले जातात असे म्हटले जाते. आज पिंपरी-चिंचवडमध्ये अनधिकृत बांधकामाचा मोठा प्रश्न आहे. महिन्याभरापूर्वीच माननीय मुख्यमंत्र्यांनी धोरणात्मक निर्णय घेऊ असे जाहीर केले. उल्हासनगरमधील काही बांधकामे नियमित करण्यात आली आहेत. वाणिज्यिक कामांबद्दल मी कधीच आग्रह धरणार नाही. आमची तशी भूमिका देखील नाही. जे छोटे घरमालक आहेत त्यांच्या घरांची बांधकामे नियमित करणे आवश्यक आहे. मग ते बाधकाम ठाण्यात असेल, पुण्यात असेल, इतरही ठिकाणी असेल ते नियमित केले पाहिजे. औरंगाबादमध्ये गुंठेवारीचा प्रश्न आहे. अशा या लहान घरमालकांना संरक्षण देण्यासाठी आपण कुठलीही पावले उचलताना दिसत नाही.

स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी निमित्त पुणे येथे एक दिवसांचे चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. तेथे घरबांधणी विषया संबंधात हौसिंग फेडरेशनच्या अध्यक्षांना बोलाविण्यात आले होते. तेव्हा त्यांनी देखील आपल्या विविध अडचणी तेथे मांडल्या. उद्योगांनी आता पश्चिम महाराष्ट्रात न जाता विदर्भामध्ये जावे असे सांगितले जाते. पण सर्वच उद्योग महाराष्ट्रा बाहेर चालले आहेत. राज्यात औद्योगिक धोरणाची अंमलबजावणी कशी होते याकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

लक्ष द्यायला पाहिजे होते ते दिले गेलेले नाही. घर बांधणीचा उद्योग जोरात आहे. परंतु, नियमासंबंधी योग्य ती भूमिका न घेतल्यामुळे सातत्याने असंतोषाची भूमिका लोकप्रतिनिधींना घेणे भाग पडत आहे. अशा प्रकारे अनेक मुद्यांकडे दुर्लक्ष झालेले आहे.

कायदा व सुव्यवस्थे संबंधी शासनाची भूमिका काय आहे ती आम्हाला समजली पाहिजे. आज दोन्ही सभागृहात या बाबत चर्चा झाल्यामुळे अनुशेषा बाबत माननीय राज्यपालांचे जे निदेश आहेत त्याच्या अंमलबजावणी संदर्भात राज्य शासनाची काय भूमिका आहे यासंबंधी स्पष्टीकरण झाले पाहिजे. एवढे सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करते. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

.....

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांचे भाषण पाच मिनिटांमध्ये संपणार नाही. तेव्हा माझी विनंती आहे की, आपण उद्या भाषणास सुरुवात करावी. आपण ऑन लेग आहात.

सभा□ृ□हाची बैठ□ आता स्था□□त होऊ□ उद्या, शुक्रवार, दि□□ 15 मार्च, 2013 रोजी स□ाळी 11.00 वाजता पु□ भरेल.

(सभा□ृ□हाची बैठ□ सायंकाळी 5 वाजू□ 56 मि□□टां□□, शुक्रवार, दि□□ 15 मार्च, 2013 रोजीच्या स□ाळी 11.00 वाजेपर्य□त स्था□□त झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही